विषय क्रमांक ११(२) :. मुदत ठेव व पुनर्गुंतवणूक ठेवींच्या तारणावर देण्यांत येणाऱ्या कर्जावरील मार्जीन कमी करण्याबाबत विचार करणे

ठराव क्रमांक ११ (२) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती दिली की, रिझर्व बँकेच्या दि. २/११/१९८७ चे परिपत्रकानुसार मुदत ठेव व पुनर्गुंतवणूक ठेवींच्या तारणावर कमीतकमी १५ टक्के दुरावा राखण्याबाबत कळविण्यांत आले होते. त्यानुसार बँक मुदत ठेवींच्या तारणावर ८५% आणि पुनर्गुंतवणूक ठेवींच्या तारणावर ७५% ठेवीदारास कर्ज उपलब्ध करून देते.

दि. १७/१०/१९९४ चे परिपत्रकानुसार मुदत ठेव व पुनर्गुंतवणूक ठेवींच्या तारणावर किती दुरावा (मार्जीन) ठेवावा, याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार बँकेला देण्यांत आला आहे. ठेवींचे तारणावरील कर्जपुरवठा हा बँकेच्या दृष्टीने सुरक्षित असा कर्जपुरवठा आहे. त्यामुळे ह्या कर्जावरील मार्जीन कमी केल्यास कर्जपुरवठ्यात वाढ होईल.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे ठरले:

१. मुदत ठेवींच्या तारणावर ठेव रकमेच्या ९० टक्केपर्यंत कर्ज देता येईल.

२. पुनर्गुंतवणूक ठेवींच्या तारणावर सध्या ठेव रकमेच्या ७५ टक्के कर्ज देण्यांत येते, त्याऐवजी ठेवींची मुद्दलरक्कम अधिक कर्ज देण्याचे तारखेला मागील ३० सप्टेंबर किंवा ३१ मार्च पर्यंत त्या ठेवींवरील देय व्याज एवढ्या रकमेच्या ७५ टक्के कर्ज देण्यांत येईल.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११(३) :. राष्ट्रीय बँक पुरस्कृत सहकारी विकास निधी मदत योजना अंमलबजावणीस मंजूरी देणेबाबत.

ठराव क्रमांक ११ (३) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने माहिती देतांना मा. सरव्यवस्थापक यांनी सांगितले की, नाबार्डने आर्थिकदृष्ट्या कमकुवत जिल्हा सहकारी बँका व प्राथमिक सहकारी कृषि पतपुरवठा संस्थांचे सर्वांगिण विकासाकरिता उदा. कर्जवाटप व ठेवींत वाढ करण्याचे दृष्टीने सुरक्षित तिजोरी, लॉकर, कॅश काउन्टर, कार्यालयीन फर्निचर खरेदी, कर्मचाऱ्यांचे कार्यक्षमतेत वाढ होण्याचे दृष्टीने प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे, फॅक्स मशीन खरेदी, संगणीकरण इ. साठी सहकार विकास निधीतून ८५ ते ९० टक्केपर्यंत अनुदानासहीत कर्ज देण्याची योजना कार्यान्वित केली आहे. तसेच कर्जवसूलीत वाढ करण्याचे दृष्टीने संस्था व बँकेच्या कर्जवाटप व

वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दुचाकी वाहन खरेदीसाठी सहकार विकास निधीतून अनुदान व अनुदानासह फेरकर्ज उपलब्ध करून देणार असून या कर्जनिधीत जिल्हा सहकारी बँकेचा सहभाग नाबार्डला अपेक्षित आहे.

विषयाचे अनुषंगाने सभेत सविस्तर चर्चा होउन, राष्ट्रिय बँक पुरस्कृत सहकार विकास निधीतून मंजूर फेरकर्जाअंतर्गत कर्ज उपलब्धतेबाबत वरील योजनांच्या अंमलबजावणीपोटी नाबार्डने घालून दिलेल्या अटी व कर्ज धोरणांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११(८): एकात्मीक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत कर्जपुरवठ्यापोटी प्राप्त अनुदान रकमेच्या जमाखर्चाची नवीन पध्दत अवलंबविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११(८): मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, सध्याचे प्रचलीत पध्दतीनुसार एकात्मिक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत लाभार्थी सभासदाला जे कर्जवाटप केल्या जाते, त्यामधून अनुदानाची रक्कम वगळून उर्वरीत रक्कम सभासदाच्या कर्जखाती नांवे लावल्या जाते.

एकात्मीक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत नव्याने नियुक्त केलेल्या तज्ञ कमेटीचे शिफारसीनुसार केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे यानंतर या योजनेअंतर्गत उपलब्ध होणारी अनुदानाची रक्कम सभासदांच्या कर्जखाती वळती न करता सभासदांच्या कर्जफेडीच्या कालावधीनुसार शाखेत सभासदांच्या नांवे जमा ठेवावयाची असून कर्ज परतफेडीच्या शेवटच्या हप्त्यात जमा करावयाची आहे. जर लाभार्थी सभासदांकडून दिलेल्या कर्जाचा दुरुपयोग झाल्यास सदरहु रक्कम शासनास परत करावयाची आहे.

नवीन अनुदान पध्दतीची अंमलबजावणी नाबार्ड व राज्य सहकारी बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हा सहकारी बँकेने करावयाची असून प्रत्येक शाखेत "सबसिडी रिजर्व फंड" खाते उघडून सोसायटी लाभार्थीनिहाय स्वतंत्रपणे अनुदान रक्कम जमा ठेवावयाची असून त्यावर व्याज द्यावयाचे नाही. कर्जाची परतफेड नियमीत स्वरूपात होत असल्यास शेवटच्या हप्त्यात अनुदानाची रक्कम जमा करावयाची आहे. जिल्हा बँक एकात्मीक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत मध्यम मुदती कर्जपुरवठा हा सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून लाभार्थी सभासदांना करीत असते.

मध्यम मुदती कर्ज हे साधारणत: ५ वर्ष कालावधीचे असल्यामुळे ह्या अनुदान रकमेचा हिशेब स्वतंत्ररित्या लाभधारक निहाय ५ वर्षाकरिता ठेवावा लागेल.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, एकात्मीक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत प्राप्त अनुदान रकमेच्या जमाखर्चाची नवीन पध्दती बँकेच्या दृष्टीने हितावह नसल्यामुळे नवीन पध्दतीचा अवलंब न करता सध्याची प्रचलीत पध्दत सुरु ठेवण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११ (५) :. नागपूर तालुक्याचे शासन निर्मीत पदावरील वसुली आधिकारी श्री. डि.बी. पोफळी यांना एक वर्ष मुदतवाढ मिळणेबाबत मा. विभागीय सहनिबंधक, सह.संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ११ (५) :. श्री. डि.बी. पोफळी हे शासननिर्मीत पदावर नागपूर तालुक्याचे वसुली आधिकारी म्हणून कार्यरत असून त्यांच्या सेवेची मुदत दि० ३०|६|९८ रोजी संपत आहे. श्री. पोफळी यांचे आजपर्यंतचे कामकाजाचा आढावा घेतला असता त्यांचे वसुलीचे काम समाधानकारक आहे व त्यांच्या सेवेची बँकेला आवश्यकता आहे. त्यामुळे श्री. डि.बी.पोफळी सहकारी आधिकारी श्रेणी-१ यांना त्यांचे लिपीकासह शासन निर्मीत पदावर नागपूर तालुक्याचे वसुली आधिकारी म्हणून पुढील एक वर्षाकरिता म्हणजे दि० ३०|६|१९९९ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत मा. विभागीय सह-निबंधक, सहकारी संस्था, नागपूर ह्यांना विनंती करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११ (६) :. केंद्र पुरस्कृत अनुदान योजनेअंतर्गत ट्रॅक्टर कर्ज धोरणातील रु. २५०००/- मुदती ठेवीत ठेवण्याची अट शिथील करणे.

ठराव क्रमांक ११ (६) :. केंद्र शासन पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण वाढीसाठी शेतकऱ्यांना अनुदानावर ट्रॅक्टर देण्याचे धोरणाअंतर्गत शेतकऱ्यांना रु. ३०,०००/- अनुदान प्राप्त होत असते. या योजनेअंतर्गत द्यावयाच्या ट्रॅक्टर कर्जाकरिता बँकेने स्वतंत्र धोरण ठरविले आहे.

सदर अनुदान योजनेत अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांचे कर्जखाती किंवा सेव्हींग खात्यात जमा होत नसून ट्रॅक्टर पुरविणाऱ्या कंपनीला शासनाकडून मिळत असल्यामुळे तसेच कर्जापोटी करावयाच्या स्वगुंतवणूक रकमेऐवजी रु. २५०००/- बँकेच्या मुदती ठेवित गुंतवावयाची

असल्याने कर्जदारास शासनाकडून अनुदान मिळाल्याचे समाधान होत नाही. आणि सभासदास ट्रॅक्टरवर अनुदान जरी मिळत असले तरी कर्जाकरिता आवश्यक असलेली स्वगुंतवणूक कमी होत नाही.

सदर कर्जधोरणाअंतर्गत असलेली रक्कम रु.२५०००/- मुदती ठेवीत गुंतवावयाची अट शिथिल केल्यास सभासदास स्वगुंतवणूकीपोटी घेणाऱ्या १५ टक्के रकमेतून अनुदान रक्कम वगळता फक्त फरकाची रक्कम बँकेत भरावी लागेल. त्यामुळे कर्जदारास अनुदान मिळाल्याचे समाधान होईल व या योजनेकडे जास्तीतजास्त शेतकरी आकर्षित होतील.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन केंद्र पुरस्कृत अनुदान योजनेअंतर्गत ट्रॅक्टर कर्ज धोरणातील रु.२५०००/- मुदती ठेवीत गुंतवणूक करण्याची अट शिथिल करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ११(७) :- नविन विहिरीकरिता द्यावयाचे कर्ज मर्यादेत रुपये १०,०००/- ने वाढ करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११(७) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सध्याचे धोरणाप्रमाणे नविन विहिरीकरिता नाबार्डचे युनिटकॉस्टप्रमाणे खालीलप्रमाणे कर्जवाटप करण्यांत येते. तथापी नविन विहिरीसाठी येणाऱ्या खर्चात वाढ झाल्याने, वाढिव दराने कर्ज मंजूरीची मागणी सभासदांकडून होत आहे. सध्याचे स्थितीत विहिर बांधणी सामुग्रीच्या किंमती व मजूरीचे दरात वाढ झाल्यामुळे १५ फूट व्यास व ४० फूट खोल विहिरीस अंदाजे रु. ५० ते ६० हजार खर्च अपेक्षित आहे.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, नविन विहिरीकरिता येणाऱ्या खर्चाचे प्रमाणात वाढ झाल्याने वाढीव कर्जमागणीचा विचार करून वाढीव कर्जमागणीचा विचार करून सध्याचे युनिटकॉस्टमध्ये रु.१०,०००/- ने वाढ करण्यांत यावी. ही रक्कम नाबार्डचे युनिटकॉस्ट व्यतिरिक्त असल्याने स्वनिधीतून मंजूर करावी. ही वाढ विचारात घेता खालीलप्रमाणे नविन विहिरीकरिता कर्जमर्यादा मंजूर करावी, असे ठरले.

| अनु. क्रमांक | विहिरीचा प्रकार | नाबार्ड युनिट कॉस्ट | स्वगुंतवणूक वगळता बँक सध्या मंजूर करित असलेली रक्कम | मंजूर करावयाची नविन कर्ज मर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | रिंग पद्धती | ३५०००/- | २२२५०/- | ६५०००/- |
| २ | खोदून बांधणी पद्धती | ६०,०००/- | ३००००/- | ४०,०००/- |

— ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११(८) :. मध्यम मुदती कर्जअंतर्गत सहकारी संस्थेचे खरेदी करावयाची हिस्से रक्कम २% (टक्के) करण्याबाबत...

ठराव क्रमांक ११(८) :. मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सेवा सहकारी संस्था व विविध कार्यकारी संस्थांच्या सभासदांना मंजूर केलेल्या कर्जाची प्रत्यक्ष उचल घेतेवेळी अनुक्रमे ५ टक्के व १० टक्केप्रमाणे हिस्से खरेदी करावे लागतात. त्याचप्रमाणे मध्यममुदती कर्जअंतर्गत ५,१० व १५ टक्के प्रमाणे स्वगुंतवणूक करावी लागते. अशा स्थितीत सामान्य शेतकऱ्यांना कर्ज उचल करतांना हिस्से खरेदी व स्वगुंतवणूक अशा दुहेरी रकमेची व्यवस्था करावी लागते.

मध्यममुदती कर्जाची रक्कम जास्त असल्याने हिस्से रक्कम व स्वगुंतवणूकीची रक्कम सुध्दा जास्त आहे. त्यामुळे बरेच शेतकरी सभासद एवढया रकमेची तरतूद करु शकत नसल्याने त्यांना शेती विकासाच्या मुदती कर्जापासून बरेचदा वंचीत रहावे लागते. या परिस्थीतीचा विचार करुन जास्तीतजास्त शेतकऱ्यांना बँकेच्या कर्जविषयक धोरणाचा लाभ होण्याचे दृष्टीने बँकेने यापूर्वी सामुहिक दुभती जनावरे खरेदी योजनेतंर्गत दुभत्या जनावरांच्या खरेदीच्या मध्यममुदती कर्जअंतर्गत संस्थांचे हिस्से खरेदी रक्कम २% करण्याचा निर्णय घेतलेला आहे. याच धर्तीवर बँकेच्या इतरही मध्यममुदती कर्ज धोरणाअंतर्गत कर्जवाटप करतांना हिस्से खरेदीचा दर ५ टक्के व १० टक्के ऐवजी सरसकट २% केल्यास कर्जाकरिता सभासदांना स्वगुंतवणूक कमी प्रमाणात करावी लागेल. त्यामुळे कर्ज मागणीत वाढ होऊन शेतकऱ्यांच्या शेतीविकासात सुध्दा भर पडू शकेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, सहकारी संस्थांच्या सभासदांना मध्यममुदती कर्जअंतर्गत खरेदी करावयाची हिस्से रक्कम सरसकट २% करण्याबाबत सहकारी संस्थांना मुभा देण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११(९) :. शेतघराचे कर्जमर्यादेत वाढ करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११(९) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगीतले की, शेतघराकरिता सध्या रु. ३०,०००/- पर्यंत कर्ज मंजूर करण्याचे बँकेचे धोरण आहे. अलिकडे घरबांधणी साहित्याचे व मजूरीचे दरात वाढ झाल्याने सभासदांकडून वाढीव कर्ज मर्यादेची मागणी होत आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, शेतघरासाठी सध्या असलेली कर्जमर्यादा रु. ३०,०००/- ऐवजी रु. ५०,०००/- करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १० (१०) :. शेती उपयोगी अवजाराकरिता कर्जपुरवठ्याचे धोरण ठरविणे.

ठराव क्रमांक १० (१०) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या सध्याचे धोरणानुसार ट्रॅक्टर कर्ज मंजूर करतांना ट्रॅक्टर, ट्रॉली व दोन अवजाराकरिता कर्ज मंजूर करण्यांत येते परंतु स्वतंत्ररित्या शेतीला आवश्यक असलेल्या अवजाराकरिता कर्ज मंजूरीचे बँकेचे धोरण नाही.

शेतीच्या विकासाकरिता शेतीच्या विविध कामात उपयोगी पडणारी अनेक प्रकारची शेती औजारे बाजारात उपलब्ध आहेत उदा: कल्टीवेटर ९ व ११ दाती, मोल्डबोल्ड प्लाऊ २ व ३ फाळी, लेव्हलिंग ब्लेड, कल्टीव्हेटर कम् लेव्हलर, डिस्क हारो १२ डिस्क, केजव्हिल, सिड ड्रिल, पल्टीप्लाउ इ. सध्याच्या काळात नविन प्रकारची विविध शेती उपयोगी औजारांचा उपयोग करून शेतीविकास साधण्याकडे शेतकऱ्यांचा कल असून त्याला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, आधुनिक यंत्र सामुग्रीचा उपयोग करून शेती उत्पादनात वाढ होण्याचे दृष्टीने सेवा सहकारी संस्थेमार्फत शेतकऱ्यांना त्यांचे मागणीनुसार शेतीउपयोगी अवजाराकरिता कर्जवाटपाचे खालीलप्रमाणे धोरण ठरविण्यांत आले.

१. सदर कर्जाकरिता अर्जदाराकडे किमान पांच एकर स्वमालकीची जमीनधारणा आवश्यक राहिल.

२. एकावेळी जास्तीतजास्त तीन औजाराकरिता जास्तीतजास्त रुपये ६०,०००/- किंवा अवजारांच्या किंमतीच्या ७५% यात कमी असणाऱ्या रकमेपर्यंत कर्ज मंजूर करण्यांत यावे.

३. सदर कर्जअंतर्गत औजारांचा पुरवठा फक्त ट्रॅक्टर कंपनी / ॲग्रोइंडस्ट्रिज कार्पोरेशनवरून औजाराच्या गुणवत्तेची खात्री करून करण्यांत यावा.

४. सदर कर्जाची मुदत ३ वर्षे राहिल.

५. वरील अटीव्यतिरिक्त मध्यम मुदती कर्जाच्या अटी नेहमीप्रमाणे राहतील. या अटीमध्ये बदल करण्याचा अथवा नवीन अटी घालण्याचा अधिकार बँकेस राहिल.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११(११) :. हंगाम १९९८-९९ मध्ये रूपांतर सवलत प्राप्त शेतकरी सभासदांना कर्जवाटप करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११(११) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, यावर्षी जिल्ह्यात अतिवृष्टी गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे नापिकी झाल्यामुळे मा. जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण गावांची पैसेवारी ५० पैसेचे आंत जाहिर केलेली आहे. तसेच शासनाने नागपूर जिल्हा टंचाईग्रस्त जिल्हा म्हणून घोषीत करण्यांत आला आहे. बॅंकेने संपूर्ण खरीप पीक कर्जाला दि. ३० जून १९९८ पर्यंत मुदतवाढ जाहिर केलेली आहे. अशा खरीप पीक कर्जाला रूपांतरादी सवलत द्यावयाची आहे. तसेच रूपांतर सवलत मंजूर झाल्यानंतर नवीन कर्जदराने कर्जपुरवठा करावयाचा आहे.

विषयावरील चर्चेत भाग घेतांना, मा. श्री. सुनिल केदार, संचालक म्हणाले की, या वर्षीची दुष्काळी परिस्थीती नापिकी विचारात घेता रूपांतरादी प्रकरणात व्याज भरण्यासाठी शेतकऱ्याजवळ पैसा नसल्यामुळे ५ एकराचे आतील शेतकऱ्यांकडून भरून घ्यावयाचे व्याजास ह्या वर्षापूरती तहकुबी द्यावी व हे व्याज पुढील वर्षी शेतकऱ्यांकडून वसुल करण्यांत यावे. तसेच गटसचिवाचे असहकार आंदोलन सुरु झाल्यामुळे त्यांनी अद्याप रूपांतरादी प्रकरणे बॅंकेस सादर केलेली नाही. भविष्यात सादर करतील अथवा नाही अशी शंका उत्पन्न झाली आहे. अशा परिस्थीतीत रूपांतर देण्याची सवलत ३० मे १९९८ पर्यंत असल्यामुळे प्रकरणाअभावी रूपांतरादी कर्जवाटप खोळंबण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावर बॅंकेने खालीलप्रमाणे उपाययोजना करावी, असे सुचविले.

मागिलवर्षी ज्या सभासदाला खरीप कर्जवाटप झालेले आहे व जे सभासद या वर्षी रूपांतरास पात्र आहेत अशा सभासदांची रूपांतर प्रकरणे शेतकी संस्थानी सादर केली नसली तरी त्याची वाट न पाहता त्यांना मागिलवर्षी म्हणजे सन् १९९७-९८ हंगामाकरिता मंजूर असलेल्या मर्यादेपर्यंत नगदी व वस्तुरूप कर्जवाटप करावे. मा. श्री. र. गो. बंग व इतर संचालकांनीही श्री. केदार यांचे मतास दुजोरा दिला.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठरले–

१. ह्या वर्षीची नापिकी, दुष्काळी व टंचाईग्रस्त परिस्थीती विचारात घेता रूपांतरादी प्रकरणात ५ एकराखालील शेतकऱ्यांकडून भरून घ्यावयाचे व्याजास मार्च १९९९ पर्यंत तहकुबी देण्यांत यावी. ५ एकराचे वरील मोठ्या शेतकऱ्यांना मात्र व्याजाच्या भरणा केल्याशिवाय

रूपांतराची सवलत मिळणार नाही.

२. रुपांतरादी सवलतीस पात्र असणाऱ्या शेतकरी सभासदांना मागिलवर्षी म्हणजे सन् १९८७-८८ मध्ये मंजूर असलेल्या मर्यादेपर्यंत कर्जवाटप करावे. उदा. मागील वर्षी सभासदांना जेवढे नगदी व वस्तुरुप कर्जवाटप करण्यांत आले असेल तेवढेच कर्जवाटप नगदी व वस्तुरुपात चालु वर्षी सुध्दा करण्यांत यावे. कर्जवाटप झाल्यानंतर सर्व रुपांतरादी प्रकरणे निरिक्षकाने शाखा स्तरावर तयार करुन मंजूरीसाठी मुख्यकार्यालयास पाठवावीत.

— ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ११(७२) :. सेवा सहकारी संस्थांच्या सभासदांना शेतीला कुंपण करण्याकरिता कर्जपुरवठ्याचे धोरण ठरविण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११(७२) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतर्फे शेती विकासाकरिता शेतकऱ्यांना सेवा सहकारी संस्थेच्या माध्यमातून विविध कारणाकरिता कर्जपुरवठा करण्यांत येतो. त्याचप्रमाणे शेती विकासास पुरक अशा शेतीचे कुंपनाकरिता कर्ज उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने खालिलप्रमाणे धोरण तयार करण्यांत आले आहे.

१. कुंपनाकरिता द्यावयाचे कर्ज हे अनुत्पादित कर्ज असल्यामुळे शेती उत्पन्नातून खर्च वगळता सदर कर्जाची नियमीत परतफेड करणे शक्य होईल. अशा प्रगतीशिल शेतकऱ्यांनाच हे कर्ज देण्यांत यावे.

२. जे शेतकरी बारमाही ओलीताची पीके तसेच बागायती पीके घेतात त्याचप्रमाणे ज्यांचेकडे फळबाग व फुलशेती आहे अशा शेतकऱ्यांनाही कुंपनाकरिता कर्ज देण्यांत येईल. तसेच ज्या शेतकऱ्यांची शेती शहराच्या किंवा गावाचे जवळ आहे आणि अशा शेतितिल पिकांना मोकाट जनावरांचा अथवा वाघसरांचा त्रास होतो अशा शेतकऱ्यांनाही त्यांचे मागणीनुसार हा कर्जपुरवठा करण्यांत येईल.

३. सदर कर्जाकरिता शेतकऱ्याकडे ओलीताची किमान ५ एकर शेती असणे आवश्यक राहिल.

४. फळबाग व बागायती पिके यांचे संरक्षणाकरिता कुंपण कर्जाची मागणी आल्यास त्यास प्राधान्य देण्यांत येईल.

५. नियोजीत शेताच्या कुंपनाचे अंदाजपत्रक व नकाशा तयार करुन कर्जमागणी अर्जासोबत सादर करावा लागेल.

६. हे कर्ज पूर्णपणे अनुत्पादित असल्यामुळे संपूर्ण अंदाजपत्रकाच्या ७५

रक्केपर्यंत किंवा जास्तीतजास्त रु. ५०,०००/- यात जी रक्कम कमी असेल त्या रकमेपर्यंत कर्ज मंजूर करण्यांत येईल. अंदाजपत्रक जास्त रकमेचे असल्यास उर्वरित रकमेची सभासदास स्वतः व्यवस्था करावी लागेल.

७. अंदाजपत्रकानुसार येणारी कर्ज रक्कम वगळता राहिलेल्या शिल्लक रकमेपर्यंतचे कुंपनाचे काम शेतकऱ्यांना स्वतःचे पैशाने प्रथमतः करावे लागेल व या कामाची पाहणी करून समाधान झाल्यानंतरच कर्ज रकमेची उचल देण्यांत यावी.

८. हे कर्ज तीन किस्तीमध्ये देण्यांत येईल. कामाचे स्वरूप, प्रगती तसेच खर्चाचा अंदाज निरिक्षकाने घेतल्यानंतरच दुसऱ्या व तिसऱ्या किस्तीची उचल देण्यांत येईल.

९. सदर कर्ज हे पांच वर्षे मुदतीचे राहिल म्हणजेच वार्षिक हप्त्यानुसार सभासदास ५ वर्षात कर्जाची व्याजासह परतफेड करावी लागेल.

१०. अर्जदार हा परिसरातील राष्ट्रीयकृत, भू-विकास बँक व कर्जदार नसावा. याच कारणाकरिता त्यांनी दुसरीकडून कर्ज उचल केलेला नसावा.

११. शेतकऱ्यांनी स्वतः तयार केलेल्या कुंपनावर फेर उचल म्हणून कर्ज मंजूर करण्यांत येणार नाही.

१२. कुंपनाचे काम अनुभवी कारागिरांकडून तज्ञाचे मार्गदर्शनाखाली करावे लागेल. कुंपणाचे कामास केलेली सुरवात व नंतर त्याची प्रगती व शेवटी संपूर्ण झालेले काम याची पाहणी करण्याची जबाबदारी शाखा निरिक्षकाची राहील.

१३. सदर कर्ज माहे नोव्हेंबर ते जून या कालावधीतच मंजूर करण्यांत येईल तसेच याच कालावधीत कुंपनाचे कामसुध्दा पूर्ण होणे आवश्यक राहील.

१४. कर्जाचा संपूर्ण बोझा अर्जदाराने गहाणात दिलेल्या जमीनीवर प्रथमतः नोंदवून दिला पाहिजे.

१५. या व्यतिरिक्त मध्यम मुदती कर्जाच्या इतर सर्वसाधारण अटी ह्या नेहमीप्रमाणेच राहतील.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन, वरीलप्रमाणे शेतीचे कुंपणासाठी करावयाचे कर्जपुरवठ्याचे धोरणास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११(७३) :. वैयक्तीक लाभधारकांना खाजगी वापरासाठी जीप/कार खरेदीसाठी मंजूर कर्जधोरणांत बदल करून सुधारित धोरणास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ११(७३) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या दि. २४/७/९४ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाचे सभेत वैयक्तीक लाभधारकांना खाजगी वापरासाठी जीप/कार खरेदीसाठी कर्ज धोरण मंजूर करण्यांत आले आहे. परंतु सदर्हु धोरणातील अटींची पुर्तता लाभधारक करू शकत नसल्याने सध्याचे धोरणांत बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालिलप्रमाणे सुधारीत धोरण सुचविण्यांत येत आहे.

१. लाभधारक हा इन्कमटॅक्स भरणारा असावा.

२. लाभधारक सभासदाकडे स्वतःची किंवा कर्जप्रकरणांत दिलेल्या जामीनदारांची बोझाविरहीत कर्जमागणी इतकी संपत्ती असावी.

३. लाभधारकास / जमानतदारांनी गहाणात दिलेल्या कर्जरकमेईतपत स्थावर मालमत्तेचे संपत्तीवर संबंधित विभागामार्फत मंजूर कर्ज रकमेच्या बोझ्याची नोंद करून कर्ज बोझ्याची कागदपत्रे दप्तरी दाखल करून नंतरच कर्जवाटप करण्यांत यावे.

४. बँकेस गहाण करून दिलेल्या संपत्तीवर भविष्यात कोणताही तऱ्हेचा बोझा निर्माण करणार नाही, याबाबत लेखी हमीपत्र लाभधारकास द्यावे लागेल.

५. लाभधारकास वाहनाच्या मुळ किंमतीच्या ८५ टक्केपर्यंत कर्ज मिळु शकेल. मुळ किंमतीच्या १५ टक्के स्वगुंतवणूक व अतिरिक्त खर्च लाभधारकास स्वतः करावा लागेल.

६. कर्जापोटी घेतलेले वाहन बँकेस नजरगहाण करून देऊन रजिस्ट्रेशन करून घेतांना बँकेच्या अग्रहक्काची नोंदणी रजिस्ट्रेशन बुकात करून मुळ रजिस्ट्रेशन बुक हे बँकेच्या ताब्यात द्यावे लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे वैयक्तीक लाभधारकांना खाजगी वापरासाठी जीप/कार खरेदीसाठी सुधारित कर्जधोरणांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

— ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ११(७४) वैयक्तीक कर्ज योजनेअंतर्गत नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेटचे तारणावर कर्ज पुरवठा करण्यासाठी धोरण ठरविणे.

ठराव क्रमांक ११(७४) मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला

माहिती देतांना सांगितले की. नाबार्डचे पत्र क्रमांक-२२३२/९३-९४ दिनांक १५/१०/१९९३ नुसार जिल्हा सहकारी बँकांना सोनेतारण कर्ज, ग्राहकोपयोगी कर्ज, व्यवसायासाठी कर्ज, तात्पुरता ओव्हरड्राफ्ट, वाहन खरेदीसाठी कर्ज, आणि नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेटचे तारणावर कर्जपुरवठा करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार बँकेने नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेट सोडून इतर कारणांकरिता बँकेने कर्जपुरवठा केलेला आहे व सध्याचे स्पर्धात्मक परिस्थीतीत बँकेकडे असलेल्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक होण्याचे दृष्टीने कर्जव्यवहारात वाढ करण्याकरिता खालीलप्रमाणे नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेटचे तारणावर कर्जपुरवठ्याचे धोरण सुचविण्यांत येत आहे.

१. या योजनेअंतर्गत कर्ज मागणी करणाऱ्या अर्जदारास बँकेचे नामधारी सभासद व्हावे लागेल.

२. नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटचे तारणावर सर्टिफिकेट खरेदी तारखेपासून ३ वर्षापेक्षा आधिक कालावधी पूर्ण झाला असल्यास सर्टिफिकेट रकमेच्या ८०% पर्यंत किंवा जास्तीतजास्त रु.१.०० लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यांत येईल.

३. सर्टिफिकेट धारण करणारा अज्ञान असल्यास अथवा संयुक्त नांवाने सर्टिफिकेट असल्यास व त्यात अज्ञानाचा समावेश असल्यास अशा नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेटवर कर्जवाटप करण्यात येऊ नये. ४. कर्ज देण्यापूर्वी ~~अशा~~ नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेटचे मागे सही (डिस्चार्ज) करून दिले पाहिजे.

५. डाक विभागाकडून बँकेचे कर्जाचा बोझा सर्टिफिकेटचे पुढील भागावर नोंदवून घ्यावा.

६. नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेट एकापेक्षा आधिक व्यक्तीच्या नावाने असल्यास सर्व धारकाचे सही शिक्क्यानिशी डिसचार्ज करून घ्यावेत.

७. नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेटची रक्कम बँकेस मिळावी म्हणून अर्जदाराकडून अधिकारपत्र लिहून घ्यावे.

८. सदर कर्जाची मुदत एक वर्ष राहील व एक वर्षाचे आंतच संपूर्ण कर्जाची व्याजासह परतफेड करावी लागेल.

९. सदर कर्जावर व्याजाचा दर दरसाल दरशेकडा १७% आकारल्या जाईल.

विषयावर सविस्तर चर्चा होउन, नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेटच्या तारणावर करावयाच्या कर्ज धोरणांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११(१५) :- नागरी सहकारी बँकाना करावयाचे कर्जपुरवठ्याबाबत.- -

ठराव क्रमांक ११(१५) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सखोल माहिती देतांना सांगितले की, बिगर शेतकी कर्जव्यवहारात वाढ करण्याचे दृष्टीने नागपूर शहरातील नागरी सहकारी बँकांच्या अधिकाऱ्यांची दि. ४.५.९८ रोजी सभा आयोजित करण्यांत आली होती. या सभेत नागरी सहकारी बँकांच्या कर्जपुरवठ्याबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व खालीलप्रमाणे निर्णय घेण्याचे ठरले.

१. नागरी सहकारी बँकेने कर्जबाकीच्या २½ % प्रमाणे बँकेचे शेअर्स घ्यावेत. सध्या ५ टक्केप्रमाणे बँक शेअर्स घेण्याचे बँकेचे धोरण आहे.

२. कॅश क्रेडिट खात्यावर मंजूर मर्यादेवर उचल देतांना प्रत्येक वेळी एन.ओ.डी. कव्हर स्टेटमेंट न घेता बँकांनी दरमहाचे एन.ओ.डी. कव्हर स्टेटमेंट पुढील महिन्याचे ५ तारखेपर्यंत पाठवावे.

३. सध्याचा व्याजदर दरसालदरशेकडा १६½% आहे हा व्याजदर १६% करण्यांत यावा.

सद्यस्थितीत बँकेकडे असलेला अतिरिक्त निधी गुंतवणूक करण्याची बँकेसमोर समस्या आहे. यासाठी कर्जव्यवहार वाढणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे नागरी बँकाचे कर्जपुरवठ्याचे धोरणांत बदल केल्यास ह्या कर्जपुरवठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

विषयाचे अनुषंगाने सभेत चर्चा होऊन, वरीलप्रमाणे नागरी बँकांचे कर्जपुरवठ्याचे धोरणात बदल करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ११(१६) :- कर्जाचे प्रकारानुसार आकारावयाचे व्याजदरात बदल करण्याबाबत विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव ~~विषय~~ क्रमांक ११(१६) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर-चर्चा होऊन खालीलप्रमाणे व्याजदरात बदल करुन सुधारित व्याजदर लागू करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

| अ. क्र. | कर्जाचा प्रकार | सध्याचे व्याजदर दरसाल दरशेकडा व्याजदर | | सुधारित व्याजदर दरसाल दरशेकडा व्याजदर | | लागू करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बँकेने संस्थेला आकारावयाचा | संस्थेने सभासदास आकारावयाचा | बँकेने संस्थेला आकारावयाचा | संस्थेने सभासदास आकारावयाचा | |
| १ | शेती कर्जे – खरीप रब्बी, तेलबिया, डाळी ऊस, बागायती कर्जे – | | | | | |
| | अ) रु. २५०००/- पर्यंत | ९.५० | १३.०० | ९.५० | १३.०० | १/६/९८ |
| | ब) रु. २५०००/- ते २.०० लाखापर्यंत | ९.५० | १५.०० | ९.५० | १४.०० | —"— |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क) रु. २.०० लाखाचे वर | ९.५० | १६.०० | ९.५० | १६.०० | १.४.९८ |
| २) | अल्पमुदती रूपांतर, फेररूपांतर द्वितीय फेरआखणी व गळा कर्जे- | | | | | |
| | अ) रु. २५०००/- पर्यंत | १०.०० | १३.०० | १०.०० | १३.०० | —"— |
| | ब) रु. २५०००/- चे वर | १०.०० | १६.०० | १०.०० | १६.०० | —"— |
| ३) | मध्यम मुदती साधे (दरकक सर्वप्रकारचे) | | | | | |
| | अ) रु. २५०००/- पर्यंत | १०.०० | १२.५० | १०.५० | १२.५० | —"— |
| | ब) रु. २५००० ते रु. २.०० लाखापर्यंत | १०.०० | १४.०० | १०.५० | १४.०० | —"— |
| | क) रु. २.०० लाखाचे वर | १०.०० | १५.५० | १०.५० | १५.५० | —"— |
| ४) | मध्यम मुदती- गोबर गॅस / ए. ग्रा. वि. यो. | ९.०० | १२.५० | ९.०० | १२.५० | —"— |
| ५) | कृषि यांत्रीकी सुविधा (ट्रॅक्टर, पॉवर टिलर, थ्रेशर, शेतीऔजारे इ.) | | | | | |
| | अ) रु. २.०० लाखाचे आंत | ११.०० | १५.०० | १२.०० | १५.०० | —"— |
| | ब) रु. २.०० लाखाचे वर | १२.०० | १६.०० | १२.०० | १६.०० | —"— |
| ६) | प्रकल्पांतर्गत कर्जपुरवठा (नाबार्ड मंजूर योजना) पडीत जमीन विकास, उपसाजलसिंचन कुक्कुटपालन, शेळीमेंढी संगोपन डेअरी इ. | | | | | |
| | अ) रु. २५०००/- पर्यंत | ११.५० | १२.५० | ११.५० | १२.५० | —"— |
| | ब) रु. २५०००/- ते २.०० लाखापर्यंत | ११.५० | १४.०० | ११.५० | १४.०० | —"— |
| | क) रु. २.०० लाखाचे वर. | ११.५० | १५.५० | ११.५० | १५.५० | —"— |
| ७) | सहकारी कारखाने भाग खरेदी | | | | | |
| | अ) साखर कारखाने / सुतगिरण्या | १२.०० | १७.०० | १२.०० | १७.०० | —"— |
| | ब) ईत्तर प्रक्रीया / औद्योगिक संस्था | १२.०० | १७.०० | १२.०० | १७.०० | —"— |
| ८) | जीप खरेदीकरिता कर्जयोजना (शेतकी सहकारी संस्थामार्फत) | १३.०० | १६.०० | १४.०० | १६.०० | —"— |

बिगर शेती संस्थांना आकारावयाचे व्याजर -

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रामीण कारागिर बलुतेदार संस्था. कंपोझीट कर्ज / कॅश क्रेडीट | | | | | |
| | अ) रु. २५०००/- पर्यंत | ९.०० | १२.५० | ९.०० | १२.५० | —"— |
| | ब) रु. २५०००/- चे वर | ११.५० | १४.०० | ११.५० | १४.०० | —"— |

| अ.न. | संस्थांचा प्रकार | कर्जाचा प्रकार | सध्याचा व्याजदर | सुधारीत व्याजदर | लागू करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| २ | विपणन, ग्राहक औद्योगिक | अ) क्लिन कॅश क्रेडीट | १७.५० | १७.५० | १।५।९८ |
| | | ब) नजरगहाण कॅश क्रेडीट | १६.५० | १६.५० | |
| | | क) ताबेगहाण कॅश क्रेडीट | १६.०० | १६.०० | |
| | | ड) फेरताबेगहाण कॅश क्रेडीट | १६.५० | १६.५० | |
| | | इ) मांडवली कर्ज (म.मु.) | १६.०० | १६.०० | |
| ३ | प्रक्रीया | अ) क्लिन कॅश क्रेडीट | १७.५० | १६.५० | |
| | | ब) नजरगहाण कॅश क्रेडीट | १६.५० | १६.५० | |
| | | क) ताबेगहाण कॅश क्रेडीट | १६.०० | १६.०० | |
| ४ | पगारदार सेवकांच्या पतसंस्था | अ) क्लिन कॅश क्रेडीट | १६.५० | १६.५० | |
| | | ब) मध्यममुदती फिक्सलोन | १६.५० | १६.५० | |
| ५ | ब्रिज लोन (अंतरीम सर्वप्रकारचे) | — | १७.०० | १७.०० | |
| ६ | विणकर सह. संस्था | अ) हातमाग कॅश क्रेडीट | ११.५० | ११.५० | |
| | | ब) यंत्रमाग कॅश क्रेडीट | १५.०० | १५.०० | |
| ७ | नागरी सहकारी बँका | कॅश क्रेडीट | १४.५० | १४.०० | |
| ८ | नागरी सहकारी पत संस्था | कॅश क्रेडीट | १७.५० | १७.०० | |
| ९ | वैयक्तीक कर्जावरील व्याजदर | | | | |
| | १) सुवर्णतारण कर्ज | अ) सर्वसाधारण | १६.०० | १६.०० | |
| | | ब) शेतकऱ्यांसाठी (७/१२ घेऊन) | १४.०० | १४.०० | |
| | २) वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट | (वैय. बचत ठेव खात्यावरील) | १८.०० | १८.०० | |
| | ३) वैयक्तीक ग्राहकोपयोगी कर्जे | | १८.०० | १८.०० | |
| | ४) वाहन खरेदी - वैयक्तिक | लाभधारकांना खाजगी उपयोगासाठी | १६.०० | १६.०० | |
| | ५) रोड ट्रान्सपोर्ट (सिडबी उद्योजकांकरिता) | | १६.०० | १६.०० | |
| | ६) राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (एन.एस.सी.) | | — | १७.०० | |

- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११(१७): महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळासाठी सन १९९८-९९ मध्ये होणाऱ्या संचालकांच्या पंचवार्षिक निवडणूकीमध्ये

आपल्या बॅंकेच्या वतीने भाग घेण्याचा / मतदान करण्याचा अधिकार देण्याबाबत .....

ठराव क्रमांक ११(१७) :- महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक लि. मुंबई या बॅंकेच्या दि. १७।४।१९९८ रोजीच्या पत्र क्रमांक ८८/ बॅंकींग / भाग विभाग/ निवडणूक ३०/९८-९९ नुसार ह्या बॅंकेच्या संचालक मंडळाकरिता १९९८-९९ मध्ये होणाऱ्या संचालकांच्या पंचवार्षिक निवडणूकीमध्ये आपल्या बॅंकेच्या वतीने भाग घेण्याचा / मतदान करण्याचा अधिकार मा. श्रीमती सुमनताई देवरावजी ईटनकर यांना देण्यांत यावा, असे ठरविण्यांत आले. या ठरावाची सत्यप्रत प्रमाणित करण्याचा अधिकार श्री. ए.एन. चौधरी सरव्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११(१८) :- श्री. ए.जी. बेनोडेकर विशेष कार्यासन अधिकारी, यांनी बॅंकेच्या परसेवेतून मुक्त करण्याबाबत केलेल्या विनंती अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ११(१८) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, राज्य बॅंकेचे अधिकारी श्री. ए.जी. बेनोडेकर हे विशेष कार्यासन अधिकारी म्हणून आपल्या बॅंकेत दि. १९-८-१९९६ पासून परसेवेवर कार्यरत आहेत. त्यांचा परसेवेचा कालावधी दिनांक १८।८।१९९८ ला संपणार आहे. परंतु प्रकृती अस्वास्थामुळे त्यांनी बॅंकेत काम करणे शक्य होणार नसल्याने परसेवेतून मुदतपूर्व मुक्त करण्याबाबत दि. १४।३/१९९८ चे अर्जानुसार विनंती केली आहे. श्री. बेनोडेकर यांनी आपले बॅंकेची जवळपास पावणेदोन वर्षे प्रामाणिकपणे व यशस्वीरित्या सेवा केली त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होउन श्री. ए.जी. बेनोडेकर यांना त्यांचे विनंतीनुसार बॅंकेच्या परसेवेतून मुक्त करण्यांत यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ११(१९) :- बॅंकेच्या रिक्त असलेल्या व्यवस्थापकाचे जागेवर नियुक्ती करण्याबाबत .....

ठराव क्रमांक ११(१९) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बॅंकेत सद्या व्यवस्थापकाचे

पद रिक्त आहे. आतापर्यंत या पदाची जबाबदारी श्री. बेनोडेकर, विशेष कार्यासन अधिकारी हे पहात होते परंतू प्रकृती अस्वास्थ्यामुळे परसेवेतून मुक्त करण्याबाबत विनंती केल्यामुळे त्यांना बँकेच्या परसेवेतून मुक्त करण्याचे ठरले आहे. त्यामुळे व्यवस्थापकाची जागा त्वरीत भरणे आवश्यक झाले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या व्यवस्थापकपदी योग्य, अनुभवी व कार्यकुशल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ११(२०) : बँकेच्या संचालकांना सन १९९७-९८ ची भेटवस्तु देणेबाबत..

ठराव क्रमांक ११(२०) : बँकेच्या मा. संचालकांना सन १९९७-९८ ची भेटवस्तु रुपये ३००/- (अक्षरी तीनशे फक्त) किंमतीची देण्यांत यावी. ही भेटवस्तु संचालकाने स्वतः खरेदी करावी व बिल बँकेस सादर करावे. भेटवस्तु रुपये ३००/- पेक्षा जास्त किंमतीची असल्यास बँक फक्त रु. ३००/- देईल. उर्वरित रक्कम संचालकांनी स्वतः अदा करावी. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

यानंतर उपस्थितांचे आभार मानुन मा. उपाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक　　　　अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि. नागपूर

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा शुक्रवार दिनांक २९/५/१९९८ रोजी दुपारी २.०० वाजता बँकेच्या मुख्यकार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृति सभागृहात बँकेचे उपाध्यक्ष मा.श्री. वसंतराव पाराशिवनीकर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.

या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्री. वसंतराव पाराशिवनीकर | उपाध्यक्ष व सभाध्यक्ष |
| २. मा. श्री. भा.चं. शहाणे | संचालक |
| ३. मा. श्री. र. गो. बंग | " |
| ४. मा. श्री. श्री. ब. आस्टनकर | " |
| ५. मा. श्री. शि. ज. यादव | " |
| ६. मा. श्री. अ. य. खराडे | " |
| ७. मा. श्री. व. गो. मनकवडे | " |
| ८. मा. श्री. बा. ना. दियेवार | " |
| ९. मा. श्री. चं. शं. देशमुख | " |
| १०. मा. श्री. श्री. डो. दरणे | " |
| ११. मा. श्री. वि. जा. राऊत | " |
| १२. मा. श्री. म. जा. नायडू | " |
| १३. मा. श्री. सु. सो. पोनीकर | " |
| १४. मा. श्री. म. अ. बिनेकर | " |
| १५. मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १६. मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १७. मा. श्री. र. दे. दुरगकर | " |
| १८. मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| १९. मा. श्री. रा. गो. कापसे | " |
| २०. मा. श्री. ब. न. येरपूडे | " |
| २१. मा. सौ. सु. ग. किम्मतकर | संचालिका |
| २२. मा. कु. मं. र. बांगडे | " |

२३. मा. डॉ. वा. रा. कोरपे, प्रतिनीधी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई.
२४. मा. श्री. पुरुषोत्तम डाखोळे, अध्यक्ष जिल्हा परिषद, नागपूर
२५. मा. श्री. आर. आर. खोबरागडे कर्मचारी प्रतिनीधी
२६. मा. श्री. ए. जी. गोरखले, मुख्य हिशेबनीस

– अनुपस्थित –

१. मा. श्री. द्वा. शी. कांकाणी — अध्यक्ष
२. मा. श्री. सुनिल केदार — संचालक
३. मा. श्रीमती. सु. दे. ईस्नकर — संचालिका
४. मा. श्री. बा. मा. तिडके, प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई.
५. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
६. मा. श्री. जी. ए. अलोनी — कर्मचारी प्रतिनीधी
७. मा. श्री. एस. जी. बोरकर — "
८. मा. श्री. डि. पेन्हा, सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर (निमंत्रित)
९. मा. श्री. एस. एस. नानोटकर, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. विभागीय कार्यालय नागपूर (निमंत्रित).
१०. मा. श्री. एस. एस. सुपे, विशेष लेखा परिक्षक, वर्ग १, सह. संस्था (बँक) नागपूर (निमंत्रित)
११. मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक
१२ मा. श्री अ. य. गुजर — संचालक

सभेच्या कार्यवाहीस सुरवात करण्यापूर्वी मुख्याधिकारी, श्री. ए. जी. शोरवले यांनी सभेला माहिती दिली की, बँकेचे अध्यक्ष मा. श्री. द्वा. शी. कांकाणी व सरव्यवस्थापक मा. श्री. ए. एन. चौधरी अल्पमुदती शेती कर्जाचे रुपांतराबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मुंबई येथे बोलावलेल्या सभेला उपस्थित राहण्यासाठी गेले आहेत तसेच मा. श्री. बेनोडेकर, यांचे मेहुणे वारल्यामुळे रजेवर गेले आहेत, त्यामुळे ते सभेला उपस्थित राहु शकणार नाही. सभेत अध्यक्ष मा. श्री. द्वा. शी. कांकाणी, संचालक मा. श्री. सुनिल केदार, मा. श्रीमती सु. दे. ईस्नकर व सरव्यवस्थापक श्री. श्री. ए. एन. चौधरी, मा. श्री. अ. य. गुजर यांचे अनुपस्थितीची नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर मा. श्री. वसंतराव पारशिवनीकर उपाध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली सभेच्या कार्यवाहीस सुरवात करण्यांत आली.

विषयपत्रिकेवरील विषयावर सभेच्या कार्यवाहीस सुरवात करण्यापूर्वी मा. सभाध्यक्ष यांनी, बँकेचे माजी संचालक श्री. हजारीलाल जेठानंद जानी यांचे निधन झाल्याची माहिती सभेला दिली. सभेतील उपस्थितीतांनी दोन मिनीटे उभे राहून कै. जानी यांना श्रध्दांजली अर्पण करावी, अशी विनंती केली. त्यानुसार सभेतील उपस्थितांनी दोन मिनीटे उभे राहून कै. जानी यांना श्रध्दांजली अर्पण केली.

यानंतर खालीलप्रमाणे दु:खवटयाचा ठराव मंजूर करण्यांत आला

— ठराव —

बँकेचे माजी संचालक, सुप्रसिध्द व्यवसायी व सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते श्री. हजारीलाल जेठानंद जानी यांचे दि. २०।३।९८ रोजी दु:खद निधन झाले. श्री. जानी हे सन १९८६ ते १९९३ पर्यंत बँकेचे संचालक होते. श्री. जानी यांच्या मृत्युमुळे त्यांचे कुटुंबियावर व आप्त स्वकीयांवर ओढवलेल्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. परमेश्वर त्यांचे आत्म्यास शांती आणि सद्गती देवो, ही प्रभूचरणी प्रार्थना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

यानंतर नागपूर जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचीत अध्यक्ष मा. श्री. पुरूषोत्तमराव डाखोळे यांचे मा. सभाध्यक्ष यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व उपस्थितांचे स्वागत करून सभेच्या विषयपत्रिकेनरील विषयानुसार सभेची कार्यवाही सुरु केली.

विषय क्रमांक १:. मागील दि. ५।५।१९९८ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. सभाध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने चर्चा करतांना कर्मचारी प्रतिनीधी श्री. आर.आर. खोबरागडे म्हणाले की, मागील सभेचे वेळी दि. १४।३।९८ चे प्रतिवृत्त कायम करण्या बाबतचे विषय क्रमांक १ वरील चर्चेचे वेळी, "प्रतिवृत्त कायम करण्यास आमची मंजूरी नाही" असे म्हटले होते व तसे लेखी पत्रही मा. अध्यक्ष यांना देण्यांत आले होते परंतु त्याचा उल्लेख प्रतिवृत्तात करण्यांत आलेला नाही. यावर मा. सभाध्यक्ष म्हणाले की, दि. १४।३।९८ चे सभेला कर्मचारी प्रतिनीधी हजर नसल्याने त्या प्रतिवृत्ताशी कर्मचारी प्रतिनीधी यांचा संबंध नसल्याने त्यांचे मंजूरी अथवा नामंजूरीचा प्रश्नच येत नाही असे मा. अध्यक्ष यांनी मागील दि. ५।५।१९९८ चे सभेचे वेळी विषय क्रमांक १ वरील चर्चेचे वेळी सांगितले होते त्यामुळे प्रतिवृत्तात उल्लेख करण्यांत आलेला नाही. मा. श्री. ब.न. येरपुडे चर्चेत भाग घेतांना म्हणाले की, दि. १४।३।९८ ला कर्मचारी प्रतिनीधी सभेला हजर नसल्याने, त्या सभेत घेतलेल्या निर्णयाशी त्यांचा संबंध पोहचत नाही किंवा त्यांना जबाबदार धरण्यांत येत नसल्याने हा प्रश्न निर्माण करण्याची गरज नाही त्यामूळे याबाबत चर्चा थांबवून दि. ५।५।९८ चे प्रतिवृत्त कायम करण्याबाबत सभेने विचार करावा त्यांचे मतास इतरही संचालकांनी सहमती दर्शविली.

विषयावर सविस्तर चर्चा करून. मागील दि. ५।५।१९९८ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळ सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

- ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ :: मागील सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :: मा. सभाध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व मागील दिनांक ५।५।१९९८ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाचे सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ :: बँकेच्या पोटनियमात बदल करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ३ :: मा. सभाध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगीतले की, मागील मा. संचालक मंडळाचे सभेत अर्बन सहकारी बँकांचे कर्जपुरवठ्याचे धोरणात बदल करण्यांत आला असून सुधारीत धोरणानुसार नागरी बँकांनी २½% प्रमाणे शेअर्स खरेदी करावयाचे आहेत. बँकेच्या पोटनियम क्रमांक १३(ii) मध्ये दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तसेच नाबार्डच्या वेळोवेळी लागू होणाऱ्या योजनेनुसार वाढीव मर्यादेचा लाभ वैयक्तीक भागधारकांना देण्याकरिता प्रत्येक वेळी बदल करावा लागतो त्यामुळे सध्या असलेली रु. १०.०० लाखाची मर्यादा. नाबार्डने वेळोवेळी ठरविलेल्या मर्यादेपर्यंत करण्यासाठी पोटनियम क्रमांक ५३ मध्ये दुरूस्ती करणे आवश्यक आहे. पोटनियमांची सध्याची वाक्यरचना व सुधारीत बदल खालीलप्रमाणे सुचविण्यांत येत आहे.

| Byelaw No. | Wording of Existing Byelaw | Amendment Proposed | Wording of the Byelaw after Amendment | Reason |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 13(ii) IInd Para | Provided all societies other than Agricultural credit societies, the Marketing and Processing societies and Consumer stores borrowing Loan from | Provided all societies other than Agricultural credit societies borrowing from bank shall take the shares of the bank as stated below- | Provided all societies other than Agricultural credit societies borrowing from bank shall take the shares of the bank as stated below- | In order to give facility under share holding to Urban Co-operative banks. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | the central Bank shall taken shares to the extent of 5% of the maximum borrowings. The Marketing and processing Societies and consumers stores shall, however take 1% shares of the Maximum borrowing from the central Co-operative Bank. | 1. Marketing, Processing societies and consumer stores— 1% of the maximum borrowing. 2. Urban co-operative Bank - 2½ % of the limit santioned. 3. All other societies not included above- 5% of the maximum borrowing. | 1. Marketing Processing societies and consumer stores— 1% of the maximum borrowing. 2. Urban co-operative Bank - 2½ % of the limit sanctioned. 3. All other societies not included above- 5% of the maximum borrowing. | |
| 5.3 (ii) | A loan to an individual members including group of individual, partnership or proprietary firms and co-operative enterprises shall not exceed Rs. 10,00000/- except in the case of loans against the security of fixed deposit | A loan to an individuals, partnership or proprietory firms shall not exceed the limit fixed by NABARD from to time except incase of loans against the security of fixed deposit. | A loan to an individuals partnership or proprietary firms shall not exceed the limit fixed by NABARD from to time except incase of loans against the security of fixed deposit. | Since NABARD has enhanced the limits for individuals. |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे पोटनियम दुरुस्तीस येत्या आमसभेत मंजूरी घेण्यांत यावी, असे ठरले.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ४ : मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ४(अ) : सन् १९९७-९८ करिता रूपांतर कर्जमर्यादा रु. १७.६० कोटी मंजूर करण्याबाबत महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ४(अ) : मा. सभाध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन् १९९७-९८ करिता रूपांतर कर्जमर्यादा

रु.१७.६० कोटी मंजूर करण्यासाठी अर्ज करावयाचा असल्याने अजसिोबत संचालक मंडळाचा ठराव पाठविणे आवश्यक आहे. विषयावर सविस्तर चर्चा होऊन, खालील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत आला.

— Resolution —

Resolved to borrow during the year 1997-98 from The Maharashtra State co-operative Bank Ltd. (Incorporating The Vidarbha co-operative Bank Ltd.) Bombay Rs. 1760.00 lakhs (Rs. One thousand seven hundred sixty lakhs) only of which Rs. 1760.00 Lakhs for a period of three years and Rs. NIL for a period of five years for converting into Medium Term loans, the short term Agricultural loans due to the Maharashtra State co-op. Bank Ltd. and to request that Bank to apply to the National Bank for Agriculture and Rural Development (NABARD) for a like sum of lower sum or our behalf under section 22 of the National Bank for Agriculture and Rural Development Act. 1981.

Passed Unanimously.

—

विषय क्रमांक ४(ब): बँकेच्या अधिकाऱ्यांना सन १९९८-९९ सालाकरिता वसुलीचे अधिकार प्रदान करण्याकरिता मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ४(ब): बँकेच्या थकीत कर्जाची वसुली करण्याकरिता मा. जिल्हा उपनिबंधक, सह.संस्था, नागपूर यांचे दि.३० जून १९९६ चे पत्रानुसार वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना प्रदान केलेल्या अधिकाराची मुदत दि.३०।६।१९९८ ला संपुष्टात येत आहे.

| अ.न. | अधिकाऱ्यांचे नांव | हुद्दा | मुख्यालय | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| | सर्वश्री – | | | |
| १. | ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक | नागपूर | नागपूर जिल्हा |
| २. | सी. एन. डोईफोडे | मुख्याधिकारी | " | " |
| ३ | व्ही. एस. राऊत | " | " | " |
| ४ | ए. बी. देशमुख | " | " | " |
| ५ | ए. आर. गवळी | " | " | " |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | एस. एस. गोडे | मुख्याधिकारी | नागपूर | नागपूर जिल्हा |
| ७ | ए. जी. गोखले | —"— | —"— | —"— |
| ८ | एस. आर. वरूडकर | विशेष वसुली अधि. | कामठी | —"— |
| ९ | पी. बी. राठोड | —"— | हिंगणा | —"— |
| १० | पी. एन. घोडे | —"— | कळमेश्वर | —"— |
| ११ | अ. ने. पूरी | —"— | काटोल | —"— |
| १२ | व्ही. बी. खुने | —"— | —"— | —"— |
| १३ | एस. ए. हुने | —"— | नरखेड | —"— |
| १४ | पी. एन. उल्लेवार | —"— | सावनेर | —"— |
| १५ | एन. एन. देशमुख | —"— | भिवापूर | —"— |
| १६ | बी. डी. उरकुडे | —"— | पारशिवनी | —"— |
| १७ | एस. एन. देशभ्रतार | —"— | रामटेक | —"— |
| १८ | टी. एन. काळमेघ | —"— | मौदा | —"— |
| १९ | एस. एम. शेरकी | —"— | उमरेड | —"— |
| २० | आर. जी. पाटील | —"— | कुही | —"— |
| २१ | एस. बी. निकम | —"— | नागपूर | —"— |

हि मुदत एक वर्षाकरिता म्हणजे दि. २०।६।१९९९ पर्यंत वाढवून मिळण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ४(३):. दैनिक रोजंदारीवर/तात्पुरती नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्यांचे मजूरीत/पगारात वाढ करण्याबाबत ....

ठराव क्रमांक ४(३):. बँकेत कर्मचाऱ्यांची कमतरता आहे अशा परिस्थितीत एखादा कर्मचारी रजेवर गेल्यास अथवा कामाची निकड लक्षात घेऊन रोजंदारीवर कर्मचारी ठेवण्यांत येतात. परंतु सध्या असलेले दैनिक मजूरीचे दर फारच अल्प आहेत त्यामुळे वेळेवर कर्मचारी मिळत नाही. सध्याची वाढती महागाई लक्षात घेता मजूरीचे दरात वाढ करणे आवश्यक आहे. ही वाढ खालीलप्रमाणे दि. १।७।१९९८ पासून करण्यांत यावी.

| श्रेणी | दैनिक मजूरी (रुपये) |
|---|---|
| १. चपराशी | २५/- |
| २. लिपिक | ५०/- |

वरीलप्रमाणे दैनिक मजूरीचे दरात वाढ करण्यांत यावी. तथापी दैनिक मजूरीवर कर्मचारी ठेवतांना खालील अटीचे तंतोतंत पालन करणे आवश्यक राहील.

१. शाखेतील चपराशी सुटीवर असल्यास शाखेतील कामाची निकड लक्षात घेऊन, रोजंदारीवर कर्मचारी ठेवण्यांत यावा व त्याच दिवशी त्यांना मजूरी अदा करुन मोकळे करावे परंतु एकाच कर्मचाऱ्याला सतत तीन दिवसाचे वर रोजंदारीवर ठेवु नये.

२. मुख्य कार्यालयाचे परवानगीशिवाय शाखेत लिपीक म्हणून कोणालही दैनिक रोजंदारीवर ठेवण्यांत घेवु नये.

३. शाखेत चपराशी असतांनासुध्दा, दैनिक रोजंदारीवर चपराशी ठेवल्यास व त्यासाठी मुख्य कार्यालयाची पूर्व परवानगी घेतली नसल्यास अशा कर्मचाऱ्यास अदा केलेली मजूरी संबंधीत शाखा व्यवस्थापकाकडून वसूल करण्यांत यावी. ~~तसेच याबाबतीत कायदेशिर गुंतागुंत निर्माण झाल्यास त्याची~~ याबाबत काही कायदेशिर गुंतागुंत निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी शाखा व्यवस्थापकावर राहील.

तसेच, नविन नियुक्ती करतांना तात्पुरत्या कालावधीकरिता रु.१५००/- व चपराशी यांचेकरिता रु.१०५०/- या प्रकारे एकत्रीत मासिक पगारमान द्यावे.

सुचक : श्री. र.व्यं. निमजे
अनुमोदक : श्री. सु.सो. पॉनीकर

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.४(६) : गटसचिवांचा संप असतांनासुध्दा कर्जवाटपाचे काम करणाऱ्या निरिक्षकांना प्रोत्साहनपर मोबदला देण्याबाबत ....

ठराव क्र.४(६) : गेल्या दोन वर्षापासून कर्जवाटप व वसुली हंगामात गटसचिवांनी संपावर जाऊन बँकेच्या कामात अडथळा निर्माण केली परंतु अडचणीचे काळातसुध्दा बँकेच्या निरीक्षकांनी कर्जवाटप व वसुलीचे कामात मोलाचे सहकार्य केल्यामुळे त्यांना प्रोत्साहनपर मोबदला वस्तुरुपात अथवा रोखीने देण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा.अध्यक्ष यांना देण्यांत येत आहेत.

सुचक - श्री. बा.ना. दिघेकार
अनुमोदक - श्री. मो.बि. निमजे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर मा. सभाध्यक्ष यांनी उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहिर केले.

मुख्य हिशोबनीस     उपाध्यक्ष तथा सभाध्यक्ष
दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप बँक लि. नागपूर

बॅंकेच्या मा. संचालक मंडळाची सभा शनिवार दि.१५।८।८८ रोजी दुपारी १.०० वाजता बॅंकेच्या मुख्यकार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृति सभागृहात बॅंकेचे अध्यक्ष मा. श्री. द्वा. शि. कांकाणी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

१. मा. श्री. द्वा. शि. कांकाणी — अध्यक्ष
२. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर — उपाध्यक्ष
३. मा. श्री. र. गो. बंग — संचालक
४. मा. श्री. श्या. चं. शहाणे — "
५. मा. श्री. श्री. ब. आसरणकर — "
६. मा. श्री. शि. ज. यादव — "
७. मा. श्री. अ. य. खराडे — "
८. मा. श्री. व. गो. मनकवडे — "
९. मा. श्री. बा. ना. दिवेवार — "
१०. मा. श्री. चं. शं. देशमुख — "
११. मा. श्री. श्या. डो. दरणे — "
१२. मा. श्री. म. जी. नायडू — "
१३. मा. श्री. म. अ. बिनेकर — "
१४. मा. श्री. सु. सो. पोंनीकर — "
१५. मा. श्री. मो. वि. निमजे — "
१६. मा. श्री. र. व्यं. निमजे — "
१७. मा. श्री. र. दे. दुरगकर — "
१८. मा. श्री. सुनिल केदार — "
१९. मा. श्री. रा. गो. कापसे — "
२०. मा. श्री. बं. न. घेरपुडे — "
२१. मा. श्रीमती सु. दे. ईटनकर — संचालिका
२२. मा. सौ. कु. ग. किम्मतकर — "
२३. मा. कु. मंदाताई बांगडे — "
२४. मा. डॉ. वा. रा. कोरपे, प्रतिनीधी, म. रा. सह. बॅंक लि. मुंबई.
२५. मा. श्री. जी. ए. अलोणी — कर्मचारी प्रतिनीधी
२६. मा. श्री. एस. जी. बोरकर — "
२७. मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

— अनुपस्थित —

१. मा. श्री. अ. य. गुजर संचालक
२. मा. श्री. वि. जा. राउत "
३. मा. श्री. मु. भि. पन्नासे "
४. मा. श्री. बा. मा. तिडके प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य सह. कृषि व ग्रामिण विकास बँक लि. मुंबई
५. मा. श्री. पुरुषोत्तम डाखोळे, अध्यक्ष जिल्हा परिषद, नागपूर.
६. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
७. मा. श्री. आर. आर. खोबरागडे — कर्मचारी प्रतिनीधी
८. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर (निमंत्रीत)
९. मा. विभागिय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. विभागीय कार्यालय, नागपूर (निमंत्रित)
१०. मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग १ सह. संस्था (बँक) नागपूर (निमंत्रीत)

—

सभेच्या कार्यवाहीस सुरवात करण्यापूर्वी संचालक सर्वश्री अ. य. गुजर, वि. जा. राउत व मु. भि. पन्नासे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर, मा. अध्यक्ष यांनी बँकेचे संचालक मा. श्री. श्रीरामजी आस्वाकर यांची महाराष्ट्र स्टेट मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबईचे संचालकपदी अविरोध निवड झाल्याची माहिती सभेला दिली. बँकेच्या संचालक मंडळाचे वतीने श्री. आस्वाकर यांचे अभिनंदन करण्यांत आले.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेच्या कार्यवाहीस सुरवात केली.

विषय क्रमांक १:. मागील दिनांक २५।५।१९९८ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक २५।५।९८ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळ सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक २: मागील सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २: मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक २५।५।१९९८ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाचे सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३: बँकेच्या अद्यावत कर्जवाटप व वसुलीचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक ३: मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व कर्जवाटपाचे स्थितीबाबत सभेला माहिती देतांना सांगितले की, सन १९९७-९८ मध्ये नागपूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पिकांची मोठ्या प्रमाणात हाणी झाली. त्यामुळे जिल्ह्यातील बहुतांशी सर्वच गावांची पैसेवारी ५० पैसे अथवा त्यापेक्षा कमी जाहिर झाल्याने शासनाचे निर्णयानुसार शेतकऱ्यांनी सन १९९७-९८ चे हंगामात घेतलेल्या पीक कर्जाचे रुपांतर करुन त्यांना चालु वर्षी म्हणजे सन १९९८-९९ खरीप हंगामाकरिता बँकेने कर्जपुरवठा केलेला आहे. जिल्ह्यातील गटसचिव बेमुदत संपावर असतांना सुध्दा बँकेचे निरिक्षकांमार्फत सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष व पंचकमेटीच्या सदस्यांच्या मदतीने दि. ३०।[illegible]।१९९८ पर्यंत बँकेने एकूण १५६६५ सभासदांना रु. १५३६.३७ लाखाचे कर्जवाटप केलेले आहे. यात रुपांतरास पात्र ८००३ सभासदांना रुपये ७१५.६२ लाखाचे कर्जवाटपाचा समावेश आहे.

शेतकी अल्पमुदत कर्जवसुलीचे संदर्भात चर्चा करतांना मा. अध्यक्ष म्हणाले की, सन १९९७-९८ मध्ये बँक कर्जाची वसुली प्रभावीपणे करण्यासाठी दि. ५।७।९७ चे मा. संचालक मंडळाने "वसुली क्रांती कार्यक्रम" मंजूर केला. या कार्यक्रमांतर्गत संस्थावार सभासदांच्या कर्जमागणी याद्या कापूस संकलन केंद्र, एकाधिकार ज्वार खरेदी केंद्र, साखर कारखाना, कृषि उत्पन्न बाजार समिती इ. कडे पाठविण्यांत आल्यात. थकबाकीदार सभासदांना त्यांचेकडील कर्जाची जाणीव व्हावी याकरिता कर्जमागणी सुचनापत्रे व जप्तीपूर्व नोटिसेस पाठविण्यांत आल्या. परंतु खरीप व रब्बी दोन्ही पिकांचे हंगामात अतिवृष्टीमुळे पिकांची मोठ्या प्रमाणावर

हानी झाल्याने वसुली यंत्रणा प्रभावीपणे राबविता आली नाही. शासनाने नागपूर जिल्ह्यातील एकुण १६६२ खरीप गांवापैकी १३७८ गावांची तसेच रब्बीचे ५११ गावांपैकी ५०४ गावांची पैसेवारी ५० पैसे व खाली जाहिर झाल्याने टंचाईग्रस्त गांवे घोषित केली. त्यामुळे खरीप व रब्बी पिकातून बँकेची अपेक्षेप्रमाणे वसुली होऊ शकली नाही. मागील वर्षी अल्पमुदती शेती कर्जाची वसुली ३२.३२ टक्के होती ती यावर्षी दुष्काळी परिस्थीतीमुळे फक्त ९.९५ टक्के झाली.

विषयाचे अनुषंगाने सभेत सविस्तर चर्चा होऊन, बँकेच्या अद्यावत शेतकी कर्जवाटपाचा तसेच वसुलीबाबतचा सभेत आढावा घेण्यांत आला.

—

विषय क्रमांक ४:: सन् १९९७-९८ या आर्थिक वर्षातील शाखा ठेवीचे उद्दिष्टे व पुर्ततेबाबतचा आढावा घेऊन सन् १९९८-९९ या वर्षाकरिता शाखा ठेवीचे उद्दिष्ठ निर्धारित करणे.

ठराव क्रमांक ४:: मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दि. ३१।३।१९९८ अखेर बँकेच्या मुख्यकार्यालयासह एकुण ८६ शाखा कार्यरत होत्या. सन् १९९७-९८ या वर्षाकरिता शाखांना रु. २०३.६० कोटीचे ठेवीचे उद्दिष्ठ देण्यांत आले होते. प्रत्यक्षात बँकेने रुपये २०९.९२ कोटीच्या ठेवी प्राप्त केलेल्या आहेत. म्हणजेच उद्दिष्ठापेक्षा बँकेने रुपये ६.३२ कोटीच्या ठेवी जास्त मिळविलेल्या आहेत. मागील ३ वर्षातील ठेवी वाढीचा वेग व गत वर्षातील ठेवींची परिस्थीती विचारात घेऊन सन् १९९८-९९ करिता खालीलप्रमाणे ठेवीची उद्दिष्टे सुचविण्यांत येत आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, बँकेच्या सन् १९९७-९८ या आर्थिक वर्षातील ठेवींची उद्दिष्टे व पुर्ततेबाबत सभेत आढावा घेण्यांत आला व सन् १९९८-९९ करिता खालीलप्रमाणे ठेवींचे उद्दिष्ठ निर्धारित करण्यांत आले.

| अ.क्र. | शाखा | सन् १९९७-९८चे उद्दिष्ठ | प्राप्त ठेवी | सन् १९९८-९९ करिता निर्धारित उद्दिष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यालय | ६७०.०० | १५१७.६३ | १६००.०० |
| २ | महाल | १०६०.०० | १०३०.०० | ११६०.०० |
| ३ | धान्यगंज | १३०.०० | १२०.२९ | १५५.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | पांचपावली | ३३०.०० | ३२५.९० | ३९०.०० |
| ५. | हनुमाननगर | ४९०.०० | ४७८.९४ | ५९०.०० |
| ६ | सक्करदरा | — | ८२.९१ | ११०.०० |
| ७ | रामनगर | ७४०.०० | ८९७.९९ | ११००.०० |
| ८ | धंतोली | ५२०.०० | ५३२.११ | ६५०.०० |
| ९ | जिल्हा परिषद | १७५०.०० | २६६६.५३ | ३३२०.०० |
| १० | गांधीबाग | ४१०.०० | ३९२.६४ | ४७५.०० |
| ११ | जरीपटका | १२०.०० | १२३.७४ | १६०.०० |
| १२ | वाडी | ९५.०० | ७९.०१ | ९६.०० |
| १३ | गणेशपेठ | ५००.०० | ४०१.७६ | ५००.०० |
| १४ | ककमणाबाजार | १६०.०० | १९५.४६ | २३०.०० |
| १५ | बुटीबोरी | ५१५.०० | ४४८.८४ | ५५०.०० |
| १६ | पेठ | २००.०० | २०३.९५ | २४०.०० |
| १७. | विहिरगांव | ९०.०० | ८८.९३ | १०६.०० |
| १८. | फेटरी | १०५.०० | १०१.०८ | १२०.०० |
| १९ | कामठी | ३६०.०० | ३७१.८८ | ४६०.०० |
| २० | वडोदा | ११०.०० | ९३.१५ | ११०.०० |
| २१ | दिघोरी स्टेशन | ६०.०० | ४८.१७ | ६०.०० |
| २२. | कोराडी | २९०.०० | ३३४.८६ | ४१५.०० |
| २३. | हिंगणा | ७५०.०० | ४६०.५२ | ५८०.०० |
| २४ | कान्होलीबारा | ११०.०० | ११०.४३ | १३०.०० |
| २५ | गुमगांव | १७५.०० | १५३.४९ | १७०.०० |
| २६. | कवडस | ३५.०० | २७.३७ | ३५.०० |
| २७ | टाकळघाट | ६०.०० | ६०.६३ | ७५.०० |
| २८ | मोहगांव | १०५.०० | १२०.२० | १५०.०० |
| २९ | अडेगांव | २५.०० | २५.४८ | ३०.०० |
| ३० | रामटेक | ३६५.०० | ४२७.९७ | ५२५.०० |
| ३१ | नगरधन | ३०.०० | ३९.२१ | ३५.०० |
| ३२ | पवनी | ८५.०० | ८०.३८ | ९०.०० |
| ३३ | देवलापार | ६०.०० | ५४.९७ | ६४.०० |
| ३४ | मनसर | १४०.०० | १४०.२० | १८०.०० |
| ३५ | पाराशिवनी | ५५०.०० | ४३०.८४ | ५१०.०० |
| ३६ | कन्हान | ३७०.०० | ३३३.१९ | ३९०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३७ | नवेगांव खैरी | ५०.०० | ३५.०१ | ४५.०० |
| ३८ | मौदा | ३००.०० | ३५४.३४ | ४२५.०० |
| ३९ | तारसा | १२५.०० | ११३.११ | १३८.०० |
| ४० | अरोली | ६०.०० | ६६.३३ | ६२.०० |
| ४१ | खात | १००.०० | ८०.९९ | १००.०० |
| ४२ | धानला | ८०.०० | ७७.०७ | ९०.०० |
| ४३ | मारोडी | १२०.०० | १०३.०६ | १२५.०० |
| ४४ | रेवराळ | ३५.०० | ५३.६५ | ४५.०० |
| ४५ | गोवरी | ९०.०० | ८१.११ | ९२.०० |
| ४६ | कोटोल | ४३०.०० | ४१७.६० | ५००.०० |
| ४७ | कोंढाळी | २७५.०० | २११.५३ | २९०.०० |
| ४८ | रिधोरा | १४०.०० | १३८.७५ | १६०.०० |
| ४९ | येनवा | ७५.०० | ५९.१२ | ७०.०० |
| ५० | पारडसिंगा | ११०.०० | ११८.०० | १४०.०० |
| ५१ | मेटपांजरा | ६५.०० | ६४.०४ | ८०.०० |
| ५२ | नरखेड | ३००.०० | ३४३.३३ | ४३०.०० |
| ५३ | मोवाड | १००.०० | १०१.४३ | १२०.०० |
| ५४ | जलालखेडा | २००.०० | १९०.०९ | २०५.०० |
| ५५ | सावरगांव | २१०.०० | १९९.०८ | २२०.०० |
| ५६ | पिपळा केवळराम | ५०.०० | ५३.५३ | ६५.०० |
| ५७ | लोहारीसावंगा | ४५.०० | ३८.४७ | ४६.०० |
| ५८ | खडपिवनी | ८५.०० | ६९.२४ | ८०.०० |
| ५९ | बेलोना | ७०.०० | ६७.५६ | ८०.०० |
| ६० | मेंढला | ७५.०० | ६३.१० | ७५.०० |
| ६१ | सावनेर | ७७५.०० | ६०७.२९ | ७४०.०० |
| ६२ | पाटणसावंगी | २७५.०० | २५३.२६ | २९०.०० |
| ६३ | खापा | ३५०.०० | २५०.९७ | ४२५.०० |
| ६४ | बडेगांव | ५५.०० | ४५.८० | ५५.०० |
| ६५ | केळवद | १७०.०० | १७३.४९ | २१५.०० |
| ६६ | नांदागोमुख | १०५.०० | ९६.१४ | ११०.०० |
| ६७ | खापरखेडा | ३००.०० | ३११.०१ | ३६०.०० |
| ६८ | कळमेश्वर | ५५०.०० | ४९३.३० | ५७५.०० |
| ६९ | मोहपा | १४०.०० | १७७.८१ | २१५.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७० | धापेवाडा | १५५.०० | १४९.२१ | १७५.०० |
| ७१ | कोहळी | ११५.०० | ११३.८३ | १२०.०० |
| ७२ | उमरेड | ४२५.०० | २७६.४९ | ४५०.०० |
| ७३ | सिर्सी | १७५.०० | १२०.२० | १५०.०० |
| ७४ | बेला | ४१०.०० | ३११.६६ | ३८०.०० |
| ७५ | पांचगांव | १५५.०० | १६३.५८ | १६५.०० |
| ७६ | मकरधोकडा | ९०.०० | ७९.२८ | ९५.०० |
| ७७ | ब्राम्हणी | ४५.०० | ३६.६३ | ४५.०० |
| ७८ | शेडेश्वर | ९०.०० | ८०.९७ | ९५.०० |
| ७९ | भिवापूर | २३५.०० | २००.११ | २४५.०० |
| ८० | नांद | ९५.०० | ७८.६८ | ९५.०० |
| ८१ | बेसूर | ६०.०० | ६५.६६ | ५५.०० |
| ८२ | जवळी | ३५.०० | ३०.३२ | ३६.०० |
| ८३ | कुही | ४३५.०० | ३४५.५३ | ४३५.०० |
| ८४ | वेलतूर | ७५.०० | ६३.०२ | ७५.०० |
| ८५ | मांढळ | १४०.०० | ११७.०२ | १४०.०० |
| ८६ | गोठणगांव | ४०.०० | २९.०२ | ४०.०० |
| | एकूण | २०३६०.०० | २०९९१.६५ | २५२०२.०० |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५ :. मा० अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ५(१) :. नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सन १९९७-९८ चे हंगामातील दुष्काळग्रस्त गांवातील व्याज भरपाई देण्याबाबतचा शासन निर्णय- सीसीआर-१४९८/प्र.क्र.१७६/२सी दि.१८ जून १९९८ प्रमाणे व्याज भरपाई करणेबाबत ...

ठराव क्रमांक ५(१) :. महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन विभागामार्फत सन् १९९७-९८ या वर्षासाठी खरीप आणि रब्बी हंगामातील ५० पैसे किंवा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या जिल्ह्यातील १८८० गांवे टंचाईग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या पिकांच्या झालेल्या हानीमुळे शेतकऱ्यांना त्यांचेकडून येणे असलेल्या अल्पमुदत कर्जावरील

व्याजाचा भरणा शासन करणार असल्याचे त्यांचे पत्र क्र. महाराष्ट्र शासन - सहकार व वस्त्रोद्योग विभाग / शासन निर्णय क्र. सीसीआर-१९९८ प्र.क्र.१७६/२ सी दि. १८ जून १९९८ नुसार सन १९९७-९८ या वर्षात टंचाईग्रस्त म्हणून घोषित झालेल्या गांवातील सहकारी संस्थांकडून अल्पमुदती पीककर्ज घेतलेल्या व रूपांतरास पात्र होणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचे कर्ज उचल केलेल्या दिवसापासून कर्ज रूपांतर होण्याचे तारखेपर्यंतचे अथवा ३०।६।९८ यापैकी अगोदरच्या तारखेपर्यंतचे अल्पमुदती पीक कर्जावरील देय व्याज संबंधित शेतकऱ्यांचे वतीने शासन देणार असल्याचे कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाचे सदर निर्णयाद्वारे जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे सन १९९७-९८ मध्ये अल्पमुदती खरीप व रब्बी पीक कर्ज घेतलेल्या सर्व सभासदांच्या कर्जावरील व्याजाची भरपाई करिता प्रस्ताव तयार करण्याचे काम पूर्ण करण्यांत आलेले आहे. जिल्ह्यातील ५९३ संस्थांचे एकूण २८०७३ सभासदास सन १९९७-९८ मध्ये रुपये २५७२.८७ लाख अल्पमुदत पीक कर्ज वाटप करण्यांत आले होते.

वरीलप्रमाणे जिल्ह्यातील ५९३ प्राथमीक सहकारी संस्थांचे सन १९९७-९८ हंगामातील दिलेल्या अल्पमुदती पीक कर्ज मर्यादेवर रकमेवरील व्याज भरपाई मागणीचे प्रस्तावावर सविस्तर विचार होऊन शासनाचे सन १९९७-९८ हंगामातील संस्थांच्या अल्पमुदती पीक कर्जवाटप केलेल्या रूपांतरपात्र तसेच संपूर्ण परतफेड करणाऱ्या सभासदांचे मिळून एकूण रु. ३२६.८६ लाख व्याज भरपाई रकमेस मंजूरी द्यावी अशी महाराष्ट्र शासनास विनंती करण्यांत येत आहे. या संबंधाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत वर दर्शविलेल्या व्याज भरपाई रकमेचा प्रस्ताव मंजूरीकरिता महाराष्ट्र शासनास पाठविण्यांत यावा.

विषयाचे अनुषंगाने ठरावावर सर्व अनुषंगीक बाबीवर चर्चा होऊन वरीलप्रमाणे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत आला.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५(२) :- बलुतेदार सहकारी संस्थांचे रौप्य महोत्सवी वर्षानिमित्ताने घेण्यांत आलेल्या राज्य स्तरीय संमेलनात शिफारस केल्यानुसार बलुतेदार सह. संस्थांची कर्जमंजूरी, वसुली व कामकाज इ. बाबत आढावा घेण्याकरिता संचालकांची स्वतंत्र उपसमिती गठीत करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(२) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दि. १५।११।९७ रोजी पुणे येथे झालेल्या बलुतेदार सहकारी संस्थांच्या राज्यस्तरीय संमेलनात बलुतेदार सह. संस्थांची कर्ज मंजूरी, कर्जवसुली व कामकाजाचा आढावा घेण्याकरिता संचालकांची स्वतंत्र समिती गठीत करण्याबाबत सुचीत करण्यांत आले आहे. सध्या बँकेत अशा संस्थांची कर्जप्रकरणे मा. कर्जउपसमितीचे सभेत निर्णयासाठी ठेवण्यांत येतात.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, बलुतेदार सह. संस्थांच्या राज्यस्तरीय संमेलनात सुचविल्याप्रमाणे या संस्थांच्या सभासदांना कर्जमंजूरी, वसुली व कामकाज इ. बाबत आढावा घेण्याकरिता ५ संचालकांची स्वतंत्र समिती गठीत करावी. ही समिती गठीत करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहेत, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(३) :. बँकेची सन १९९७-९८ ची वार्षिक साधारण सभा घेण्यास मुदतवाढ मिळण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ५(३) :. महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० नुसार दरवर्षी १४ ऑगष्ट पूर्वी वार्षिक साधारण सभा घेणे आवश्यक आहे. बँकेची सन १९९७-९८ ची वार्षिक साधारण सभा घ्यावयाची आहे. परंतु जिल्ह्यातील टंचाईग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान रकमेचे वाटप, अल्पमुदती कर्जाचे रुपांतर व व्याज माफीची प्रकरणे तयार करणे, गटसचिवांचा संप असल्याने बँकेच्या कर्मचाऱ्यांना कर्जवाटपाचे कामात लावणे इ. तांत्रीक अडचणीमुळे बँकेची आर्थिक पत्रके मुदतीचे आंत पूर्ण होऊ शकली नाही. तसेच आमसभेच्या पूर्वतयारीसाठी लागणारा कालावधी विचारात घेता, ही सभा घेण्यास बँकेला दि. १५.११.९८ पर्यंत मुदतवाढ मिळण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(४) :. वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट योजनेअंतर्गत कर्जवाटप वाढविण्याचे दृष्टीने कर्जवाटपाचे धोरणात बदल करण्याबाबत.

ठराव क्रमांक ५(४) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व

सभेला माहिती देतांना सांगितले की, आपले बँकेमार्फत पगार होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी बँकेने वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट योजना सुरु केली आहे. या योजनेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून या योजनेअंतर्गत वाटप केलेल्या मर्यादेवरील कर्जबाकी रुपये ६२५.०० लाख आहे. हे कर्ज सुरक्षित आहे. यापूर्वी आपण निव्वळ पगाराच्या सातपट अथवा रु. १.०० लाख यात कमी असलेल्या रकमेपर्यंत वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूर करण्यांत येते. कर्मचाऱ्यांचा निव्वळ पगार विचारात घेता कोणताही कर्मचारी रु. १.०० लाखाचे ओव्हरड्राफ्ट मर्यादेस पात्र ठरत नाही. ही मर्यादा ७ पटीवरुन १० पट केल्यास बँकेच्या कर्जवाटपात वाढ होऊन बँकेकडे असलेल्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक होऊ शकेल.

विषयाचे अनुषंगाने सभेत सविस्तर चर्चा होऊन, वैयक्तिक ओव्हरड्राफ्ट योजनेअंतर्गत कर्जवाटपाचे धोरणात खालील प्रमाणे बदल करण्यांत यावा असे ठरले.

१. निव्वळ मिळणाऱ्या ६ महिन्याच्या पगाराच्या सरासरी रकमेच्या १० पट येणारी रक्कम अथवा रु. १.०० लाख यामध्ये कमी असणारी रक्कम ओव्हरड्राफ्ट मर्यादा म्हणून मंजूर करण्यांत यावी.
२. या मर्यादेची दरवर्षी २० टक्केप्रमाणे मुळमर्यादा कमी करण्यांत येत असते. यापुढे ही मर्यादा दर सहा महिन्याने १० टक्के प्रमाणे कमी करुन उर्वरित मर्यादेचे वर्षाअखेर नुतनीकरण करण्यात यावे.
३. या कर्जावरील व्याजदर सहा महिन्याला एकमुस्त वसुल न करता दरमहा वसुल करण्यांत यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(५):. खाजगी उद्योग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्थांना करावयाचे कर्जपुरवठ्याचे धोरणात बदल करण्याबाबत..

ठराव क्रमांक ५(५):. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बुटीबोरी औद्योगीक क्षेत्रात नविन नविन खाजगी उद्योग येत असून त्यामधील कर्मचारी, सहकारी पतसंस्थेची स्थापना करुन बँकेकडे कर्जमागणी करीत आहेत. बँकेच्या धोरणानुसार पगारदार संस्थांना सभासद कर्जबाकीच्या ९० टक्केपर्यंत कर्जपुरवठा केला जातो. परंतु खाजगी उद्योगक्षेत्रातील कामगारांच्या नव्याने स्थापन होणाऱ्या सहकारी संस्थांना कर्ज मंजूर करतांना बँकेच्या हिताच्या दृष्टीने ही मर्यादा कमी करावी असे वाटते.

ठराव क्रमांक ५(२) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दि. १५।११।९७ रोजी पूणे येथे झालेल्या बलुतेदार सहकारी संस्थांच्या राज्यस्तरीय संमेलनात बलुतेदार सह. संस्थांची कर्ज मंजूरी, कर्जवसुली व कामकाजाचा आढावा घेण्याकरिता संचालकांची स्वतंत्र समिती गठीत करण्याबाबत सुचीत करण्यांत आले आहे. सद्या बँकेत अशा संस्थांची कर्जप्रकरणे मा. कर्जउपसमितीचे सभेत निर्णयासाठी ठेवण्यांत येतात.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, बलुतेदार सह. संस्थांच्या राज्यस्तरीय संमेलनात सुचविल्याप्रमाणे या संस्थांच्या सभासदांना कर्जमंजूरी, वसुली व कामकाज इ. बाबत आढावा घेण्याकरिता ५ संचालकांची स्वतंत्र समिती गठीत करावी. ही समिती गठीत करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहेत, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(३) :. बँकेची सन १९९७-९८ ची वार्षिक साधारण सभा घेण्यास मुदतवाढ मिळण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ५(३) :. महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० नुसार दरवर्षी १४ ऑगष्ट पूर्वी वार्षिक साधारण सभा घेणे आवश्यक आहे. बँकेची सन १९९७-९८ ची वार्षिक साधारण सभा घ्यावयाची आहे. परंतु जिल्ह्यातील टंचाईग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान रकमेचे वाटप, अल्पमुदती कर्जाचे रूपांतर व व्याज माफीची प्रकरणे तयार करणे, गटसचिवांचा संप असल्याने बँकेच्या कर्मचाऱ्यांना कर्जवाटपाचे कामात लावणे इ. तांत्रीक अडचणीमुळे बँकेची आर्थिक पत्रके मुदतीचे आंत पूर्ण होऊ शकली नाही. तसेच आमसभेच्या पूर्वतयारीसाठी लागणारा कालावधी विचारात घेता, ही सभा घेण्यास बँकेला दि. १४.११.९८ पर्यंत मुदतवाढ मिळण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(४) :- वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट योजनेअंतर्गत कर्जवाटप वाढविण्याचे दृष्टीने कर्जवाटपाचे धोरणात बदल करण्याबाबत.

ठराव क्रमांक ५(४) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व

सभेला माहिती देतांना सांगीतले की, आपले बँकेमार्फत पगार होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी बँकेने वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट योजना सुरु केली आहे. या योजनेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून या योजनेअंतर्गत वाटप केलेल्या मर्यादेवरील कर्जबाकी रुपये ६२५.०० लाख आहे. हे कर्ज सुरक्षित आहे. यापूर्वी आपण निव्वळ पगाराच्या सातपट अथवा रु. १.०० लाख यात कमी असलेल्या रकमेपर्यंत वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूर करण्यांत येते. कर्मचाऱ्यांचा निव्वळ पगार विचारात घेता कोणताही कर्मचारी रु.७.०० लाखाचे ओव्हरड्राफ्ट मर्यादेस पात्र ठरत नाही. ही मर्यादा ७ पटीवरुन १० पट केल्यास बँकेच्या कर्जवाटपात वाढ होऊन बँकेकडे असलेल्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक होऊ शकेल.

विषयाचे अनुषंगाने सभेत सविस्तर चर्चा होऊन, वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट योजनेअंतर्गत कर्जवाटपाचे धोरणात खालीलप्रमाणे बदल करण्यांत यावा असे ठरले.

१. निव्वळ मिळणाऱ्या ६ महिन्याच्या पगाराच्या सरासरी रकमेच्या १० पट येणारी रक्कम अथवा रु. १.०० लाख यामध्ये कमी असणारी रक्कम ओव्हरड्राफ्ट मर्यादा म्हणून मंजूर करण्यांत यावी.

२. या मर्यादेची दरवर्षी २० टक्केप्रमाणे मूळमर्यादा कमी करण्यांत येत असते. यापुढे ही मर्यादा दर सहा महिन्याने १० टक्के प्रमाणे कमी करुन उर्वरित मर्यादेचे वर्षाअखेर नुतनीकरण करण्यात यावे.

३. या कर्जावरील व्याजदर सहा महिन्याला एकमुस्त वसुल न करता दरमहा वसुल करण्यांत यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(५):. खाजगी उद्योग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्थांना करावयाचे कर्जपुरवठ्याचे धोरणात बदल करण्याबाबत..

ठराव क्रमांक ५(५):. मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगीतले की, बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात नविन नविन खाजगी उद्योग येत असून त्यामधील कर्मचारी, सहकारी पतसंस्थेची स्थापना करुन बँकेकडे कर्जमागणी करीत आहेत. बँकेच्या धोरणानुसार पगारदार संस्थांना सभासद कर्जबाकीच्या ८० टक्केपर्यंत कर्जपुरवठा केला जातो. परंतु खाजगी उद्योगक्षेत्रातील कामगारांच्या नव्याने स्थापन होणाऱ्या सहकारी संस्थांना कर्ज मंजूर करतांना बँकेच्या हिताच्या दृष्टीने ही मर्यादा कमी करावी असे वाटते.

विषयावर चर्चा होऊन, हा विषय तुर्त स्थगीत ठेवावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५(६) :. बँकेचे सरव्यवस्थापक श्री. ए.एन. चौधरी यांचा परसेवेचा कालावधी वाढविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(६) :. महाराष्ट्र राज्य सह. बँकेचे अधिकारी श्री. ए.एन. चौधरी हे आपल्या बँकेत दि. २६।७।१९९३ पासून सरव्यवस्थापक म्हणून परसेवेवर काम करीत आहेत. त्यांचा परसेवेचा कालावधी दि. २५।७।१९९८ रोजी संपत आहे. श्री. चौधरी यांनी मागील ५ वर्षापासून सरव्यवस्थापक पदाचा पदभार यशस्वीरित्या सांभाळलेला आहे. सद्यस्थितीत बँकेकडे पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे व बँकेच्या मा. संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रीया सुरु होत असल्यामुळे आजची बँकेची परिस्थिती विचारात घेता त्यांच्या सेवेची बँकेला अत्यंत गरज आहे. त्यामुळे श्री. ए.एन. चौधरी यांचा परसेवेचा कालावधी पुढील ६ (सहा) महिनेपर्यंत म्हणजे दि. २५।१।१९९९ पर्यंत वाढविण्यांत यावा. अशी विनंती महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांना करण्यांत येत आहे.

सुचक :. श्री. सुनिल केदार

अनुमोदक :. श्री. श्री. ब. आष्टणकर

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय ५(७) :. बँकेच्या मा. संचालक मंडळाची निवडणूक घेणेबाबत मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ५(७) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगीतले की, मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी त्यांचे दि. ३३ मे १९९८ चे पत्रानुसार बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक घेण्याकरिता ३१ मार्च १९९८ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार संघ निहाय मतदार यादी तसेच निवडणूक खर्च भागविण्याकरिता रु. ७५०००।- चा धनादेश पाठविण्याबाबत कळविले होते. त्यानुसार बँकेने दि. २६।६।१९९८ रोजी दि. ३१ मार्च १९९८ ची मतदार यादी व रु. ७५०००।- चा चेक मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास सादर केला.

मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे दि. ४ जुलै १९९८ चे पत्र बँकेस प्राप्त झाले असून या पत्रानुसार शासनाच्या दि. १८।६।९८ चे आदेशान्वये सहकारी संस्थांच्या निवडणूका दि. ३०।९।९८ पर्यंत घेण्यास स्थगनादेश दिला असल्याचे कळविले आहे. तसेच निवडणूक खर्चाच्या रकमेचा चेक रु. ७५०००/- चा बँकेस परत पाठविलेला आहे. शासनाच्या आदेशाबाबत माहिती घेतली असता पावसाळी परिस्थितीमुळे निवडणूका स्थगित करण्यांत करण्यांत आल्याचे समजते. परंतु यापूर्वी सन १९९३ मध्ये आपल्याच बँकेची निवडणूक दि. २५ जुलै १९९३ ला म्हणजे पावसाळ्यात घेण्यांत आलेल्या होत्या. ह्यावर्षी सुद्धा बाबदेव येथील श्रीराम सहकारी साखर कारखान्याची निवडणूक ऑगष्ट १९९८ मध्ये होत आहे. त्यामुळे संचालक मंडळाचा कालावधी संपण्यापूर्वी मा. संचालक मंडळाची निवडणूक घेणेबाबत मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, बँकेच्या मा. संचालक मंडळाचा कालावधी संपण्यापूर्वी म्हणजे दि. ११।५।९८ पूर्वी संचालक मंडळाची निवडणूक घेणेबाबत मा. जिल्हाधिकारी नागपूर यांना विनंती करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५(८) :- महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास कर्ज देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(८) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, नागपूर जिल्ह्यातील शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यास बँकेद्वारे जे कर्जवाटप करण्यांत येते त्या विद्युत पंपाकरिता दिलेल्या कर्जवाटपानंतर संबंधित शेतकऱ्यांना विद्युत मंडळाकडून वेळेवर वीजपुरवठा करण्यांत येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होऊन पिकांना पाणीपुरवठा करण्यास अडचण निर्माण होते असे लक्षात आले. याबाबत विद्युत मंडळाकडे चौकशी केली असता त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीनुसार आणि त्यानुसार करण्यांत येणाऱ्या वार्षिक योजनेनुसार शक्य तितक्या जास्त शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा केल्या जातो. जादा साधन सामुग्री उपलब्ध नसल्याने आणि त्याकरिता निधी उपलब्ध नसल्याने बँकेद्वारे कर्ज मंजूर होऊनही सर्वच शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा करता येऊ शकत नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन शेतीकरिता पाणीपुरवठ्यांत

होणारी अडचण आणि विद्युत मंडळाकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी बँकेने विद्युत मंडळास रु. २०.०० कोटीपर्यंत कर्जाऊ रक्कम उपलब्ध करून द्यावी आणि या दिलेल्या कर्जाऊ रकमेचा विनीयोग केवळ नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विद्युत पुरवठा करण्यासाठीच करण्यांत यावा, अशी अट घालण्यांत यावी असे ठरले.

तसेच विद्युत मंडळ वरील अटीसह कर्ज घेण्यांस तयार असल्यास विद्युत मंडळाशी चर्चा करून यावरील आकारावयाचा व्याजदर आणि कर्जपरतफेडीचा कालावधी ठरविण्याचे अधिकार मा. अध्यक्ष ह्यांना देण्यांत येत आहेत, असेही ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५ (९) :. बँकेत सरळ नियुक्तीने भरावयाच्या २० अधिकाऱ्यांच्या जागा कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने भरण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५ (९) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी त्यांचे दि. ३१।५।१९९५ नुसार बँकेस खालीलप्रमाणे कर्मचारी नियुक्त करण्यांस परवानगी दिलेली आहे.

| | |
|---|---|
| १. उपमुख्याधिकारी, अ वर्ग व ब वर्ग अधिकारी मिळून | - ५० जागा |
| २. लिपीक | - ५० जागा |
| ३. शिपाई | - २७ जागा |
| ४. प्रोसेस सर्व्हर | - २० जागा |
| ५. ड्रायव्हर | - १ जागा |
| एकूण | १४८ जागा |

बँकेच्या नोकरभरतीचे नियमानुसार, लिपीकाचे पदावरील अधिकाऱ्यांच्या जागा ६० टक्के पदोन्नतीने व ४० टक्के सरळ भरतीने भरण्याबाबत दि. २३।१।९५ रोजीचे मा. संचालक मंडळाचे सभेत ठरले. त्यानुसार अधिकारी २० जागा, लिपिक ८० जागा, प्रोसेस सर्व्हर २० जागा शिपाई २७ जागा व ड्रायव्हर १ जागा याप्रमाणे नोकरभरती करावयाची आहे.

दि. २८।२।९६ चे मा. संचालक मंडळाचे सभेतील निर्णयानुसार उपमुख्याधिकारी - ४ अ वर्ग अधिकारी ७ व ब वर्ग अधिकारी ९ अशा एकूण २० जागा सरळ भरती करावयाच्या होत्या. त्यानुसार

उपप्रादेशीक सेवायोजन अधिकारी, सेवायोजन अधिकारी, सेवा कार्यालय नागपूर, यांचेकडून उमेदवारांची यादी मागविण्यांत आली. परंतु या यादीमध्ये बँकेच्या मागणीप्रमाणे अनुभवी उमेदवार नव्हते. त्यामुळे उपमुख्याधिकारी पदाकरिता बँकेच्या कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने नियुक्ती करावी, तसेच अ वर्ग व ब वर्ग अधिकाऱ्यांच्या २० जागा सरळ भरतीने भरण्याबाबत दि. ५/२/१९९८ चे मा. संचालक मंडळाचे सभेत निर्णय घेण्यांत आला. त्यानुसार सेवायोजन कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या यादीतील उमेदवारांची लेखी परिक्षा दि. १६ मार्च १९९८ रोजी घेण्याचे ठरविण्यांत आले. परंतु १५ मार्च १९९८ रोजी युनियनने मा. औद्योगीक न्यायालयातून स्थगनादेश आणल्याने ही परिक्षा रद्द करावी लागली. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

विषयावर साविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, अधिकाऱ्यांच्या सरळ भरतीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने भरतीचे प्रक्रियेस विलंब होत आहे. यासाठी अधिकाऱ्यांच्या २० जागा बँकेच्या कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने भराव्यात व त्याऐवजी लिपीकांच्या २० जागा सरळ भरतीने बँकेकडे उपलब्ध असलेल्या लिपीकांच्या प्रतिक्षा यादीतून भराव्या तसेच अधिकाऱ्यांच्या सरळ भरतीने भरावयाच्या जागेसंबंधी न्यायालयात प्रलंबीत असलेल्या केसमध्ये "बँक पदोन्नतीने अधिकाऱ्यांच्या जागा भरण्यास तयार असल्याबद्दलचा "अर्ज (पुरसिस) बँकेतर्फे दाखल करावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर उपस्थितांचे आभार मानुन मा. उपाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] [signature]

सरव्यवस्थापक — अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि. नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा बुधवार दि. ३/२/१९८८ रोजी दुपारी १२.०० वाजता बँकेच्या मुख्यकार्यालयातील 'सर माधवराव देशपांडे स्मृति सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा. श्री. द्वा. दी. कांकाणी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्री. द्वा. दी. कांकाणी | अध्यक्ष |
| २. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर | उपाध्यक्ष |
| ३. मा. श्री. श्री. ब. आस्टनकर | संचालक |
| ४. मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ५. मा. श्री. अ. य. खराडे | " |
| ६. मा. श्री. व. गो. मलकवडे | " |
| ७. मा. श्री. बा. ना. दियेवार | " |
| ८. मा. श्री. श्रा. डो. दरणे | " |
| ९. मा. श्री. म. जा. नायडू | " |
| १०. मा. श्री. सु. सो. पॉनीकर | " |
| ११. मा. श्री. म. अ. बिनेकर | " |
| १२. मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १३. मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १४. मा. श्री. सुनिल केदार | " |
| १५. मा. श्री. र. दे. दुरगकर | " |
| १६. मा. श्री. ब. न. येरपुडे | " |
| १७. मा. श्रीमती सु. दे. ईटनकर | संचालिका |
| १८. मा. कु. मं. र. बांगडे | " |
| १९. मा. श्री. आर. आर. खोबरागडे | कर्मचारी प्रतिनिधी |
| २०. मा. श्री. एस. जी. बोरकर | " |
| २१. मा. श्री. जी. ए. अलोणी | " |

२२. मा. श्री. एस. एस. बानोरकर, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. विभागीय कार्यालय, नागपूर (नि.)

| | |
|---|---|
| २३. मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

— अनुपस्थित —

| | |
|---|---|
| १. मा. श्री. र. गो. बंग | संचालक |
| २. मा. श्री. भा. चं. शहाणे | " |
| ३. मा. श्री. शि. ज. यादव | " |

४. मा. श्री. वि. जा. राऊत — संचालक
५. मा. श्री. चं. शं. देशमुख — "
६. मा. श्री. मु. बि. पन्नासे — "
७. मा. श्री. रा. गो. कापसे — "
८. मा. सौ. कु. ग. किम्मतकर — संचालिका
९. मा. डॉ. वा. रा. कोरपे, प्रतिनीधी, महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई.
१०. मा. श्री. बा. मा. तिडके, म. रा. सह. कृषि व ग्रामीण विकास बँक लि. मुंबई (निमंत्रित)
११. मा. श्री. पुरुषोत्तम डाखोळे, अध्यक्ष जिल्हा परिषद, नागपूर.

---

सभेच्या कार्यवाहिस सुरवात करण्यापूर्वी संचालक सर्वश्री शि. ज. यादव, चं. शं. देशमुख, वि. जा. राऊत, मु. बि. पन्नासे, रा. गो. कापसे (व श्री. बेग, श्री. प. ब्राह्मणे) व मा. सौ. कु. ग. किम्मतकर यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सभेच्या कार्यवाहिस सुरवात केली.

विषय क्रमांक १:. मागिल दि. १८/७/१९९८ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागिल दि. १८/७/१९९८ चे सभेचे प्रतिवृत्त सभेसमोर वाचून दाखविले.

विषयावर चर्चा होऊन मागिल दि. १८/७/१९९८ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २:. मागील सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दि. १८/७/१९९८ चे सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयाने कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३:. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचेकडून सन १९९८-९९ करिता मंजूर झालेल्या अल्पमुदती शेती कर्जमर्यादेच्या मंजूर पत्रातील अटी स्विकृत करुन या मर्यादेवर उचल करण्याचे अधिकार प्रदान करणे.

ठराव क्रमांक ३ :. मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सखोल माहिती देतांना सांगितले की, सन १९९८-९९ करिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचेकडून रु.१३.०० कोटी अल्पमुदत शेती कर्ज मर्यादा मंजूर झाली असून याबाबत राज्य बँकेने कळविलेल्या अटी स्विकृत करून मंजूर मर्यादेवर उचल करण्यासाठी ठराव पाठवावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील ठरावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

— RESOLUTION —

Resolved that the terms and conditions laid down by the Maharashtra state Co.operative Bank Ltd. (Incorporating The Vidarbha Co.operative Bank Ltd.) Bombay vide letter No CFA/OPR/F-23/559/ST loans/ Nagpur/98.99 Dated 1st July 1998 for the credit limit of Rs. 1300.00 Lakhs (Thirteen Hundred lakhs) only sanctioned to this bank for financing seasonal Agricutural operations under pooled Rate scheme for the year 1998.99 be and hereby accepted.

Further resolved that anyone of the following office bearers from Group 'A' alongwith any one from officers from Group 'B' are hereby authorised to sign jointly the documents for the drawals of loan from the limit of Rs. 1300.00 Lakhs only sanctioned for short term seasonal Agricultural credit limit for the year 1998-99.

Further resolved that anyone of the office bearers from Group 'A' alongwith anyone from the following officer from Group 'B' are hereby authorised to jointly the undertaking on behalf of the Nagpur District Central Co-operative Bank Ltd. Nagpur Creating first charge of the promotes of the Agricutural credit societies and Act as custodian of the said pronotes on behalf of the Maharashtra state Co-operative Bank Ltd. (Incorporating The

Vidarbha co-operative Bank Ltd.) Bombay and to endorse the said pronotes on behalf of this Bank in favour of the Maharashtra state co-operative Bank Ltd. (Incorporating The vidarbha co-operative Bank Ltd.) Bombay as collateral security and to sign the monthly certificate of loan on behalf of this bank.

1) Chairman } Group 'A'
2) Vice-Chairman }
3) General Manager Group 'B'

Passed Unanimously.

---

विषय क्रमांक ८ : नागपूर जिल्हा देखरेख सहकारी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर बँकेच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८ : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सदरेल माहिती देतांना सांगितले की, नागपूर जिल्हा देखरेख सहकारी संस्थेने मुख्यकार्यकारी अधिकारी पदावर बँकेचा अधिकारी नियुक्त करण्याबाबत विनंती केली असून या पत्रासोबत मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडील दि. २०/७/९८ च्या पत्राची प्रत सादर केली आहे. या पत्रात बँकेचा अधिकारी संस्थेच्या मुख्य कार्यकारी पदावर बँकेची संमती असल्याबाबत मा. संचालक मंडळाचा ठराव पाठविण्याबाबत नमुद केले आहे.

नागपूर जिल्हा देखरेख सहकारी संस्थेवर बँकेचा अधिकारी नियुक्त केल्यास बँक व संस्थेच्या कामकाजात समन्वय साधता येईल. संस्थेच्या प्रशासनावर नियंत्रण राहील तसेच कर्जवाटप व वसुलीचे काम प्रभावीपणे करणे बँकेला शक्य होईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, नागपूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था, नागपूर यांचे मागणीप्रमाणे संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर बँकेचा अधिकारी देण्यास संमती देण्यांत आली. तसेच याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहेत. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५ :: महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) अन्वये मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या कारणे दाखवा नोटीसचे संदर्भात विचार विनिमय करणे.

ठराव क्रमांक ५ :: मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१ सह. संस्था (बँक) नागपूर यांनी सादर केलेल्या बँकेच्या सन १९९६-९७ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालाचे संबंधात मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडून दि. १६ जुलै १९९८ चे पत्रानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) अन्वये बँकेच्या सर्व संचालकांना "कारणे दाखवा नोटीस" देण्यांत आली आहे. या नोटीसचे लेखी स्पष्टीकरण १५ दिवसाचे आत सादर करण्यांस सांगितले आहे. तसेच या नोटीसचे संबंधात काही म्हणणे मांडावयाचे असल्यास दि. ७।८।१९९८ रोजी दुपारी १.०० वाजता स्वतः अथवा अधिकृत प्रतिनीधीमार्फत त्यांचे समक्ष हजर राहण्यांस सांगितले आहे.

सदर नोटीसमध्ये उल्लेखीत सर्व बाबी कार्यालयीन कामकाजाशी संबंधीत असल्यामुळे लेखी स्पष्टीकरण सादर करण्यांस काही संचालकांनी दि. ३१ ऑगष्ट १९९८ पर्यंत मुदतवाढ मागीतलेली आहे. कार्यालयाने ह्या नोटीसचे संबंधात मुद्देसूद सविस्तर स्पष्टीकरण तयार केलेले आहे. यानंतर सरव्यवस्थापक यांना स्पष्टीकरणाचे वाचन करण्यास सांगितले. मा. सरव्यवस्थापक यांनी कार्यालयाने तयार केलेल्या स्पष्टीकरणाचे सभेसमोर वाचन केले.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम मंडळाने महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम ७८ अंतर्गत कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याने, नोटीसचे संदर्भात बँकेच्या संचालक मंडळास लावलेल्या आरोपातून मुक्त करण्याबाबत मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६ :: मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ६(७) : बँकेतील कर्मचाऱ्यांना सिनीयॉरिटी कम् मेरिटनुसार बढती देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६(७) : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दि. ७।३।१९८८चे सेवक उपसमितीचे सभेत ठरल्याप्रमाणे अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा पदोन्नतीने भरण्याचे दृष्टीने दि. २९.३.८८ रोजी कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यांत आल्या. तसेच शिपाई श्रेणीतील एस.एस.एस.सी. (बारावी) परिक्षा उत्तीर्ण कर्मचाऱ्यांच्या, लिपीक श्रेणीत बढती देण्याचे दृष्टीने लेखी परिक्षा व प्रत्यक्ष मुलाखती घेण्यांत आल्या. परंतु या संबंधात महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक एम्प्लॉईज युनियनने औद्योगिक न्यायालय, नागपूर येथे दिनांक २०।७।८८ रोजी विद्यमान न्यायालयाने दोन्ही तक्रार क्र. ४५६।८८ दाखल करुन कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्याबाबत न्यायालयाने स्थगनादेश द्यावा अशी विनंती केली. त्यानुसार दि. २७।७।१९८८ रोजी विद्यमान न्यायालयाने दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकुन घेऊन दि. २९।३।८८ ला घेणाऱ्या प्रत्यक्ष मुलाखतीचे आधारे बढती देऊ नये असा आदेश पारीत केला. ह्या आदेशानुसार दि. २९।३।८८ ला घेतलेल्या मुलाखतीचे आधारे बँक बढती देऊ शकत नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे कामकाज सुरळीतपणे चालविण्याकरिता बँकेतील कर्मचाऱ्यांना बढती देणे आवश्यक आहे. त्यामुळे सध्याचे प्रचलीत धोरणानुसार म्हणजे 'सिनीयॉरिटी कम् मेरिट'नुसार कर्मचाऱ्यांना बढती देण्यांत यावी असे सभेचे मत पडले. त्यादृष्टीने औद्योगीक न्यायालयात अस्तित्वात असलेला स्थगनादेश रद्द करण्यासाठी अर्ज (पुरसिस) दाखल करण्यांत यावा. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना देण्यांत येत आहेत असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६(८) विणकर सहकारी संस्थांचे व्याज आकारणीची पध्दती व शासनाकडून येणे असलेल्या व्याज अनुदानाबाबत जिल्ह्याचे पालक मंत्री यांचेशी चर्चा करण्याबाबत

ठराव क्रमांक ६(८) : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँक विणकर सहकारी संस्थांना प्रचलित पध्दतीनुसार म्हणजे १२½ टक्केऐवजी ७ टक्के व्याज दराने

आकारणी करीत आहे. सन १९८६-८७ चे अंकेक्षण अहवालात अशा प्रकारचे व्याज आकारणीचे पध्दतीवर मा. विशेष लेखा परिक्षक यांनी आक्षेप घेतला असून नाबार्डचे सुचनेनुसार विणकर सहकारी संस्थांना ११½ टक्के दराने व्याज आकारणी करणेबाबत सुचविले आहे. तसेच जुन्या पध्दतीनुसार व्याज आकारणी केल्यामुळे बँकेचे नुकसान होत असल्याचेही अहवालात नमूद केले आहे.

दि. १।७।८३ ते दि. ३१।३।१९८७ या कालावधीची व्याज अनुदानाची रक्कम रु. ९७.२८ लाख शासनाकडून येणे आहे. यासाठी बँकेने केलेल्या प्रयत्नांचीही माहिती मा. अध्यक्ष यांनी सभेला दिली. यापुढेही व्याज आकारणीची जुनीच पध्दत सुरु राहिल्यास बँकेला केवळ ५½ टक्के व्याजाची रक्कम प्राप्त होणार नाही व त्याचा परिणाम बँकेच्या उत्पन्नावर होईल.

विषयावरील चर्चेत भाग घेतांना मा. श्री. म. अ. बिनेकर म्हणाले की, नाबार्डच्या परिपत्रकानुसार बँकेने ११½ टक्के दराने विणकर संस्थाना व्याज आकारणी करावी व विणकर सह. संस्थांनी ६½ टक्के व्याज अनुदानाची मागणी शासनाला करावी असे नमूद केले आहे. परंतु विणकर संस्थाची परिस्थिती पाहता ६½% व्याज अनुदानाची मागणी शासनाकडे करणे विणकर सहकारी संस्थांना शक्य नाही. बँकेने हातमाग विणकर सह. संस्थांना केलेला कर्जपुरवठा हा स्वनिधीतून केला असल्यामुळे नाबार्डचा या बाबीशी संबंध येत नसल्याने व्याज आकारणीची जुनीच पध्दत कायम ठेवण्यांत यावी. श्री. सु. खो. पौनीकर यांनीही त्यांचे मतास दुजोरा दिला. ते म्हणाले की, संचालक मंडळातील विणकर प्रतिनीधींनी मा. अध्यक्ष यांचे नेतृत्वात नागपूर जिल्ह्याचे पालक मंत्र्याशी याबाबतीत भेट घेऊन चर्चा करण्यांत यावी.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, विणकर सहकारी संस्थांना आकारावयाच्या व्याजदराची जुनीच पध्दत कायम ठेवणेबाबत तसेच व्याज अनुदानाची शासनाकडून येणे रक्कम डि.पी. डि.सी. किंवा स्टेट पूल फंडातून उपलब्ध करुन देणेबाबत शासनास विनंती करण्यांत यावी. यासाठी मा. अध्यक्ष यांचे नेतृत्वात संचालक मंडळातील विणकर प्रतिनिधींचे शिष्टमंडळ नागपूर जिल्ह्याचे पालक मंत्र्याकडे नेण्यांत यावे. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६(३) :- श्री. आर. आर. खोबरागडे 'ब' वर्ग अधिकारी शाखा व्यवस्थापक शाखा धान्यगंज यांचे कामकाजाबाबत सभेला माहिती देणे व निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ६(३) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री. आर. आर. खोबरागडे हे ब वर्ग अधिकारी श्रेणीत शाखा व्यवस्थापक म्हणून धान्यगंज शाखेत कार्यरत. त्यांची मुख्य कार्यालय आदेश क्रमांक- प्रशासन /बदली आदेश /८७-८८ /६५७२ दि. १५।५।८७ अन्वये पांचपावली शाखेतून धान्यगंज शाखेत बदली करण्यांत आली. त्यांना बदलीचे जागेवर रुजू होण्याकरिता मु.का.पत्र क्र. ७५५२ दि. १४।२।८८ अन्वये त्यांना पांचपावली शाखेतून रिलीव्ह करण्यांत आले परंतु ते बदलीचे जागी रुजू न होता रजेवर गेले. त्यांना दि. ३।३।८८ व दि. २७।३।८८ व ५।४।८८ चे पत्रान्वये बदलीचे जागेवर रुजू होण्याकरिता कळविण्यांत आले. परंतु ते रुजू झाले नाही. दि. ३१।५।८८ रोजी पांचपावली शाखेतून रिलीव्ह होत असल्याबाबत त्यांनी मुख्यकार्यालयास स्वतःचे सहीचे पत्र दिले व दि. १५।६।८८ रोजी धान्यगंज शाखेत रुजू झाले. धान्यगंज शाखेत रुजू झाल्यानंतर बदली आदेशाप्रमाणे श्री. पी. आर. येडे यांना पांचपावली शाखेत रुजू ~~झाल्यानंतर बदली आदेशाप्रमाणे श्री. पी. आर. येडे~~ होण्याकरिता रिलीव्ह करावयाचे होते. परंतु त्यांनी श्री. येडे यांना अजूनपावेतो रिलीव्ह केले नाही. मुख्य कार्यालयाने श्री. येडे यांना रिलीव्ह करण्याबाबत दि. २६।६।८८, १५।७।८८ व २०।८।८८ रोजी पत्र दिले, परंतु त्यांनी श्री. येडे यांना अजूनपावेतो रिलीव्ह केले नाही. बँकेने याबाबत पत्र व्यवहार केला असता त्यांनी आपल्या पत्रात उद्दटपणाची भाषा वापरून कार्यालयीन शिस्तीचे उल्लंघन व वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना केली.

धान्यगंज शाखेचे सर्व कर्मचाऱ्यांचे माहे जुलै १९८८ चे पगारबिल मंजूरीकरिता दि. २३।७।८८ रोजी मुख्य कार्यालयाकडे पाठविण्यांत आले होते त्यात श्री. येडे लिपीक यांचा सुध्दा पगार काढण्यांत आला होता. श्री. येडे यांना बदलीचे जागेवर पांचपावली शाखेत रुजू होण्याकरिता दि. ३०।६।१९८८ चे आदेशानुसार मुख्य कार्यालयाने रिलीव्ह केले असतांना सुध्दा श्री. खोबरागडे यांनी श्री. येडे यांचा जुलै ८८ चा पगार काढला. ही बाब गंभीर स्वरूपाची असून वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना करणारी आहे. तथापी श्री. येडे यांना रिलीव्ह केलेले असल्याने त्यांचा पगार

विषय क्रमांक ५:. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१) अन्वये मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या कारणे दाखवा नोटीसचे संबंधात विचार विनिमय करणे.

ठराव क्रमांक ५:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग १ सह. संस्था (बँक) नागपूर यांनी सादर केलेल्या बँकेच्या सन १९९६-९७ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालाचे संबंधात मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडील दि. १६ जुलै १९९८ चे पत्रानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१) अन्वये बँकेच्या सर्व संचालकांना

धान्यगंज शाखेतून न काढता मार्च जुलै १९९८ चे पगारबिल तयार करून पाठवावे, त्यानंतरच पगार बिल मंजूरीचा विचार करण्यांत येईल" असा शेरा लिहून पगार पगार बिल धान्यगंज शाखेला परत करण्यांत आले. परंतु त्यांनी मुख्य कार्यालयाचे सुचनेची दखल न घेता दिनांक २५/७/९८ रोजी पुन्हा जसेच्या तसे व सोबत पत्र जोडून पुन्हा तेच पगारबिल मुख्यकार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठविले. सदर पत्रात वापरलेली भाषा उध्दटपणाची व वरिष्ठांनी अवमान करणारी आहे. शिवाय "पगार बिल जसेच्या तसे मंजूर केले नाही तर दि. १/८/९८ रोजी बँक उघडली जाणार नाही" अशी धमकीही दिली.

धान्यगंज शाखेचे वरीलप्रमाणे प्राप्त पगार बिल दि. ३०/७/९८ रोजी श्री. येंडे यांचा पगार वगळून मंजूर करून पाठविण्यांत आले. परंतु श्री. खोबरागडे यांनी मुख्यकार्यालयाकडून पगार बिल मंजूर होण्यापूर्वीच दि. २७/७/९८ ला श्री. येंडे यांचे पगारासह एकूण रु. ६०९९६.७५ चा जमाखर्च घेतला व पगाराची रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांचे बचत ठेव खात्यात जमा केल्याचे चौकशीअंती आढळून आले. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे.

वरील प्रमाणे श्री. खोबरागडे यांनी मुख्य कार्यालयाच्या आदेशाची अवहेलना, वरिष्ठांवर केलेले दोषारोपण इ. बाबी विचारात घेता श्री. खोबरागडे यांची वागणूक गैरशिस्तीची व बेजबाबदारपणाची असल्याने त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. खोबरागडे शाखा व्यवस्थापक शाखा धान्यगंज यांचे कृत्य बेजबाबदारपणाचे व वागणूक गैरशिस्तीची असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

श्री. खोबरागडे यांनी मुख्यकार्यालयाचे आदेशाची केलेली अवहेलना व वरिष्ठ अधिकाऱ्यावर केलेले दोषारोपन इ. बाबी गंभीर स्वरूपाच्या असल्याने त्यांचेवर बँकेच्या स्थायी आदेशातील तरतुदीनुसार कारवाई करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहेत, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६(४) :: श्री. आर. आर. खोबरागडे, कर्मचारी प्रतिनीधी संचालक यांना महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० कलम ७३ एफएफ आणि कलम ७८ अन्वये अपात्र ठरविणेबाबत मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ६(४) :: श्री. आर. आर. खोबरागडे, ब वर्ग अधिकारी, शाखा व्यवस्थापक म्हणून पांचपावली शाखेत कार्यरत असतांना मे. विलास इंजीनियरिंग, डॉ. आंबेडकर कॉलनी, कामठी रोड, नागपूर यांचे चालु ठेव खात्यावर रु. ३०,०००/- ची जादा उचल दिली. ह्या रकमेची वसुली संबंधीत फर्मकडून न झाल्याने शाखा व्यवस्थापक श्री. आर. आर. खोबरागडे व लिपिक श्री. ए. एम. गडवे यांचेकडून प्रत्येकी रु. ५०००/- याप्रमाणे दरमहाचे पगारातून रु. ५००/- प्रमाणे वसुल करण्याबाबत आदेश देण्यांत आले. परंतु सदर प्रकरणी श्री. खोबरागडे यांनी औद्योगीक न्यायालयातून स्थगनादेश मिळविल्याने वसुली करता आली नाही. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. संबंधित औद्योगिक न्यायालय रिक्त असल्यामुळे स्थगनादेश खारिज करण्याकरिता बराच कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. बँकेने श्री. खोबरागडे यांचेकडून सुलभ हप्त्याने वसुली करण्याचे ठरवूनसुध्दा त्यांनी वसुली रक्कम पगारातून कपात केलेली नाही. त्यामुळे श्री. खोबरागडे हे बँकेचे थकबाकीदार झालेले आहेत. श्री. खोबरागडे हे कर्मचारी प्रतिनीधी, संचालक म्हणून बँकेच्या संचालक मंडळावर आहेत. थकबाकीदारास संचालक म्हणून राहता येत नाही. त्यामुळे श्री. खोबरागडे यांचेवर महाराष्ट्र सह. संस्था कायदा १९६० कलम ७३ एफ एफ आणि कलम ७८ अन्वये कारवाई करून बँकेच्या संचालक मंडळावर संचालक म्हणून राहण्यास अपात्र ठरविण्यांत यावे, अशी विनंती मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांना करण्यांत यावी.

सूचक :: श्री. सुनिल मेंढर.
अनुमोदक : श्री. मोरवानी सिंधी

— ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६(५) :- शेतघर व नवीन विहिरीचे कर्ज प्रकरणात जून ते सप्टेंबर या कालावधीत कर्ज मंजूरी व कर्ज वाटप करण्याबाबत

ठराव क्रमांक ६(५) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेकडून सेवा सहकारी संस्थेमार्फत शेतकरी सभासदांना शेतघर तसेच नविन विहिर खोदाईकरिता कर्ज मंजूर करण्यांत येते. तथापी जून ते सप्टेंबर या काळात पावसाळा व खरीप पिकांचा हंगाम असल्याने सभासदांना शेतघर व विहिरीचे काम पूर्ण करणे गैरसोयीचे होत असल्याने सदर कर्ज मंजूरी व कर्जवाटप बंद ठेवण्यांत येते. परंतु सदर कर्ज प्रकरणात बरेचदा वरील कालावधीत कर्ज मंजूर करून वाटप करण्याबाबत सभासदांकडून मागणी होत आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, सभासदांची मागणी विचारात घेता जून ते सप्टेंबर या कालावधीत शेतघर व नविन विहिर खोदाईचे काम काही परिस्थितीत पूर्ण करणे शक्य असल्याने सभासदांच्या स्वतःच्या जबाबदारीवर खास बाब म्हणून कर्ज मंजूर व कर्ज वाटप करण्यांत यावे. तथापी वरील कारणाकरिता कर्ज मंजूरी व कर्जवाटपास परवानगी देण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६(६) :- अज्ञानाचे जमीनीच्या तारणावर कर्ज मंजूर करणेबाबत....

ठराव क्रमांक ६(६) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या कर्जधोरणातील अट क्र. २२ अन्वये अज्ञानाचे पालनकर्त्यास सभासद करून घेतल्यानंतर मायनर गार्डीयन ॲक्टनुसार जिल्हा दिवाणी न्यायाधीश यांनी अज्ञानाचे जमीनीवर अज्ञान पालनकर्त्यास कर्ज घेण्याची परवानगी दिल्यास कर्जवाटप करता येईल. असे नमूद केले आहे.

अज्ञानाचे जमीनीवर कर्ज मंजूर करण्याबाबत अज्ञान पालनकर्त्यांकडून मागणी करण्यांत येत आहे. याबाबत इतर जिल्हा सहकारी बँकांचे धोरण पाहिले असता पुणे जिल्हा बँकेच्या धोरणाप्रमाणे नैसर्गीक पालनकर्ता (आई वडील) नसल्यास

जिल्हा न्यायाधीश यांचेकडून गार्डीयन सर्टिफिकेट घेऊन कर्ज देता येईल. तसेच नैसर्गीक पालनकर्ते (आई, वडील) असल्यास मा. जिल्हाधिकारी अगर प्रांत-अधिकारी अथवा शासकीय सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. याच धोरणानुसार आपणही कर्ज मंजूर करण्यास हरकत नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, अज्ञानाचे जमीनीच्या तारणावर कर्ज मंजूर करतांना पुणे जिल्हा मध्य. सह. बँकेच्या धोरणाप्रमाणे म्हणजे नैसर्गीक पालनकर्ता (आई, वडील) नसल्यास जिल्हा न्यायाधीश यांचेकडून गार्डीयनशिप सर्टिफिकेट घेऊन कर्ज मंजूर तसेच नैसर्गीक पालनकर्ता असल्यास मा. जिल्हाधिकारी अगर प्रांत अधिकारी अथवा सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन करावे व तसा बदल सध्याचे कर्ज धोरणात करण्यात यावा, असे ठरले.

(६) कर्ज मंजूर करण्यात यावे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर उपस्थितांचे आभार मानुन मा. उपाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[signature]
सरव्यवस्थापक

[signature]
अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि. नागपूर

बॅंकेच्या मा. संचालक मंडळाची सभा शुक्रवार दि.२९/८/९८ रोजी दुपारी १.०० वाजता बॅंकेच्या मुख्यकार्यालयातील स्व.माधवराव देशपांडे स्मृति सभागृहात बॅंकेचे अध्यक्ष मा.श्री. द्वा. शि. कांकाळी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.

या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

१. मा. श्री. द्वा. शि. कांकाळी — अध्यक्ष
२. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर — उपाध्यक्ष
३. मा. श्री. र. गो. बंग — संचालक
४. मा. श्री. भा. चं. शहाणे — "
५. मा. श्री. शि. ज. यादव — "
६. मा. श्री. अ. य. गुजर — "
७. मा. श्री. अ. य. खराडे — "
८. मा. श्री. व. गो. मनकवडे — "
९. मा. श्री. बा. ना. दियेवार — "
१०. मा. श्री. चं. शं. देशमुख — "
११. मा. श्री. श्रा. डो. दरणे — "
१२. मा. श्री. म. जा. नायडू — "
१३. मा. श्री. म. अ. बिनेकर — "
१४. मा. श्री. सु. सो. पौनीकर — "
१५. मा. श्री. मो. वि. निमजे — "
१६. मा. श्री. र. व्यं. निमजे — "
१७. मा. श्री. सुनिल केदार — "
१८. मा. श्री. र. दे. दुरगकर — "
१९. मा. श्री. मु. त्रि. पन्नासे — "
२०. मा. श्री. रा. गो. कापसे — "
२१. मा. श्री. ब. न. येरपुडे — "
२२. मा. सौ. कु. ग. किम्मतकर — संचालिका
२३. मा. कु. मं. र. बांगडे — "
२४. मा. डॉ. वा. रा. कोरपे, प्रतिनीधी, महाराष्ट्र राज्य सह. बॅंक लि. मुंबई
२५. मा. श्री. आर. आर. खोबरागडे — कर्मचारी प्रतिनीधी
२६. मा. श्री. एस. जी. बोरकर — "
२७. मा. श्री. एस. एस. नानोटकर विभागीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य सह. बॅंक लि. विभागीय कार्यालय, नागपूर

२८. मा. श्री. पी. ए. अलोणी — कर्मचारी प्रतिनिधी
२९. मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

— अनुपस्थित —

१. मा. श्री. श्री. ब. आस्टणकर — संचालक
२. मा. श्री. वि. जा. राऊत — "
३. मा. श्रीमती सु. दे. ईटनकर — "
४. मा. श्री. बा. मा. तिडके, प्रतिनिधी म. रा. सह. बँक लि. मुंबई (कृषि व ग्रामीण विकास)
५. मा. श्री. पु. म. डाखोळे, अध्यक्ष जिल्हा परिषद, नागपूर.
६. मा. श्री. एस. बी. पाटील, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर.
७. मा. श्री. एस. एस. सुपे, विशेष लेखा परिक्षक, वर्ग १ सह. संस्था (बँक) नागपूर (निमंत्रित)

—

सभेच्या कार्यवाहिस सुरवात करण्यापूर्वी संचालक मा. श्री. श्री. ब. आस्टणकर, मा. श्री. वि. जा. राऊत आणि संचालिका मा. श्रीमती सु. दे. ईटनकर यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सभेच्या कार्यवाहिस सुरवात केली.

विषय क्रमांक १ :. मागील दिनांक ५।८।१९९८ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सभेत सविस्तर चर्चा होऊन, मागील दि. ५।८।१९९८ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक २ :. मागील सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दि. ५।८।९८ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाचे सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

—

विषय क्रमांक ३ :. बँकेचे सन १९९७-९८ चे नफातोटा पत्रक व दि. ३१।३।९८ रोजीचे ताळेबंद पत्रक मंजूर करणे.

ठराव क्रमांक ३ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेला सन १९९७-९८ या आर्थिक वर्षात रु. २५०.०९ लाखाचा निव्वळ नफा झालेला आहे. मागील वर्षातील रु. २४१.८२ लाखाचा तोटा भरुन काढून ताळेबंद नफा रु. ८.२७ लाख आहे. दरवर्षी बँकेच्या व्यवहारात सातत्याने वाढ होत असून बँकेच्या प्रगतीची व आर्थिक स्थितीची कल्पना आपणांस बँकेच्या ताळेबंदावरुन येऊ शकेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, बँकेचे सन् १९९७-९८ या आर्थिक वर्षाचे नफातोटा पत्रक व दि. ३१ मार्च १९९८ चे ताळेबंद पत्रक सर्वानुमते मंजूर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ४ :. बँकेच्या सन् १९९७-९८ च्या वार्षिक साधारण सभेची तारिख निश्चित करणे.

ठराव क्रमांक ४ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला देतांना सांगितले की, दि. १८/७/१९९८ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाचे सभेतील ठराव क्र. ५(३) नुसार बँकेची सन् १९९७-९८ ची वार्षिक आमसभा घेण्यांस दि. ३०/११/१९९८ पर्यंत मुदतवाढ मिळण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत आली होती. तथापी मा. जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर यांनी त्यांचे दि. ७/८/९८ चे पत्रानुसार वार्षिक साधारण सभा घेण्यांस दिनांक ३०/९/९८ पर्यंतच मुदतवाढ दिलेली असल्याने या मुदतीचे आत बँकेला वार्षिक साधारण सभा घेणे आवश्यक आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, बँकेची सन् १९९७-९८ ची वार्षिक साधारण सभा सोमवार दि. २८/९/१९९८ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ५ :. बँकेच्या सन् १९९७-९८ चे वार्षिक अहवालास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ५ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, काही किरकोळ दुरुस्त्यासह बँकेच्या सन् १९९७-९८ चे वार्षिक अहवालास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६: मागील आमसभेने मंजूर केलेल्या सन १९९७-९८ चे अंदाजपत्रकातील तरतूदीपेक्षा ज्या बाबीवर अधिक खर्च झाला, त्यास मंजूरी देऊन जादा झालेला खर्च व सन १९९८-९९ चे अंदाजपत्रक वार्षिक साधारण सभेपुढे ठेवण्यास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ६: मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मागील आमसभेने मंजूर केलेल्या सन १९९७-९८ चे अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा खालील बाबीवर अधिक खर्च झाला आहे.

(रु. लाखांत)

| अ.न. | खर्चाचा तपशील | अंदाज | नक्की | जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | प्राव्हीडंट फंड वर्गणी | ५५.०० | ५५.७६ | ०.७६ |
| २. | बँक कर्मचारी कल्याण निधी | — | ०.६९ | ०.६९ |
| ३. | बोनस / एक्सग्रेसीया | ४.०० | ३१.४६ | २७.४६ |

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, मागील आमसभेने मंजूर केलेल्या सन १९९७-९८ चे अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा वरील बाबीवर जादा झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

तसेच, सन १९९८-९९ चे अंदाजपत्रकासही सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली. सन १९९७-९८ चे अंदाजपत्रकातील जादा झालेला खर्च व सन १९९८-९९ चे अंदाजपत्रक मंजूरीसाठी वार्षिक आमसभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यांत यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ७: मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ७(१): महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण विभागाचे विद्युतीकरणासाठी केलेल्या रु.२०.०७ कोटीचे कर्ज मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ७(१): मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती दिली की, मागील मा. संचालक मंडळ सभा दि.१८/७/१९९८ चे सभेतील ठराव क्रमांक ५(८) नुसार याबाबत चर्चा होऊन, विद्युत मंडळाकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नविन कृषि पंपासाठी विद्युत पुरवठा उपलब्ध होत नसून विद्युत पुरवठा

खंडीत होण्याचे प्रमाण बरेच आहे. यासाठी विद्युतमंडळाशी संपर्क साधून विद्युत मंडळाने कर्ज घेण्याची तयारी दर्शविल्यास या संबधात चर्चा करण्याचे अधिकार मा. अध्यक्षांना दिले होते. त्यानुसार चर्चा करण्यांत आली. विद्युत मंडळाकडून नागपूर जिल्ह्याचे ग्रामीण विभागातील विद्युतीकरणासाठी रु. २२.९० कोटीचा प्रकल्प अहवाल बँकेकडे सादर करून रु. २०.०० कोटी मध्यम मुदती कर्जाची मागणी आली आहे. कर्ज प्रकरणासंबंधीची टिपणी वाचून सभेने निर्णय घ्यावयाचा आहे. बँकेजवळ मध्यम मुदती कर्जासाठी रु. ५३.६२ कोटीचे निधी उपलब्ध आहेत.

यावर, सभेत चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास नागपूर जिल्ह्याचे ग्रामीण विभागाचे विद्युतीकरणासाठी रु. २०.०० कोटी मध्यम मुदती कर्जासाठी रु. ५३.६२ कोटीचे निधी उपलब्ध आहेत.

यावर सभेत चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास नागपूर जिल्ह्याचे ग्रामीण विभागाचे विद्युतीकरणासाठी रु. २०.०० कोटी मध्यम मुदती कर्ज खालील अटीवर मंजूर करण्यांत आले.

अटी:-

१. या कर्जाची मुदत ६ वर्ष राहील. यापैकी एक वर्ष सवलतीचा काळ गृहीत धरून पुढील ५ वर्षात समान १० सहमाही हप्तात वसूल करण्यांत येईल.

२. या कर्जावर दरसालदरशेकडा १५ टक्के व्याज आकारणी करून कर्ज वाटपापासून दर तिमाहीत व्याजाची रक्कम वसूल करण्यांत यावी.

३. मंजूर कर्जाचा विनियोग नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण विभागाचे विद्युतीकरणाचे कामासाठीच करून कृषि पंपाना प्राधान्याने विद्युत पुरवठा करावा लागेल.

४. या कर्ज रकमेतून निर्माण होणाऱ्या विद्युत वाहिनी केंद्र/उपकेंद्र प्रकल्पावर जिंदगीवर बँकेचे कर्जाचे सुरक्षिततेसाठी "तारण" स्टॅम्प पेपरवर करून घ्यावे.

५. बँकेच्या कर्जाचा हप्ता थकीत झाल्यास विद्युत मंडळाचे बिल कलेक्शन रकमेतून, रक्कम परस्पर वळती करण्याचा अधिकार बँकेस राहील.

६. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडून कर्ज पुरवठ्याची परवानगी व नाबार्डकडून क्रेडीट ऑथरायझेशन मिळण्याचे अपेक्षेवर कर्ज मंजूर करण्यांत यावे.

- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७(२) :- नाबार्डकडून घेण्यांत आलेल्या सन् १९९७-९८ च्या तपासणीबाबत प्राप्त झालेल्या तपासणी अहवालावरील पुर्तता अहवालास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ७(२) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, नाबार्डचे अधिकाऱ्यांनी दि. १५ डिसेंबर १९९७ ते ८ जानेवारी १९९८ पर्यंत तपासणी पूर्ण करून तपासणी अहवाल बॅंकेस पाठविलेला आहे. या तपासणी अहवालावरील पुर्तता अहवाल बॅंकेने तयार केला असून तो नाबार्डकडे पाठवावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, नाबार्डकडून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालावरील पुर्तता अहवालास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ७(३) :- रुपांतर कर्जाकरिता राज्य बॅंकेने दिलेल्या मर्यादेवर उचल करण्यांस मुदतवाढ मागण्याकरिता विनंती करणे.

ठराव क्रमांक ७(३) :- गटसचिवांचा मागील सहा महिन्यापासून संप सुरु असल्यामुळे रुपांतर करण्याचे संपूर्ण काम बॅंकेच्या निरीक्षकांद्वारे पूर्ण करून घेण्यांत आले. त्यानंतर ताबडतोब शासनाकडे व्याजमाफीची प्रकरणे पाठवावयाची असल्यामुळे या कामास प्राधान्य देऊन निरीक्षकाद्वारे हे काम करून घेण्यांत आल्याने रुपांतराच्या वचनचिठ्ठ्यांची यादी तयार करून मुख्य कार्यालयास पाठविण्याचे काम थोडे मागे राहीले. त्यामुळे रुपांतर कर्जावर ठराविक मुदतीचे आंत उचल करता येऊ शकली नाही. या जिल्ह्यातील असामान्य परिस्थिती लक्षात घेऊन या बॅंकेस दि. १०।५।९८ पर्यंत रुपांतर कर्जमर्यादेवर उचल करण्यांस मुदतवाढ देण्याबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेस विनंती करण्यांत यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ७(४) :- महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक लि. मुंबई यांचेकडून मंजूर रु. १७६०.०७ लाख रुपांतर कर्ज मर्यादेसंबंधी शर्ती व अटी स्विकृत करून उचल करण्याबाबतचे अधिकार प्रदान करणे.

ठराव क्रमांक ७(४) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक लि. मुंबई यांचेकडून बॅंकेस रु. १७६०.०७ लाखाची रुपांतर कर्ज मर्यादा दिनांक

२०।६।१९९८ चे पत्रानुसार मंजूर झालेली असून सदर मंजूरपत्रातील अटी मंजूरीबाबत तसेच मंजूर मर्यादेवर उचल करण्यासंबंधी आधिकार प्रदान करण्याबाबतचा ठराव राज्य बँकेस पाठवावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, खालील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत आला.

RESOLUTION

Resolved that letter No. CFA/OPR/F-126/552-B 98-99 dated 30.6.98 from the Maharashtra state co-operative Bank Ltd. (Incorporating the Vidarbha co-operative Bank Ltd.) Bombay communicating the sanction of a medium term conversion credit limit of Rs. 1760.00 lakhs only under section 22 of the National Bank for Agriculture and Rural Development Act 1981 be noted and the terms and conditions governing the loan as mentioned in the said letter be and are hereby accepted.

Further, resolved that the amount of Medium term conversion loan may be drawn through the Maharashtra state co-operative Bank Ltd. (Incorporating the vidarbha co-operative Bank Ltd.) Bombay and chairman or vice-chairman alongwith General Manager be and are hereby authorised to operate the conversion loan account and execute the necessary documents in this behalf.

Passed Unanimously.

---

विषय क्रमांक ७(५): सन् १९९७-९८ मध्ये बँकेला झालेल्या नफ्याचे विनीयोगास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ७(५): मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन् १९९७-९८ मध्ये बँकेला रुपये २१८,०९,४९५·९४ चा नफा झालेला आहे. मागील वर्षाचा तोटा रुपये २,०९,८२,४७८·१० वजा जाता रु. ८२७०१७·८४ नफा विनीयोगासाठी शिल्लक राहतो. या शिल्लक नफ्यातून नियमाप्रमाणे २५% रिझर्व

फंड व १५% प्रमाणे ऋणस्थायीकरण फंडाची तरतूद करणे आवश्यक आहे. ताळेबंदानुसार विनीयोगासाठी शिल्लक नफा कमी असल्याने केवळ कायदेशीर तरतुदी करून उर्वरीत नफा पुढील वर्षाकरिता अग्रेषित करावा असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन नफ्याचा विनीयोग खालील प्रमाणे करण्यांस शिफारस करण्यांत आली व या विनियोगास वार्षिक साधारण सभेची मंजूरी घेण्यांत यावी. असे ठरले.

| | रुपये — पैसे |
|---|---|
| दि० ३१ मार्च १९९८ रोजी ताळेबंदानुसार विनीयोगासाठी शिल्लक नफा | ८२७०९७ . ८४ |
| या नफ्याचा विनीयोग खालीलप्रमाणे शिफारस आहे. | |
| १. रिझर्व फंड (सहकारी कायद्याचे कलम ६६, पोटनियम क्रमांक-५७ प्रमाणे निव्वळ नफ्याच्या २५%) | २०६७५४ . ४६ |
| २. ऋण स्थायीकरण फंड (पोटनियम क्र-५७ प्रमाणे निव्वळ नफ्याच्या १५% | १२४०५२ . ६७ |
| शिल्लक नफा पुढील वर्षाकरिता अग्रेषित | ४९६२९० . ७१ |
| एकूण | ८२७०९७ . ८४ |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७(६) :. कर्मचाऱ्यांना द्यावयाचे वाहन कर्ज धोरणातील अटीत बदल करण्यांस मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ७(६) :. मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या कर्मचाऱ्यांना वाहन कर्ज मंजूर करतांना सध्याचे धोरणानुसार ज्यांची कायम सेवा ५ वर्षे झाली आहे, अशा कर्मचाऱ्यांना वाहन कर्ज [~~मंजूर करतांना~~ वाहन कर्ज मंजूर करण्यांत यावे, अशी कर्मचाऱ्यांकडून मागणी होत आहे.

[मार्जिनमधील नोंद: मंजूर करण्यांत येते. ह्या सवलतीचा लाभ अधिक कर्मचाऱ्यांना व्हावा, यासाठी ज्यांची कायम सेवा २ वर्षे झाली असेल अशा कर्मचाऱ्यांना]

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कर्मचाऱ्यांना वाहन कर्ज मंजूर करतांना सध्याचे धोरणातील ५ वर्षे कायम सेवेची अट शिथिल करून त्याऐवजी ज्या कर्मचाऱ्यांची बँकेतील कायम सेवा कमीतकमी २ वर्षे झाली असेल. अशा कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे वाहन कर्ज मंजूर करण्यांत यावे, ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

३०।६।१९९८ चे पत्रानुसार मंजूर झालेली असून सदर मंजूरपत्रातील अटी मंजूरीबाबत तसेच मंजूर मर्यादेवर उचल करण्यासंबंधी अधिकार प्रदान करण्याबाबतचा ठराव राज्य बँकेस पाठवावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, खालिल ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत आला.

RESOLUTION

Resolved that letter No. CFA/OPR/F-126/552-B 98-99 dated 30.6.98 from the Maharashtra State Co-operative Bank Ltd. (Incorporating the Vidarbha Co-operative Bank Ltd.) Bombay communicating the sanction of a medium term conversion credit limit of Rs. 1760.00 lakhs only under section 22 of the National Bank for Agriculture and Rural Development Act 1981 be noted and the terms and conditions governing the loan as mentioned in the said letter be and are hereby accepted.

Further, resolved that the amount of Medium term conversion loan may be drawn through the Maharashtra State Co-operative Bank Ltd. (Incorporating the Vidarbha Co-operative Bank Ltd.) Bombay and chairman or Vice-chairman alongwith General Manager be and are hereby authorised to operate the conversion loan account and execute the necessary documents in this behalf.

Passed Unanimously.

विषय क्रमांक ७(५): सन १९९७-९८ मध्ये बँकेला झालेल्या नफ्याचे विनियोगास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ७(५): मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन १९९७-९८ मध्ये बँकेला रुपये २,९०,०६,४९५.६४ चा नफा झालेला आहे. मागील वर्षाचा तोटा रुपये २,०९,७२,४७८.७० वजा जाता रु. ८२७०१७.८४ नफा विनियोगासाठी शिल्लक राहतो. या शिल्लक नफ्यातून नियमाप्रमाणे २५% रिझर्व

फंड व १५% प्रमाणे ऋणस्थायीकरण फंडाची तरतूद करणे आवश्यक आहे. ताळेबंदानुसार विनियोगासाठी शिल्लक नफा कमी असल्याने केवळ कायदेशीर तरतुदी करुन उर्वरीत नफा पुढील वर्षाकरिता अग्रेषित करावा असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन नफ्याचा विनियोग खालील प्रमाणे करण्यांस शिफारस करण्यांत आली व या विनियोगास वार्षिक साधारण सभेची मंजूरी घेण्यांत यावी. असे ठरले.

| | रुपये पैसे |
|---|---|
| दि० ३१ मार्च १९९८ रोजी ताळेबंदानुसार विनीयोगासाठी शिल्लक नफा | ८२७०१७ · ८४ |
| या नफ्याचा विनीयोग खालिलप्रमाणे शिफारस आहे. | |
| १. रिझर्व फंड (सहकारी कायद्याचे कलम ६६, पोटनियम क्रमांक-५७ प्रमाणे निव्वळ नफ्याच्या २५%) | २०६७५४ · ४६ |
| २. ऋण स्थायीकरण फंड (पोटनियम क्र. ५७ प्रमाणे निव्वळ नफ्याच्या १५% | १२४०५२ · ६७ |
| शिल्लक नफा पुढील वर्षाकरिता अग्रेषित | ४९६२१० · ७१ |
| एकूण | ८२७०१७ · ८४ |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७(६) :- कर्मचाऱ्यांना द्यावयाचे वाहन कर्ज धोरणातील अटीत बदल करण्यांस मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ७(६) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या कर्मचाऱ्यांना वाहन कर्ज मंजूर करतांना सद्याचे धोरणानुसार ज्यांची कायम सेवा ५ वर्षे झाली आहे, अशा कर्मचाऱ्यांना वाहन कर्ज [मंजूर करण्यांत येते. ज्या सवलतीचा लाभ अधिक कर्मचाऱ्यांना व्हावा यासाठी ज्यांची कायम सेवा २ वर्षे झाली असेल त्या कर्मचाऱ्यांना] ~~मंजूर करतांना~~ वाहन कर्ज मंजूर करण्यांत यावे, अशी कर्मचाऱ्यांकडून मागणी होत आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कर्मचाऱ्यांना वाहन कर्ज मंजूर करतांना सद्याचे धोरणातील ५ वर्षे कायम सेवेची अट शिथिल करुन त्याऐवजी ज्या कर्मचाऱ्यांची बँकेतील कायम सेवा कमीतकमी २ वर्षे झाली असेल. अशा कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे वाहन कर्ज मंजूर ~~करण्यांत यावे~~, ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७(७): प्रोसेस सर्व्हर ऐवजी लिपीकांच्या २० जागा भरण्यास परवानगी देणेबाबत मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ७(७): मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म० रा० पुणे यांनी त्यांचे दि० १८/७/१९९५ चे पत्रानुसार बँकेस एकूण १४८ जागा भरण्यास परवानगी दिलेली आहे. यात २० जागा प्रोसेस सर्व्हरच्या भरावयाच्या आहेत. प्रोसेस सर्व्हर हे नवीनच पद निर्माण करण्यांत आले असून हे पद निर्माण करतांना मान्यताप्राप्त युनियनची संमती न घेतल्याने युनियनने आक्षेप घेतला आहे. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

बँकेने नुकतीच मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार ८० लिपिकांची भरती केली आहे. यात सरळ भरतीने ६७ तर शिपाई श्रेणीतील १३ कर्मचाऱ्यांना लिपिक पदावर नियुक्ती देण्यांत आली आहे. प्रोसेस सर्व्हर पदाकरिता नियुक्तीचा वाद न्यायालयात प्रलंबीत असल्याने प्रोसेस सर्व्हर हे पद रद्द करून या २० प्रोसेस सर्व्हर पदाचे रूपांतर लिपिकांचे श्रेणीत करण्यास न, या २० लिपिकांच्या जागा प्रतिक्षा यादीतून भरणेबाबत मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था म०रा० पुणे यांची रितसर परवानगी घेण्यांत यावी.

सूचक : मा. श्री. सुनिल केदार

अनुमोदक : मा. श्री. र.गो. बंग

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर उपस्थितांचे आभार मानुन मा० उपाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] सरव्यवस्थापक

[signature] अध्यक्ष

२ दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि. नागपूर

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा सोमवार दि. २०.४.९८ रोजी सकाळी ११.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर राघवराव देशपांडे स्मृति सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा. श्री. द्वा. शि. कांकाणी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

१. मा. श्री. द्वा. शि. कांकाणी — अध्यक्ष
२. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर — उपाध्यक्ष
३. मा. श्री. र. गो. बंग — संचालक
४. मा. श्री. श्या. चं. शहाणे — "
५. मा. श्री. श्री. ब. आस्टणकर — "
६. मा. श्री. शि. ज. यादव — "
७. मा. श्री. अ. य. खरडे — "
८. मा. श्री. व. गो. मनकवडे — "
९. मा. श्री. बा. रा. दियेवार — "
१०. मा. श्री. चं. शं. देशमुख — "
११. मा. श्री. श्या. डो. दरणे — "
१२. मा. श्री. म. जा. नायडू — "
१३. मा. श्री. सु. सो. पॉनीकर — "
१४. मा. श्री. म. अ. बिनेकर — "
१५. मा. श्री. मो. वि. निमजे — "
१६. मा. श्री. सुनिल केदार — "
१७. मा. श्री. र. व्यं. निमजे — "
१८. मा. श्री. मु. श्री. पन्नासे — "
१९. मा. श्री. रा. गो. कापसे — "
२०. मा. श्री. ब. न. येरपुडे — "
२१. मा. सौ. कु. ग. किम्मतकर — संचालिका
२२. मा. श्रीमती सु. दे. इटनकर — "
२३. मा. कु. मं. र. बांगडे — "
२४. मा. डॉ. वा. रा. कोरपे, प्रतिनीधी, महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई
२५. मा. श्री. पुरुषोत्तम डाखोळे, अध्यक्ष जिल्हा परिषद, नागपूर
२६. मा. श्री. आर. आर. खोबरागडे — कर्मचारी प्रतिनीधी
२७. मा. श्री. एस. जी. बोरकर — "

२८. मा. श्री. जी. ए. अलोणी कर्मचारी प्रतिनीधी
२९. मा. श्री. ए. एन. चौधरी सरव्यवस्थापक

– अनुपस्थित –

१. मा. श्री. अ. य. गुजर संचालक
२. मा. श्री. वि. जा. राऊत "
३. मा. श्री. र. दे. दुरगकर "
४. मा. श्री. बा. मा. तिडके, प्रतिनीधी, महाराष्ट्र राज्य सह. कृषि व ग्रामीण विकास बँक लि. मुंबई.
५. मा. श्री. एस. बी. पाटील जिल्हा उपनिबंधक सह. संस्था, नागपूर
६. मा. श्री. एस. एस. नानोटकर, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. विभागीय कार्यालय नागपूर (निमंत्रीत
७. मा. श्री. एस. एस. सुपे, विशेष लेखा परिक्षक, वर्ग १ सह. संस्था (बँक) नागपूर (निमंत्रीत)
८. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर (निमंत्रीत)

---

सभेच्या कार्यवाहीस सुरवात करण्यापूर्वी संचालक सर्वश्री अ. य. गुजर, वि. जा. राऊत व र. दे. दुरगकर यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरवात केली.

विषय क्रमांक १:. मागील दि. २८-८-१९९८ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, मागील दिनांक २८-८-१९९८ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळ सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २:. मागील सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दि. २८-८-१९९८ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाचे सभेत पारीत झालेल्या

ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ३ : बँकेच्या दि. २८.५.१९९८ रोजी होणाऱ्या वार्षिक साधारण सभेकरिता प्रतिनीधींकडून आलेल्या सुचनांची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ३ : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगीतले की. आज दि. २८.५.१९९८ रोजी दुपारी १.०० वाजता बँकेची सन १९९७-९८ ची वार्षिक साधारण सभा होत आहे. या सभेत संस्था प्रतिनीधींना काही माहिती हवी असेल किंवा सुचना सभेसमोर मांडवयाच्या असतील तर त्या सुचना लेखी स्वरुपात दि. १५.५.९८ पर्यंत पाठविण्याबाबत सर्व सभासदांना नोटीसद्वारे कळविण्यांत आले होते. सदर मुदतीत दोन संस्था प्रतिनीधींकडून सुचना आलेल्या आहेत. या सुचनाबाबतचा खुलासा कार्यालयाने तयार केलेला आहे. यानंतर मा. सरव्यवस्थापक यांनी आलेल्या सुचना व त्यासंबंधी कार्यालयाने केलेल्या खुलाशाचे सभेसमोर वाचन केले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, बँकेच्या दि. २८.५.१९९८ रोजी होणाऱ्या वार्षिक साधारण सभेकरिता प्रतिनीधींकडून आलेल्या सुचनांची व त्या अनुषंगाने बँकेतर्फे करण्यांत आलेल्या खुलाशाची सभेत नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ४ : मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ४(१) : रुपांतर कर्ज मर्यादेवर उचल करण्यांस दि. ३०.५.९८ पर्यंत मुदतवाढ मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांना विनंती करणेबाबत दि. १५.५.९८ चे सर्क्युलर मिटींगचा ठराव कायम करणे.

ठराव क्रमांक ४(१) : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे अनुषंगाने दि. १५.५.९८ रोजीचे सर्क्युलर मिटिंगमध्ये पारीत केलेल्या ठरावाचे वाचन केले. याबाबत सभेत चर्चा होऊन खालील ठराव सर्वानुमते कायम करण्यांत आला.

– ठराव –

नागपूर जिल्ह्यातील गटसचिवांच्या संपामुळे उद्भवलेल्या अडचणीच्या परिस्थितीत नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने

रुपांतर कर्जावर उचल घेण्यांस केलेल्या विनंतीचा विचार करुन राज्य बँकेने दि. १०।५।९८ पर्यंत रुपांतर कर्जाचेदिवर उचल करण्यांस दि. ३०।५।९८ पर्यंत मुदतवाढ दिली. याकरिता बँक आभारी आहे. बँकेच्या महत्वाच्या कामासाठी बँकेचे मा. अध्यक्ष व सरव्यवस्थापक या काळात बाहेरगांवी गेले असल्याने उचल अर्जावर सह्या करुन उचल अर्ज दि. १५।५।९८ रोजी राज्य बँकेस सादर करण्यांत आला. त्यामुळे रुपांतर कर्जावर उचल मिळण्यास दि. ३०।५।९८ पर्यंत मुदतवाढ देण्यांत यावी अशी राज्य बँकेस विनंती करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ४(२):- नॉमिनल शेअर्सची रक्कम रिझर्व फंडास तबदील करण्यास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ४(२):- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या दि. ७।८।५९ चे आमसभेत झालेल्या पोटनियम दुरुस्तीनुसार संस्थाना रु. १००।-चे शेअर देण्यांत येतील आणि बँकेकडून सरळ कर्ज घेणाऱ्या वैयक्तीक सभासदांना रु. २५।- चा नॉमीनल शेअर देण्यांत येईल असे लिहिले आहे. त्यानंतरच्या काळात वैयक्तिक सभासदांना कर्जवाटप करण्याचे धोरण बंद झाल्यामुळे ज्यांचेकडे रु. २५।- चे शेअर्स होते त्यांना रु. १००।-च्या वर्गातील तितक्या प्रमाणात शेअर्स देण्यांत आले आणि ज्यांचेकडे कर्जबाकी होती. परंतु शेअर्स रु. १००।- चे नव्हते अशा सभासदांचे रु. २५।- प्रमाणे नॉमीनल शेअर्स दाखविण्यात आले. अशा शेअर्सची रक्कम ताळेबंदानुसार रु. ६४१०।- इतकी शिल्लक आहे. ही रक्कम रिझर्व फंडास वळती करण्याबाबत मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग १ सह. संस्था (बँक) नागपूर यांनी सन १९९६-९७ चे अंकेक्षण अहवालात नमूद केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग १, सह. संस्था (बँक) नागपूर यांचे सुचनेनुसार भागभांडवलात दर्शविलेली वैयक्तीक नॉमीनल शेअर्सची रक्कम रु. ६४१०।- रिझर्व फंडास वळती करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ४(२) : बचत ठेव व चालु ठेवीचे चेकबुकावर आकार घेऊन क्लिअरींग खर्च वसुल करण्याबाबत.

ठराव क्रमांक ४(३) : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मायकर चेक क्लिअरींग करिता पंजाब नॅशनल बँक मायकर क्लिअरींग सेंटर रु. १/- प्रति चेक/ड्राफ्ट आकारणार असल्याचे कळते. रिझर्व बँक सुध्दा क्लिअरींग चार्जेस आकारीत आहे. सध्या संपूर्ण चेक मायकर क्लिअरींगमध्ये जात नाहीत तथापी सर्व चेककरिता मायकर क्लिअरींग लागू झाल्यास क्लिअरींगच्या खर्चात वाढ होईल. सध्या आपली बँक चेकबूक देतांना क्लिअरींग चार्जेस वसुल करित नाही. परंतु राज्य सरकारी बँक व इतर बँकांनी ग्राहकांना चेकबूक देतांना क्लिअरींग चार्जेसची आकारणी सुरु केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, अन्य बँकांनी चेकबुककरिता किंमत आकारणी सुरु केली असल्याने क्लिअरींग खर्च वसुलीकरिता बँकेने चेकबूक देतांना बचत ठेव चेकबूक (२५ चेक) करिता रु. १०/- व चालु ठेव चेकबूक (५० चेक) करिता रु. २०/- याप्रमाणे क्लिअरींग चार्जेसची आकारणी करावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४(४) : बँकेच्या अधिकाऱ्यांना सन १९९८-९९ करिता वसुलीचे अधिकार प्रदान करण्यासंबंधी मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ४(४) : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दि. १४|५|९८ चे मा. संचालक मंडळाचे सभेतील ठराव क्र. ४(७) नुसार बँकेच्या २१ अधिकाऱ्यांना दि. १|७|९८ ते ३०|६|९९ पर्यंत एक वर्षाकरिता कलम १५६ अंतर्गत सेवा सहकारी संस्थांकडील वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता वसुलीचे अधिकार प्रदान करण्यास मा. जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी असे ठरले होते व त्याप्रमाणे दि. १४|६|९८ रोजी प्रस्ताव सादर करण्यांत आला होता.

या संदर्भात मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी बँकेच्या ज्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याची गरज पडत नाही अशा अधिकाऱ्यांना कारवाईचे अधिकार देण्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांना वसुलीप्रकरणे हाताळण्यासाठी मदत

व्हावी म्हणून निरीक्षकांना हे अधिकार देण्यांत यावेत व तसा सुधारीत प्रस्ताव पाठवावा असे सुचविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन खालीलप्रमाणे बँकेचे अधिकारी व विशेष वसुली अधिकारी यांना दि० १।७।९८ पासून दि० ३०।६।९९ पर्यंत एक वर्षाकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६(१) व १५६(२) आणि महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६१ चा नियम ८ (एच) व (जे) तसेच नियम १०७ खालील उपनियम (३) (५) (६) (७) (९) (१०) वगळून (१२) (१३) (१४) (१७) (१५) व २० नुसार कलम १०१ व कलम १३७ नुसार सेवा सहकारी संस्थांकडील वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्यासंबंधीचे अधिकार देणेबाबत मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी व तसा सुधारीत प्रस्ताव पाठवावा असे सर्वानुमते ठरले.

| अ.नं. | अधिकाऱ्याचे नांव | पद | मुख्यालय | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. सी. एन. डोईफोडे | मुख्याधिकारी | नागपूर | नागपूर जिल्हा |
| २. | श्री. व्ही. एस. सातफळे | ब वर्ग अधिकारी | हिंगणा | " |
| ३. | श्री. एम. आय. मडावी | —"— | कळमेश्वर | " |
| ४. | श्री. एस. आर. वरोकर | —"— | नरखेड | " |
| ५. | श्री. आय. डी. तिजारे | —"— | पारशिवनी | " |
| ६. | श्री. डी. एस. गोरबले | —"— | कुही | " |
| ७. | श्री. जी. एस. दडमल | —"— | रवात | " |
| ८. | श्री. बी. के. तुमडे | —"— | पांचगांव | " |
| ९ | श्री. एस. आर. वरुडकर | वि० व० अ० | कामठी | " |
| १०. | श्री. पी. बी. राठोड | —"— | हिंगणा | " |
| ११ | श्री. पी. एन. थोडे | —"— | कळमेश्वर | " |
| १२. | श्री. यु. जे. पुरी | —"— | काटोल | " |
| १३ | श्री. व्ही. बी. रुने | —"— | —"— | " |
| १४ | श्री. एस. एस. ढगे | —"— | नरखेड | " |
| १५ | श्री. पी. एन. उल्लेवार | —"— | सावनेर | " |
| १६ | श्री. एन. ए. देशमुख | —"— | भिवापूर | " |
| १७ | श्री. बी. डी. उरकुडे | —"— | पारशिवनी | " |
| १८. | श्री. एस. एस. देशभ्रतार | —"— | रामटेक | " |
| १९ | श्री. टी. एन. काळमेघ | —"— | मौदा | " |
| २० | श्री. एस. एम. शेरकी | —"— | उमरेड | " |
| २१. | श्री. आर. जी. पाटील | —"— | कुही | " |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ४(५) : बँकेच्या बेला शाखेकरिता ग्रामपंचायतीचे मालकीची इमारत खरेदी करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ४(५) : बँकेची बेला शाखा सुरुवातीपासून म्हणजे सन् १९६८ पासून ग्रामपंचायतीच्या मालकीच्या इमारतीत कार्यरत आहे. ही इमारत फार जुनी झालेली आहे. ग्रामपंचायत बेला यांनी सदर इमारतीची विक्री करून देण्याची तयारी दर्शविलेली आहे व तसा प्रस्ताव बँकेस सादर केला आहे. सद्यस्थितीत बँकेच्या शाखेकरिता दुसरी सोयीची जागा अथवा इमारत उपलब्ध नसल्याने ही इमारत शाखेकरिता खरेदी करण्यांत यावी. याबाबतीत ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांशी चर्चा व वाटाघाटी करून निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४(६) :- ठेवीवरील व्याजदरात बदल करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ४(६) : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, सन् १९९६-९७ मध्ये एकूण ठेवीवर सरासरी व्याजदर ७.०९ टक्के होता. त्यानंतर नागरी सहकारी बँकांनी त्यांचे ठेवीवरील व्याजदर वाढविल्यामुळे आपले बँकेलाही ठेवीवरील व्याजदरात वाढ करावी लागली. त्यामुळे सन् १९९७-९८ मध्ये दिलेला सरासरी व्याजदर ७.८९ टक्के पडतो. सद्या इतर सर्व बँकांनी त्यांचे ठेवीवरील व्याजदर कमी केलेले आहेत. तसेच सन् १९९६-९७ चे तूलनेत १९९७-९८ मधील व्याजदर जास्त असल्यामुळे हा व्याजदर कमी करणे आवश्यक आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे दि.१।१०।९८ पासून ठेवीवरील व्याजदरात बदल करण्यांत यावा, असे ठरले.

| अ.न. | ठेवींचा कालावधी | सद्याचे व्याजदर | सुधारीत व्याजदर |
|---|---|---|---|
| १ | १५ ते १८० दिवस | ८% | ८% |
| २ | १८१ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी | ८.५०% | ९% |
| ३ | १ वर्ष ते ३ वर्षापेक्षा कमी | १२.५०% | ११% |
| ४ | ३ वर्ष ते ४ वर्षापेक्षा कमी | १२.५०% | १२% |
| ५ | ४ वर्षापेक्षा जास्त | १३.००% | १२.५०% |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय ४ (७) :- पाराशिवनी तालुक्याचे विशेष वसुली अधिकारी या शासननिर्मीत पदास दि० ३१।१०।९८ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ४(७) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, पाराशिवनी तालुक्याचे शासननिर्मीत वसुली अधिकारी या पदावर कार्यरत असलेले खात्याचे अधिकारी श्री. बी.एम. देशकर यांची खात्याने बदली करून त्यांचे जागेवर खात्याचे सहकारी अधिकारी श्रेणी-१ श्री. आर.एल. वसु यांची तात्पुरती नेमणूक केलेली आहे. तसेच या पदावरील पूर्वीचे अधिकारी श्री० देशकर यांनी प्रकृती अस्वास्थामुळे वसुली अधिकारी म्हणून काम करण्याची इच्छा नसल्याचे कळविल्यामुळे त्यांचे या पदास दि० ३०।६।९८ नंतर मुदतवाढ मागण्यांत आलेली नाही. या संदर्भात दिनांक २३।७।९८ रोजी मा. विभागिय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे सोबत झालेल्या चर्चेनुसार उपरोक्त पदास दि० ३१।१०।९८ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत प्रस्ताव पाठवावा असे त्यांनी सुचित केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन पाराशिवनी तालुक्याचे शासन-निर्मित विशेष वसुली अधिकारी पदास त्यांचे लिपीकासह दि० ३१।१०।९८ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत मा० विभागिय सहनिबंधक, स० संस्था, नागपूर यांना विनंती करण्यात यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४(८) :- बँकेच्या कर्मचाऱ्यांना सन् १९९७-९८ सालाचा बोनस / एक्सग्रेसीया मंजूर करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ४(८) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले.

विषयावर चर्चा होऊन, बँकेच्या कर्मचाऱ्यांना सन् १९९७-९८ सालाचा बोनस / एक्सग्रेसीया मंजूर करण्याबाबतचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहेत, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर उपस्थितांचे आभार मानुन मा० उपाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] [signature]

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि० नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची विशेष सभा गुरुवार दिनांक १५/१०/१९९८ रोजी दुपारी २.०० वाजता बँकेच्या सर माधवराव देशपांडे स्मृति सभागृहात मा. श्री. चंद्रभान पराते अपर/विशेष भूअर्जन अधिकारी, नागपूर तथा पिठासीन अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई या संस्थेवर बँकेतर्फे एक प्रतिनीधी पाठविण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्रमांक ए.के-ई एलएन-डी-३१ उळकृ. एस. १०५४/१९९८ दि. ३०/९/१९९८ नुसार घेण्यांत आली.

मा. सभाध्यक्ष यांनी सभेच्या सुरवातीस उपस्थित सन्माननीय संचालकांना निवडणूकीचा कार्यक्रम वाचून दाखविला. यावेळी सभेला निवडणूकीत मतदान करण्यास पात्र असलेल्या २५ संचालकांपैकी २२ संचालक उपस्थित होते. उपस्थितांपैकी एका संचालकास मतदानाचा अधिकार नव्हता. तर तीन संचालक अनुपस्थित होते. याशिवाय ३ कर्मचारी प्रतिनीधी व बँकेचे सरव्यवस्थापक श्री. ए.एन.चौधरी सभेला उपस्थित होते. उपस्थितीबाबत बँकेच्या सभांचे हजेरीपुस्तकात स्वाक्षऱ्या घेण्यांत आलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. द्वा. शि. कांकाणी | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. व. क. पाराशिवनिकर | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. र. गो. बंग | संचालक |
| ४. | मा. श्री. श्री. ब. आस्टणकर | " |
| ५. | मा. श्री. शि. ज. यादव | " |
| ६. | मा. श्री. अ. य. खराडे | " |
| ७. | मा. श्री. व. गो. मनकवडे | " |
| ८. | मा. श्री. चं. शं. देशमुख | " |
| ९. | मा. श्री. बा. ना. दियेवार | " |
| १०. | मा. श्री. श्या. ङो. दरणे | " |
| ११. | मा. श्री. म. जा. नाघडू | " |
| १२. | मा. श्री. सु. सो. पोलीकर | " |
| १३. | मा. श्री. म. अ. बिनेकर | " |
| १४. | मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १५. | मा. श्री. सु. छ. केदार | " |
| १६. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १७. | मा. श्री. र. दे. डुरगकर | " |

१८. मा. श्री. मु. भि. पन्नासे — संचालक
१९. मा. श्री. रा. गो. कापसे — "
२०. मा. श्री. ब. न. येरपुडे — "
२१. मा. सौ. कु. ग. किम्मतकर — संचालिका
२२. मा. श्रीमती सु. दे. ईटनकर — "
२३. मा. कु. मं. र. बांगडे — "
२४. मा. श्री. आर. आर. खोबरागडे — कर्मचारी प्रतिनीधी
२५. मा. श्री. जी. ए. अलोणी — "
२६. मा. श्री. एस. जी. बोरकर — "
२७ मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

सभेच्या कार्यवाहीसाठी आवश्यक कोरम पूर्ण झाल्याने मा. सभाध्यक्ष यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन सभेच्या कार्यवाहीस सुरवात केली.

नियोजीत कार्यक्रमानुसार दुपारी २.०० वाजता नामनिर्देशन पत्राचे वितरण करण्यांत आले. नामनिर्देशन पत्रे स्विकारण्याची वेळ दुपारी २.३० वाजेपर्यंत होती. ह्या वेळेत श्री. सुनिल छत्रपाल केदार यांच्या उमेदवारीचे तीन नामनिर्देशन पत्र वेगवेगळे सुचक व अनुमोदक असलेले प्राप्त झाले. त्यांची छाननी करण्यांत येवुन एकाच उमेदवाराचे तीन नामनिर्देशन पत्र असल्याने प्रथम प्राप्त झालेले खालील नामनिर्देशन पत्र छाननीअंती वैध ठरविण्यांत आले.

| अ.न. | उमेदवाराचे नांव | सुचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुनिल छत्रपाल केदार | द्वारकाप्रसाद शिवप्रसाद कांकाणी | मुकुंद भिकुजी पन्नासे |

याशिवाय दुसऱ्या कोणत्याही उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र दुपारी २.३० वाजेपर्यंत सभाध्यक्षांसमोर आले नाही. नामनिर्देशन पत्र परत घेण्याचे वेळी म्हणजे दुपारी ३.०० ते ३.१५ पर्यंत वरील उमेदवाराने नामनिर्देशन पत्र परत घेतले नाही. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारामध्ये एकच उमेदवार असल्याने श्री. सुनिल छत्रपाल केदार यांची नागपूर डि. से. को-ऑप. बँकेतर्फे महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई या संस्थेवर पाठवावयाचे प्रतिनीधी म्हणून अविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यांत आले.

नवनिर्वाचीत प्रतिनीधींचे स्वागत करुन व सर्व उपस्थितांचे आभार मानुन आजची ही निवडणूक विषयक सभा संपल्याचे मा. सभाध्यक्षांनी जाहिर केले.

[signature] ९५/१० दि. ५.३.२०१३

अप्पर विशेष भूअर्जन अधिकारी तथा पिठासीन अधिकारी
नागपूर

बँकेच्या मा॰ संचालक मंडळाची सभा शनिवार दि॰ २१।११।९८ रोजी दुपारी १.०० वाजता बँकेच्या मुख्यकार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा॰ श्री॰ द्वा॰ शि॰ कांकाणी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा॰ श्री॰ द्वा॰ शि॰ कांकाणी | अध्यक्ष |
| २. मा॰ श्री. व.क. पाराशिवनीकर | आध्यक्ष |
| ३. मा.श्री. र.गो. बंग | सदस्य |
| ४. मा.श्री. भा.चं. शहाणे | " |
| ५. मा. श्री. श्री.ब. आस्टणकर | " |
| ६. मा.श्री. शि.ज. यादव | " |
| ७. मा.श्री. अ.य. गुजर | " |
| ८. मा.श्री. अ.य. खराडे | " |
| ९. मा.श्री. व.गो. मनकवडे | " |
| १०. मा.श्री. बा.ना. दियेवार | " |
| ११. मा.श्री. श्रा.डो. दुरुगे | " |
| १२. मा.श्री. म.जा. नायडू | " |
| १३. मा.श्री. सु.सो. पौनीकर | " |
| १४. मा.श्री. म.अ. बिनेकर | " |
| १५. मा.श्री. मो.वि. निमजे | " |
| १६. मा.श्री. सुनिल केदार | " |
| १७. मा.श्री. र.व्यं. निमजे | " |
| १८. मा.श्री. मु.श्रि. पन्नासे | " |
| मा.श्री. स.गो. कापसे | " |
| १९. मा.श्री. र.दे. डुरगकर | " |
| २०. मा.श्री. ब.न. घेरपुडे | " |
| २१. मा.श्रीमती सु.दे. इटनकर | सदस्या |
| २२. मा.सौ. कु.ग. किम्मतकर | " |
| २३. मा.कु. मं.र. बांगडे | " |
| २४. मा.श्री. आर.आर. खोबरागडे | कर्मचारी प्रतिनीधी |
| २५. मा.श्री. जी.ए. अलोणी | " |
| २६. मा.श्री. एस.जी. बोरकर | " |
| २७. मा.श्री. ए.एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

— अनुपस्थित —

१. मा. श्री. चं. शं. देशमुख संचालक
२. मा. श्री. वि.जा. राऊत "
३. मा. डॉ. वा. रा. कोरपे, प्रतिनीधी महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई
४. मा. श्री. बा. मा. तिडके, प्रतिनिधी, म. रा. कृषि व ग्रा. वि. बँक लि. मुंबई
५. मा. श्री. पुरुषोत्तम उरवोके, अध्यक्ष जिल्हा परिषद ~~सह. संस्था~~, नागपूर
६. मा. श्री. एस. बी. पाटील, जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर
७. मा. विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सह. बँक, विभा. कार्यालय नागपूर (निमंत्रीत)
८. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर (निमंत्रीत)
९. मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग १, सह. संस्था, नागपूर (निमंत्रीत)

सभेच्या कार्यवाहीस सुरवात करण्यापूर्वी संचालक मा. श्री. चं. शं. देशमुख व मा. श्री. वि. जा. राऊत यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेची कार्यवाही सुरु केली.

विषय क्रमांक १ :. मागील दि. २८।५।९८ व १५।७।९८ रोजी झालेल्या सभांचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन मागील दि. २८।५।९८ व १५।७।९८ रोजी झालेल्या सभांचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक २ :. मागील सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दि. २८।५।९८ व दि. १५।७।१९९८ रोजी झालेल्या सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ३ :- नागपूर जिल्हा सुपरविजन को-ऑप. सोसायटी लि. नागपूर यांना तालुकास्तरावरील 'तालुका सदस्य सचिव' या पदासाठी ब वर्ग अधिकारी किंवा तत्सम श्रेणीचा अधिकारी उपलब्ध करुन देणेबाबत पारित केलेला दि. ६।१०।९८ चे सर्क्युलर मिटींगचा ठराव कायम करणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, दि. ५।१०।९८ रोजी खालीलप्रमाणे मंजूर करण्यांत आलेला सर्क्युलर मिटींगचा ठराव सर्वानुमते कायम करण्यांत आला.

— ठराव —

नागपूर जिल्हा सुपरविजन को-ऑप. सोसायटी लि. नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक - सीईओ/८१०९८/ए/९८-९९ दि. ८।१०।१९९८ नुसार बँकेकडे केलेल्या मागणीनुसार "ब" वर्ग किंवा तत्सम श्रेणीचे १३ अधिकारी संस्थेला 'तालुका सदस्य सचिव" या पदावर काम करण्यासाठी देण्यांत यावेत. बँकेने नेमून दिलेल्या कामाचे व्यतिरिक्त 'तालुका सदस्य सचिव' या पदाचा अतिरिक्त पदभार राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक ४ :- तज्ञ समितीने सन १९९९-2000 हंगामाकरिता शिफारस केलेले पीक कर्जाचे एकरी दर व धोरण मंजूर करुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणे.

ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन १९९९-२००० च्या हंगामाकरिता नागपूर जिल्ह्यातील पीक कर्जाचे एकरी दर ठरविण्याकरिता दि. १७।११।९८ रोजी तज्ञ समितीची सभा घेण्यांत आली. या सभेत बियाणे औषधी व खताचे वाढलेले भाव व मजूरीचे दरात झालेली वाढ याबाबत सविस्तर चर्चा होऊन, सर्वच पीककर्जाचे दरात १२% ते १५% वाढ करावी तसेच नगदी व वस्तुरुप कर्जाचे प्रमाणात बदल करुन नगदीचे प्रमाण ६०% व वस्तुरुपाचे प्रमाण ४०% करण्याबाबत शिफारस करण्यांत आली. तज्ञ समितीने शिफारस केलेले दर व त्यासंबधीचे धोरण मंजूरीकरिता सभेसमोर ठेवण्यांत आलेले आहे.

विषयावरील चर्चेत भाग घेतांना श्री. ब.न. येरपुडे म्हणाले की, धान (ओलित) पिकाचे लागवडीकरिता येणारा खर्च जास्त

असल्याने तज्ञ समितीने शिफारस केलेल्या दरात वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे धान (ओलीत) पिकाचा एकरी दर रु. ३०००/- करण्यांत यावा अशी सुचना केली. श्री. आस्वकर यांनीही त्याचे मतास दुजोरा दिला.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे तज्ञ समितीने शिफारस केलेल्या दरांपैकी धान (ओलीत) पिकाकरिता वाढ करण्याविषयी शिफारस करुन सन १९९९-२००० चे पिक कर्जाचे एकरी दर व धोरण मंजूर करण्यांत आले. हे दर मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावे, असे ठरले.

| अ.न. | पिकाचे नांव | तज्ञ समितीने शिफारस केलेले दर | | | संचालक मंडळाची मंजूरी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नगदी | वस्तुरुप | एकूण | नगदी | वस्तुरुप | एकूण |
| १ | खरीप हंगाम :- | | | | | | |
| | अ) ओलीत पिके :- | | | | | | |
| १ | धान (अ.उ.दे.) | १४०० | ९०० | २३०० | २००० | १००० | ३००० |
| २ | ज्वारी (-"-) | ९०० | ६०० | १५०० | ९०० | ६०० | १५०० |
| ३ | कापूस | १९०० | १३०० | ३२०० | १९०० | १३०० | ३२०० |
| ४ | तूर | ११०० | ७५० | १८५० | ११०० | ७५० | १८५० |
| ५ | मिरची | १८०० | १२०० | ३००० | १८०० | १२०० | ३००० |
| ६. | संत्रा प्रतिझाड | २६ | १८ | ४४ | २६ | १८ | ४४ |
| ७ | केळी | २५०० | १५०० | ४००० | २५०० | १५०० | ४००० |
| ८ | भाजीपाला | १२०० | ७५० | १९५० | १२०० | ७५० | १९५० |
| ९ | ऊस पूर्व हंगाम | ४३०० | ३२०० | ७५०० | ४३०० | ३२०० | ७५०० |
| १० | ऊस सुरू हंगाम | ३८०० | २७०० | ६५०० | ३८०० | २७०० | ६५०० |
| ११. | ऊस खोडवा | ३२०० | २००० | ५२०० | ३२०० | २००० | ५२०० |
| १२. | चारा पिके लुसर्न | ९५० | ६५० | १६०० | ९५० | ६५० | १६०० |
| १३ | चारा पिके बरसीम | ६०० | ५५० | ११५० | ६०० | ५५० | ११५० |
| १४ | अद्रक/लसून/हळद | १००० | ५०० | १५०० | १००० | ५०० | १५०० |
| १५ | पानमळा (मशागत) | १००० | ६०० | १६०० | १००० | ६०० | १६०० |
| | ब) कोरडवाहू पिके- | | | | | | |
| १ | कापूस | १२५० | ८५० | २१०० | १२५० | ८५० | २१०० |
| २ | धान | ६५० | ४५० | ११०० | ६५० | ४५० | ११०० |
| ३ | ज्वारी | ७०० | ५०० | १२०० | ७०० | ५०० | १२०० |
| ४ | मिरची | १२०० | ८०० | २००० | १२०० | ८०० | २००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | भुईमुग | १३०० | ९०० | २२०० | १३०० | ९०० | २२०० |
| ६ | सोयाबीन | १३०० | ९०० | २२०० | १३०० | ९०० | २२०० |
| ७ | तूर | ७०० | ४५० | ११५० | ७०० | ४५० | ११५० |
| २ | रब्बी / उन्हाळी :- | | | | | | |
| १ | गहु अ.उ.दे. ओलीत | १३०० | ९०० | २२०० | १३०० | ९०० | २२०० |
| २ | चना ओलीत | ११०० | ८०० | १९०० | ११०० | ८०० | १९०० |
| ३. | गहु अउदे. कोरड | ६५० | ४५० | ११०० | ६५० | ४५० | ११०० |
| ४ | चना कोरड | ७०० | ५०० | १२०० | ७०० | ५०० | १२०० |
| ५ | जवस | ५०० | ३०० | ८०० | ५०० | ३०० | ८०० |
| ६ | तिळ | ५५० | ४५० | १००० | ५५० | ४५० | १००० |
| ७ | करडई / सुर्यफुल | ७०० | ४५० | ११५० | ७०० | ४५० | ११५० |
| ८ | भुईमुग उन्हाळी | १६५० | ११५० | २८०० | १६५० | ११५० | २८०० |
| ९ | सोयाबीन | १३५० | ९५० | २३०० | १३५० | ९५० | २३०० |

— ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५ :- सन् १९९८-९९ मध्ये करावयाच्या शेतकी कर्जवसुली बाबतच्या कृति कार्यक्रमास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ५ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना म्हणाले की, कर्जवाटप व कर्जवसुली या कामाची मुलभूत जबाबदारी प्राथमीक संस्थांची आहे. पीक कर्जाची परतफेड पीक कर्जातूनच होणे सहकारी अर्थव्यवस्थेची मुलभूत गरज आहे. कर्जवाटप वाढविण्याचे दृष्टीने प्रयत्न होत असतांना थकबाकीचे प्रमाणात वाढ होत आहे ही चिंतेची बाब आहे. थकबाकीचे प्रमाण कमी करण्याकरिता तसेच नाबार्डच्या धोरणानुसार वसुली शिस्तीच्या अटीचे पालन व्हावे. यासाठी वसुलीकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे. सन् १९९८-९९ करिता सहकारी संस्थांकडून जास्तीतजास्त शेतकी कर्जाची वसुली करण्याचे दृष्टीने करावयाच्या आवश्यक कार्यवाहीबाबत तसेच कर्जवसूलीशी संबंधीत कर्मचारी, अधिकारी व पदाधिकारी यांचेकडून अपेक्षीत असलेल्या कार्यवाहीचा कृति कार्यक्रम सभेच्या स्विकृतीकरिता ठेवलेला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, सन् १९९८-९९ करिता करावयाच्या शेतकी कर्जवसुलीच्या कृति कार्यक्रमास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

— ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६ :- बँकेचे सन् १९९७-९८ या वर्षाचे नफातोटा पत्रक व ताळेबंद पत्रक लेखा परिक्षकांचे अहवालासह प्रसिध्द करण्यासाठी दि. ३१/१२/९८ पर्यंत मुदतवाढ मिळण्यासाठी रिझर्व बँकेस विनंती करणे.

ठराव क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ कलम ३१ नुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याचे आंत म्हणजे ३०/९/९८ पूर्वी बँकेची आर्थिक पत्रके स्थानीक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक होते. तथापी लेखा परिक्षकाचा अहवाल मुदतीपूर्वी प्राप्त न झाल्याने प्रसिध्द करणे शक्य झाले नाही. यासाठी रिझर्व बँकेकडे दि. ३१/१२/१९९८ पर्यंत प्रसिध्दीसाठी मुदतवाढ मागवावी लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, खालील ठराव मंजूर करण्यांत आला.

— Resolution —

Resolved that the Reserve Bank of India, be and is requested to grant extention upto 31st Dec. 1998 under section 31 of the Banking Regulation Act 1949 for publication, submission of Balance sheet, profit and loss accout for the year ending 31-3-1998 alongwith Auditor's certificate. The delay in request for extention may please be condoned.

passed Unanimously.

—

विषय क्रमांक ७ :- सेवा सहकारी संस्थेच्या सभासदांचे नांवाने स्पेशल सेव्हींग खात्यात असलेली रक्कम त्यांचे कर्जखात्यात जमा करण्यांबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सध्याचे धोरणानुसार ज्या सेवा सहकारी संस्थेच्या सभासदांचे शेअर्स त्यांचेकडील कर्ज रकमेच्या ८० % पर्यंत जमा आहेत अशा सभासदास कर्ज देतांना शेअर्सपोटी कपात होणारी रक्कम पुन्हा त्यांचे शेअर्स खात्यात वळती न करता सभासदाचे नांवाने स्पेशल सेव्हींग खाते उघडून त्यात ५ वर्षाकरिता जमा करण्यांत येते. सध्या ५६ शाखात स्पेशल सेव्हींग खाती आहेत. या खात्यांना ५ वर्षे पूर्ण झाली आहेत या खात्यातील बाकीवर बचत ठेवींच्या ५½ % व्याजदराने व्याज देण्यांत येते. सभासदांचे कर्ज-

खात्यावर १३ टक्के अथवा त्यापेक्षा जास्त दराने व्याजाची आकारणी करण्यांत येते. त्यामुळे व्याजाचे नुकसान होते. अशा परिस्थीतीत कर्जदार शेतकरी सभासदांचे स्पेशल सेव्हींग खात्यात जमा असलेली रक्कम त्यांचे कर्जखात्यात वळती केल्यास काही प्रमाणात त्यांचेवरील व्याजाचा भूर्दंड कमी होण्यास मदत होईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, सेवा सहकारी संस्थेच्या सभासदांचे नांवाने जमा असलेली रक्कम त्यांचे स्पेशल सेव्हींग खाते बंद करुन त्यांचे कर्जखात्यात जमा करण्यांत यावी व तशी पावती संबधीत सभासदास देण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ८ :- गुंतवणूकीबाबत रिझर्व बॅंकेने दिलेल्या निर्देशांचे पालन करणे.

ठराव क्रमांक ८ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेस माहिती देतांना सांगितले की, निरनिराळ्या बॅंका त्यांचे ग्राहकांकरिता अनेक योजनांद्वारे प्रतिभूतींचे (सेक्युरिटीज) देवाणघेवाणीसाठी विश्वस्त म्हणून काम करतात. या प्रतिभूतींचे देवाणघेवाणीवर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने रिझर्व बॅंकेने काही नियम करविलेले आहेत. त्यानुसार प्रत्येक अर्धवार्षिक कालावधीचा आढावा घेऊन ठरविलेले धोरण, पध्दती आणि रिझर्व बॅंकेने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार गुंतवणूक होत आहे. याची निश्चीती करुन त्याची माहिती रिझर्व बॅंक / नाबार्ड यांचेकडे दर सहा महिन्यांनी पाठविणे आवश्यक आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, आपल्या बॅंकेने अजूनपर्यंत ग्राहकांकरिता प्रतिभूती प्रतिभूती गुंतवणूकीबाबत कोणतीही योजना तयार केलेली नाही. त्यामुळे ग्राहकांकरिता बॅंकेमार्फत अथवा ब्रोकरमार्फत प्रतिभूतींची देवाणघेवाण केली जात नाही. बॅंक केवळ तरती जिंदगी राखण्याकरिता आवश्यक असलेल्या प्रतिभूती रिझर्व बॅंकेमार्फत खरेदी करित असते. तसेच, प्रतिभूतींमध्ये गुंतवणूक करण्यासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत आले आहेत. हेच धोरण पुढेसुध्दा कायम ठेवण्यांत यावे व तसे रिझर्व बॅंकेला कळविण्यांत यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ९ :. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ९(१) :. सन १९९६-९७ चा अंकेक्षण अहवाल व या अहवालवरील/ राज्य स्तरीय लेखा समितीचे परिक्षण अहवालवरील पुर्तता अहवालास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ९(१) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह० संस्था (बँक) नागपूर यांनी सन १९९६-९७ ह्या वर्षाचे अंकेक्षण पूर्ण करून अंकेक्षण अहवाल बँकेस सादर केला. या अहवालवरील दोष दुरूस्ती पुर्तता अहवाल कार्यालयाने तयार केला आहे. याच अहवालवरील राज्य स्तरीय लेखा समितीचा परिक्षण अहवाल सुध्दा बँकेस प्राप्त झाला असून दोष दुरूस्ती पुर्तता अहवाल कार्यालयाने तयार केला आहे.

उपरोक्त दोन्ही पुर्तता अहवालावर दि. १०/१०/९८ व १५/१०/९८ रोजीचे मा. अंकेक्षण पुर्तता उपसमितीचे सभेत सविस्तर चर्चा करण्यांत येऊन काही किरकोळ दुरूस्त्यासह स्विकृती देण्यांत आली व दोष दुरूस्ती पुर्तता अहवाल मंजूरीसाठी मा. संचालक मंडळाचे सभेपूढे ठेवण्यांत यावेत असे ठरले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, सन १९९६-९७ च्या अंकेक्षण अहवालावरील तसेच राज्यस्तरीय लेखा समितीचे परिक्षण अहवालावरील दोष दुरूस्ती पुर्तता अहवालास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली. हे पुर्तता अहवाल संबाधितांकडे त्वरीत पाठविण्यांत यावेत, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ९(२) :. सहकारी उपसा जलसिंचन प्रकल्पाअंतर्गत ५०% शासकीय अनुदान मिळणेबाबत बँकेने सादर केलेली प्रकरणे मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडून नामंजूर करण्यांत आल्याबद्दल सभेला माहिती देणे.

ठराव क्रमांक ९(२) :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतर्फे पतपुरवठा होऊन कार्यान्वीत करण्यांत आलेल्या किरनापूर संगामपूर व पिपरा येथील तीन सहकारी उपसा जलसिंचन संस्थाची प्रकरणे ५०% शासकीय अनुदान मंजूरीकारिता मा. सहकार आयुक्त व निबंधक सह. संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे कार्यालयात पाठविण्यासाठी आवश्यक

कागदपत्रासह मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी यांचे कार्यालयास सादर करण्यांत आली होती तथापी मा. जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर यांनी त्यांचे दि. १५।१०।९८ चे पत्रानुसार उपरोक्त तिन्ही उपसा जलसिंचन संस्थांनी प्रकल्प उभारणीची कामे दि. ३१।३।९६ पूर्वी केली असल्याने व ह्या संस्था विहित अट पूर्ण करित नसल्याने शासकीय अनुदान मिळण्यास पात्र ठरत नसल्याचे कळविले असून प्रकरणे बॅंकेकडे परत पाठविली आहेत.

विषयावर साविस्तर चर्चा होऊन, मा. जिल्हा उपनिबंधक, सह संस्था, नागपूर यांनी शासकीय अनुदान नामंजूरीबाबत कळविलेल्या पत्राची सभेत नोंद घेण्यांत आली. तथापी याबाबत पुन्हा पाठपुरावा करण्यांत यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ९(३):. शासन निर्मित पदावर वसुली आधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या शासकीय आधिकाऱ्यांना वसुलीचे आधिकार प्रदान करण्याबाबत मा. जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ९(३):. नागपूर तालुक्याचे शासन निर्मित पदावरील वसुली आधिकारी श्री. डि. बी. पोफळी यांना दि. १।७।१९९८ पासून दि. ३०।६।९९ पर्यंत एक वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था आधिनियम १९६० चे कलम १५६(१) व १५६(२) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था आधिनियम १९६१ चे नियम २(एच) व (जे) तसेच नियम १०७ खालील आधिनियम (३)(४)(६)(७)(९)(१०) वगळून (१२)(१३)(१४)(१७)(१८) व (२०) नुसार कलम १०१ व कलम १०७ नुसार सेवा सहकारी संस्थांकडील वसुल दाखल्याची अंमलबजावणी करण्यासंबंधीचे आधिकार देणेबाबत मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ९(४):. शासन निर्मित पदावर विशेष वसुली आधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या आधिकाऱ्यांचे पगारावर झालेल्या खर्चाची रक्कम शासकीय खजिन्यात भरणा करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९(४) मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व

सभेला माहिती देतांना सांगितले की, मा. जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक जिउनि/वसुली/१०८१२/९८ दि. २८/५/९८ नुसार बँकेवर कार्यरत असलेले नागपूर व पाराशिवनी तालुक्याचे वसुली अधिकारी व त्यांचा कर्मचारी वर्ग यांचे पगारावर एप्रिल ९७ ते मार्च ९८ पर्यंत झालेला खर्च रु. २.७८ लाख शासकीय खजिन्यात भरणा करण्याबाबत कळविले आहे.

एप्रिल ९७ ते मार्च ९८ या कालावधीत शासकीय वसुली अधिकाऱ्यांचे पगारावर झालेला खर्च व सरचार्ज वसुलीची माहिती खालीलप्रमाणे –

| पगारावर झालेला खर्च (रुपये) | त्यांनी वसुल केलेला सरचार्ज (रुपये) | शासनाचे सरचार्ज खात्याला शिल्लक (रुपये) |
|---|---|---|
| २,७८,०००.०० | ३०,०००.०० | ८६९.०० |

सन् १९९७-९८ ह्या हंगामात नापिकीमुळे वसुलीची कारवाई न झाल्याने सरचार्ज वसुली कमी झाली आहे. तसेच शासनाचे सरचार्ज खात्यातील रक्कम फेब्रुवारी ९८ ला यापूर्वीचे खर्चापोटी तबदील केल्यामुळे रु. ८६५- शिल्लक आहे. दि. ३१।३।९८ ला बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांनी वसुल केलेल्या सरचार्जची रक्कम रु. २३७१७६/- मु.का.चे सरचार्ज खात्याला शिल्लक आहे. या खात्यातून शासकीय वसुली अधिकाऱ्यांचे पगारावर झालेल्या खर्चाची रक्कम शासकीय खजिन्यात भरणा करावी लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, शासकीय वसुली अधिकाऱ्यांचे पगारावर झालेल्या खर्चाची रक्कम रु. २.७८ लाख बँकेचे वसुली अधिकाऱ्यांनी वसुल केलेल्या सरचार्ज खात्यातून शासकीय खजिन्यात भरण्यास मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ९(५): श्री. दत्तु बाजीराव जिभकाटे यांनी बँकेविरुध्द त्यांना दि. १७।३।९४ ला कामावरुन कमी केल्याच्या आदेशाविरुध्द कामगार न्यायालयात दाखल केलेल्या केस क्र. १४१।९४ मध्ये मा. कामगार न्यायालय, नागपूर ह्यांनी पारीत केलेल्या आदेशाविरुध्द मा. औद्योगीक न्यायालय, नागपूर येथे अपील दाखल करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९(५): मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला

सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री. दत्तु बाजीराव जिभकाटे हे बँकेत ड्रायव्हर म्हणुन कार्यरत असतांना त्यांनी केलेल्या गैरकृत्याबद्दल बँकेचे खातेचौकशी करुन त्यात ते दोषी असल्याचे सिध्द झाल्याने दि. १७/१/९४ चे आदेशान्वये त्यांना कामावरुन कमी करण्यांत आले होते. सदर आदेशाविरुध्द श्री. जिभकाटे यांनी कामगार न्यायालय, नागपूर येथे बँकेविरुध्द केस क्र. १४१/९४ दाखल केली होती. सदर केसमध्ये दि. ६/११/९८ ला कामगार न्यायालयाने श्री. दत्तु जिभकाटे ह्यांची तक्रार मंजूर करुन बँकेने त्यांना कमी केलेल्या कालावधी-पासूनचा संपूर्ण पगार देऊन त्यांना पूर्ववत कामावर घेण्याबाबतचा आदेश दिला आहे. सदर आदेशाविरुध्द मा. कामगार न्यायालय, नागपूर येथे अपील दाखल करावी लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. दत्तु बाजीराव जिभकाटे ह्यांनी बँकेविरुध्द त्यांना दि. १७/१/९४ ला कामावरुन कमी केल्याच्या आदेशाविरुध्द कामगार न्यायालयात दाखल केलेल्या केस क्र. १४१/९४ मध्ये कामगार न्यायालय, नागपूर ह्यांनी पारीत केलेल्या आदेशाविरुध्द मा. औद्योगिक न्यायालय, नागपूर येथे अपील दाखल करण्यांत यावी. सदर अपील दाखल करण्याचे दृष्टीने आवश्यक कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक यांना देण्यांत येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ९(६) :- कापूस एकाधिकार खरेदी योजनेकरिता महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई यांचेसोबत कर्जसहभाग योजनेअंतर्गत निधीची गुंतवणूक करण्याचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार प्रदान करणे.

ठराव क्रमांक ९(६) :- एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत सन् १९९८-९९ चे हंगामातील कापूस खरेदीसाठी करावयाच्या कर्जपुरवठ्यात राज्य बँकेचे दि. ३/१०/९८ चे पत्रानुसार रु. २०.०० कोटीची गुंतवणूक राज्य बँकेच्या सहभाग योजनेअंतर्गत करण्याचे दृष्टीने राज्य बँकेसोबत करावयाच्या करारनाम्यावर व आवश्यक कागदपत्रावर बँकेच्या वतीने सह्या करण्याचे अधिकार सरव्यवस्थापक अथवा त्यांचे अनुपस्थितीत मुख्य हिशेबनीस यांना देण्यांत येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर उपस्थितांचे आभार मानुन मा. उपाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] सरव्यवस्थापक

[signature] अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूरच्या दिनांक १४।१४।१९९८ रोजी निवडून आलेल्या संचालक मंडळाची पहिली सभा शनिवार, दि. ३।१।१९९९ रोजी दुपारी १२.०० श्री. एल. आर. गुप्ता उपविभागीय अधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली बँकेच्या अध्यक्षतेखाली बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृति सभागृहात मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष यांचे निवडीसाठी घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

१. श्री. एल. आर. गुप्ता, उपविभागीय अधिकारी तथा सभाध्यक्ष
२. श्री. रमेश पांडुरंगजी गावंडे — संचालक
३. श्री. रमेशचंद्र गोपीकिसनजी बंग — "
४. श्री. भाउराव चंद्रभानजी शहाणे — "
५. श्री. अनिल रामकिशोरजी गुप्ता — "
६. श्री. वसंत भाउरावजी बांडे — "
७. श्री. अशोककुमार यशवंतराव गुजर — "
८. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कोल्हे — "
९. श्री. आशीष रणजीतबाबू देशमुख — "
१०. श्री. संतोषराव लिलबाजी चोरे — "
११. श्री. शामराव गणपतरावजी धवड — "
१२. श्री. विठ्ठल रामकृष्णाजी डुल्के — "
१३. श्री. विठ्ठलराव जागोबाजी राऊत — "
१४. श्री. नागोराव रघुनाथजी जिभकाटे — "
१५. श्री. विश्वनाथ विठोबाजी निमजे — "
१६. श्री. गणपती केवलराम शाहीर — "
१७. श्री. श्रावण निळकंठराव निमजे — "
१८. श्री. सुनिल छत्रपालजी केदार — "
१९. श्री. रमेशकुमार व्यंकटराव निमजे — "
२०. श्री. बबन भाउरावजी तायवाडे — "
२१. श्री. मुकुंद भिकाजी पन्नासे — "
२२. श्री. अशोक शंकरराव धार्मिक — "
२३. श्री. वसंतराव कवडूजी पारशिवनीकर — "
२४. श्री. चंद्रशेखर तुकारामजी समर्थ — "
२५. सौ. स्मिता अशोक कुंभारे — संचालिका

२६. सौ. कुसुमताई गजाननराव भिमतकर संचालिका
२७. सौ. आशाताई चंद्रजी महाजन "
२८. श्री. ए. एन. चौधरी सख्यवस्थापक

—

१. मा. सभाध्यक्ष यांनी सभेला उपस्थित असलेल्या नवनिर्वाचित संचालकांचे स्वागत करून मा. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची होणाऱ्या निवडणूकीचा कार्यक्रम वाचून दाखविला. दुपारी ठिक १२.०० वाजता सभेच्या कार्यवाहीस सुरवात झाली. सुरुवातीला संचालकांच्या उपस्थितीची नोंद हजेरी पुस्तकात स्वाक्षऱ्या करून घेण्यांत आली व कोरम पूर्ण झाल्यामुळे सभेची कार्यवाही सुरू करण्यांत आली.

२. नियोजीत कार्यक्रमाप्रमाणेच दुपारी ठिक १२.१५ वाजता नामनिर्देशन पत्राचे वितरण करण्यांत आले. नामनिर्देशन पत्रे स्विकारण्याची वेळ दुपारी १२.४५ पर्यंत होती. या वेळेत पुढीलप्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झाली व ते पाहणीस उपलब्ध ठेवण्यांत आले.

१. अध्यक्ष पदाकरिता :-

| अ.न. | उमेदवाराचे नांव | सुचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १. | अशोक शंकरराव धार्मिक | रमेश पांडुरंगजी गावंडे | श्रावण विठ्ठल भिसे |
| २. | सुनिल छत्रपालजी केदार | रमेशचंद्र गोपीकिसनजी बंग | बबन भाऊरावजी तायवाडे |
| ३. | सुनिल छत्रपालजी केदार | मुकुंद भिकूजी पन्नासे | भाऊराव चंद्रभानजी राहाणे. |

२. उपाध्यक्ष पदाकरिता :-

| अ.न. | उमेदवाराचे नांव | सुचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १. | चंद्रशेखर लक्ष्मणराव कोल्हे | अशोक यशवंतराव गुजर | विठ्ठल जागोबाजी राऊत |
| २. | सौ. आशाताई चंद्रजी महाजन | विश्वनाथ विठोबाजी विरखे | नागोराव रघुनाथजी भिवरे |
| २. | सौ. आशाताई चंद्रजी महाजन | वसंत कवडूजी पारशिवनीकर | चंद्रशेखर तुकारामजी समर्थ |

३. कार्यक्रमानुसार वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी ठिक १२.५० वाजता करण्यांत आली. कोणतेही आक्षेप प्राप्त झाले नाहीत. छाननीत वरीलप्रमाणे अध्यक्ष पदाकरिता तीन व उपाध्यक्ष पदाकरिता आलेली तिन नामनिर्देशन पत्रे वैध असल्याचे मा. सभाध्यक्ष यांनी घोषित केले. नामनिर्देशनपत्र परत घेण्याची वेळ दुपारी १.३० पर्यंत होती. या वेळेत श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कोल्हे यांनी उपाध्यक्ष पदाकरिता दाखल केलेले नामनिर्देशनपत्र परत घेतले.

४. दुपारी १.३५ वाजता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे मा. सभाध्यक्ष यांनी वाचून दाखविली व घोषित केले. अध्यक्ष

पदाकरिता दोन उमेदवाराची तीन नामनिर्देशनपत्रे आली. त्यांची नांवे पुढीलप्रमाणे —

१) श्री. अशोक शंकरराव धार्मिक

२) श्री. सुनिल छत्रपाल केदार.

उपाध्यक्ष पदाकरिता फक्त सौ. आशाताई चंद्रुजी महाजन यांचेच एकमेव नामनिर्देशन शिल्लक राहिल्याने या पदाकरिता त्यांची अविरोध निवड झाल्याचे मा. सभाध्यक्ष यांनी जाहिर केले.

अध्यक्ष पदाकरिता गुप्त मतदान पध्दतीने मतदान होईल असे जाहिर करण्यांत आले. मतदानाची प्रक्रीया सांगण्यांत आली. मतपेटी, मतदान कक्ष व नमुना मतपत्र सर्वांना दाखविण्यांत आले. मतदान कसे करावे याबाबत सर्वांना समजावून सांगण्यांत आले.

५. दुपारी ठिक २.०० वाजता अध्यक्ष पदासाठी मतदानाची प्रक्रीया सुरु करण्यांत आली. मतदान शांततेने संपल्यानंतर ठिक २.४५ वाजता मतमोजणी सर्वासमोर करण्यांत आली. अध्यक्ष पदाकरिता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना खालीलप्रमाणे मते प्राप्त झाली.

| अ.न. | उमेदवाराचे नांव | मिळालेली मते. |
|---|---|---|
| १. | श्री. अशोक शंकरराव धार्मिक | ०८ |
| २ | श्री. सुनिल छत्रपाल केदार | १८ |

वरीलप्रमाणे मतमोजणी पार पडल्यानंतर श्री. सुनिल छत्रपाल केदार यांना जास्त मते मिळाल्यामुळे त्यांना अध्यक्ष पदावर रितसर निवडून आल्याचे घोषित करण्यांत आले.

यानंतर नवनिर्वाचीत अध्यक्ष श्री. सुनिल छत्रपाल केदार व उपाध्यक्षा सौ. आशाताई चंद्रुजी महाजन यांचे सभाध्यक्ष यांनी अभिनंदन केले.

सभा चालविण्यास सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल तसेच निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानुन आजची निवडणूकविषयक सभा विसर्जीत झाल्याचे सभाध्यक्षांनी जाहिर केले.

(स्वाक्षरी) (स्वाक्षरी)

सरव्यवस्थापक
नागपूर डि.से. को. ऑप. बँक लि.
नागपूर

सभाध्यक्ष
उपविभागीय अधिकारी
नागपूर.

Exh 1318 Ex 103 

Exh 1318-A/3

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा मंगळवार दि. १५।१।१९९९ रोजी दुपारी १.०० वाजता बँकेच्या मुख्यकार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृति सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा.श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. | मा. श्रीमती आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. र. पां. गावंडे | संचालक |
| ४. | मा. श्री. र. गो. बंग | " |
| ५. | मा. श्री. भा. चं. शहाणे | " |
| ६. | मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ७. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ८. | मा. श्री. चं. ल. कोल्हे | " |
| ९. | मा. श्री. सं. लि. चोरे | " |
| १०. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ११. | मा. श्री. वि. रा. ढुलके | " |
| १२. | मा. श्री. ना. र. जिभकाटे | " |
| १३. | मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १४. | मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| १५. | मा. श्री. श्या. नि. निमजे | " |
| १६. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १७. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |
| १८. | मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| १९. | मा. श्री. अ. शं. धार्मिक | " |
| २०. | मा. श्री. व. क. पाराशिवनीकर | " |
| २१. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| २२. | मा. सौ. स्मिताताई कुंभारे | संचालिका |
| २३. | मा. सौ. कुसुमताई किम्मतकर | " |

२४. मा. श्री. पुरुषोत्तम डाखोळे, अध्यक्ष जिल्हा परिषद, नागपूर
२५. मा. श्री. एस. बी. पाटील, जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर.
२६. मा. श्री. एस. एस. सुपे, विशेष लेखा परिक्षक, वर्ग १ सह. संस्था (बँक) नागपूर (निमंत्रीत)
२७. मा. श्री. ए. एन. चौधरी, सरव्यवस्थापक

– अनुपस्थित –

१. मा. श्री. अ. य. गुजर संचालक
२. मा. श्री. आ. र. देशमुख "
३. मा. श्री. वि. जा. राऊत "
४. मा. श्री. सुभाष घोटे, प्रतिनीधी, महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई
५. मा. प्रतिनिधी, म. रा. सह. कृषी व ग्रामीण विकास बँक लि. मुंबई.
६. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर (निमंत्रित)
७. मा. विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. विभागीय कार्यालय, नागपूर (निमंत्रित)

—

सभेला उपस्थित असलेल्या संचालकांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांनी सभेच्या कामकाजास सुरवात केली.

सुरवातीला मा. अध्यक्ष यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांचा मा. संचालकांना परिचय करुन दिला. यानंतर बँकेच्या आर्थिक परिस्थितीबाबत सभेला माहिती करुन देण्यांत आली. मा. श्री. बबनराव तायवाडे यांनी बँकेच्या आर्थिक परिस्थितीबाबत सविस्तर माहितीची टिपणी सर्व संचालकांना पाठविण्यांत यावी. असे सुचविले. यावर मा. अध्यक्ष यांनी सर्व संचालकांना बँकेच्या अद्यावत आर्थिक परिस्थितीबाबत सविस्तर टिपणी पाठविण्यांत येईल असे सांगितले.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेची कार्यवाही सुरु केली.

विषय क्रमांक १ :- मागील दि. २७।११।१९९८ व दि. ९।१।९९ रोजी झालेल्या सभांची प्रतिवृत्ते कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, मागील दि. २७।११।९८ व दि. ९।१।९९ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळ सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

—

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले.

विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक २७/११/९८ व दिनांक ५/१/९९ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाचे सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

—

विषय क्रमांक ३ :. बँकेचे मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष व अधिकारी यांना पोटनियमात असलेले अधिकार प्रदान करणे.

ठराव क्रमांक ३ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना मा. सरव्यवस्थापक म्हणाले की, नवनिर्वाचित संचालक मंडळाचे दि. ५/१/१९९९ चे सभेत मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष व बँकेचे अधिकारी यांना द्यावयाचे आर्थिक व प्रशासकीय अधिकार संचालक मंडळास आहेत. यापूर्वी असे अधिकार पदाधिकारी व अधिकारी यांना देण्यांत आले होते. त्याची माहिती टिपणीसोबत देण्यांत आली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या पोटनियम क्रमांक २९ नुसार मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष व अधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे प्रशासकीय व आर्थिक व्यवहार करण्याचे अधिकार प्रदान करण्यांत आले.

| अ.क्र. | अधिकाराचे स्वरुप | कुणाला प्रदान करावयाचे | प्रदान केलेल्या अधिकाराचे स्वरुप व मर्यादा ..... |
|---|---|---|---|
| १ | कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजा मंजूर करणे. | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष | सरव्यवस्थापक, व्यवस्थापक यांच्या किरकोळ रजा. |
| | | सरव्यवस्थापक | मुख्याधिकारी यांच्या किरकोळ रजा |
| | | मुख्याधिकारी (प्रशासन) | विभागीय अधिकारी आणि मुख्यकार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजा. |
| | | विभागीय अधिकारी | विभागातील शाखांचे शाखा व्यवस्थापक यांच्या किरकोळ रजा |
| | | शाखा व्यवस्थापक | शाखेतील काम करणारे सर्व कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजा. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | किरकोळ रजेशिवाय इतर रजा (हक्काची व वैद्यकीय) मंजूर करणे | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष | सरव्यवस्थापक, व्यवस्थापक यांच्या रजा. |
| | | सरव्यवस्थापक/व्यवस्थापक | बँकेचे मुख्य कार्यालय व शाखा कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या रजा. |
| | | मुख्याधिकारी (प्रशासन) | मुख्याधिकारी सोडून इतर सर्व कर्मचाऱ्यांच्या रजा. |
| ३. | समर्पित रजा | सरव्यवस्थापक/व्यवस्थापक | बँकेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या रजा. |
| ४. | कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणे | सरव्यवस्थापक/व्यवस्थापक | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष यांची पूर्व संमती घेऊन बदल्या करणे. |
| ५. | शाखांचे प्रशासन, नियंत्रण व व्यवस्थापन यासंबंधी शाखांना निर्देश देणे. | सरव्यवस्थापक/व्यवस्थापक | मा. अध्यक्ष /उपाध्यक्ष यांची संमती घेऊन धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणे. |
| ६. | बँकेच्या अस्थायी मालमत्तेच्या व्यवस्थापनाकरिता एकावेळी किरकोळ खर्च मंजूर करणे. | शाखा व्यवस्थापक (ब वर्ग) | रुपये ३०.०० पर्यंत |
| | | शाखा व्यवस्थापक (अ वर्ग) | रुपये ५०.०० पर्यंत |
| | | विभागीय अधिकारी | रुपये ७५.०० पर्यंत |
| | | मुख्याधिकारी | रुपये १००.०० पर्यंत |
| | | व्यवस्थापक/सरव्यवस्थापक | रुपये ५००.०० पर्यंत |
| | | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष | रुपये ५००.०० चे वर |
| ७. | कर्मचाऱ्यांना व पदाधिकाऱ्यांना कार्यालयीन कामाकरिता तातुरता अग्रीम मंजूर करणे. | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष | रुपये ५००.०० चे वर |
| | | सरव्यवस्थापक/व्यवस्थापक | रुपये ५००.०० पर्यंत |
| ८ | व्यवस्थापक समितीचे निर्णयानुसार दिवाळी / धान्य खरेदीकरिता अग्रीम मंजूर करणे | मुख्याधिकारी (प्रशासन) | मुख्य कार्यालयातील सर्व कर्मचारी |
| | | शाखा व्यवस्थापक | शाखा कार्यालयात काम करणारे सर्व कर्मचारी |
| ९ | निर्धारीत केलेल्या अथवा ठरवून दिलेल्या दरानुसार प्रशासकीय खर्चाची बिले मंजूर करणे: उदा.- इले. बिले, टेलीफोन बिले पाणी बिल, कर इत्यादी. | शाखा व्यवस्थापक | शाखेशी संबंधीत रु. १००.०० पर्यंत |
| | | विभागीय अधिकारी | विभागाशी संबंधीत रु. २००. पर्यंत |
| | | मुख्याधिकारी (प्रशासन) | रुपये २००.०० पर्यंत |
| | | सरव्यवस्थापक/व्यवस्थापक | रुपये १०००.०० पर्यंत |
| | | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष | रुपये १०००.०० चे वरील |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | निविदा मंजूर करणे (ईमारत बांधकाम व इमारत दुरुस्ती सोडून) | सरव्यवस्थापक | रु.१०००/- पर्यंत खरेदी असल्यास |
| | | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष | रु.१०००/- चे वर परंतु रु.२.०० लाख पर्यंत खरेदी असल्यास |
| | | मा. व्यवस्थापक समिती | रुपये २.०० लाखाचे वर परंतु रु. १०.०० लाखापर्यंत खरेदी असल्यास |
| | | मा. संचालक मंडळ | रु. १०.०० लाखाचे वर खरेदी करावयाची |
| ११. | इमारत दुरुस्तीसाठी खर्च मंजूर करणे | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष | रु. २.०० लाखापर्यंत |
| | | मा. व्यवस्थापक समिती | रु. २.०० लाखाचे वर. |
| १२. | जागा खरेदी करून इमारत बांधकाम करण्यासाठी निधीची गुंतवणूक करणे. | मा. व्यवस्थापक समिती | रु. २०.०० लाखापर्यंत |
| | | मा. संचालक मंडळ | रु. २०.०० लाखाचे वर. |
| १३. | शाखा इमारतीचे भाडे ठरविणे | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष | शाखा कार्यालयाकरिता भाड्याने घेतलेल्या इमारतीचे मासिक भाडे ठरविणे व त्यानुसार करारनामा करणे |
| १४ | कर्मचाऱ्यांची जमा असलेली सुरक्षा ठेव परत करणे. | सरव्यवस्थापक / व्यवस्थापक | बँकेतील सर्व कर्मचाऱ्यांची |
| १५. | कर्मचाऱ्यांची टूर दैनंदिनी व प्रवास खर्चाची बिले मंजूर करणे. | सरव्यवस्थापक / व्यवस्थापक | रुपये ५००.०० पर्यंत |
| | | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत / मा. उपाध्यक्ष | रुपये ५००.०० चे वर. |
| १६. | कर्मचाऱ्यांची मासीक वेतन बिले व इतर तत्सम बिले मंजूर करणे. | सरव्यवस्थापक / व्यवस्थापक / मुख्याधिकारी | मुख्य कार्यालयातील सर्व कर्मचारी आणि आवश्यकता असल्यास शाखा कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मासीक वेतन बिले. |
| | | विभागीय अधिकारी | संबधीत विभागातील शाखेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वेतन बिले. |
| १७ | वार्षिक वेतनवाढ मंजूर करणे | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष | बँकेतील सर्व कर्मचारी. |
| १८. | कर्मचाऱ्याचा राजीनामा मंजूर करणे, कर्मचाऱ्यास निलंबित करणे व खाते चौकशी अधिकारी नेमणे. | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत मा. उपाध्यक्ष | बँकेतील सर्व कर्मचारी |
| १९ | खाते चौकशीचा आदेश देणे | सरव्यवस्थापक / व्यवस्थापक | बँकेतील सर्व कर्मचारी |
| २० | कोर्ट केसेस :- अ) वकील नेमणे | मा. अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत उपाध्यक्ष | बँकेतील सर्व कर्मचारी |
| | ब) शपथपत्र देणे व साक्ष देणे | सरव्यवस्थापक / व्यवस्थापक / मुख्याधिकारी | बँकेतील सर्व कर्मचारी |
| | क) वकालतनामा देणे. | सरव्यवस्थापक / व्यवस्थापक मुख्याधिकारी / उपमुख्याधिकारी | बँकेतील सर्व कर्मचारी. |

- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ४ :. बँकेच्या पोटनियम क्रमांक २६ (xviii) प्रमाणे पुढील कालावधीकरिता व्यवस्थापक समिती व इतर उपसमित्यांची नियुक्ती करणे व या समित्यांना पोटनियमानुसार असलेले अधिकार प्रदान करणे.

ठराव क्रमांक ४ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी विषयाचे अनुषंगाने सखोल माहिती देतांना सांगितले की, बँकेचे पोटनियम क्रमांक २६ (xviii) नुसार पुढील कालावधीकरिता व्यवस्थापक समिती व इतर उपसमित्यांची नियुक्ती करावयाची आहे. पोटनियम क्र. ३१ प्रमाणे ११ सदस्यांची व्यवस्थापक समिती नियुक्त करावयाची आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, बँकेच्या पोटनियम क्र. २६ (xviii) नुसार पुढील कालावधीसाठी व्यवस्थापक समिती व इतर उपसमित्या नियुक्त करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्षा यांना देण्यांत येत आहेत. या समित्यांना खालील प्रमाणे अधिकार राहतील, असे ठरले.

| अ.क्र. | समिती | प्रदान केलेल्या अधिकाराचे स्वरूप. |
|---|---|---|
| १ | व्यवस्थापक समिती | बँकेच्या पोटनियम क्र. ३२ नुसार दिलेले अधिकार |
| २ | सेवक उपसमिती | पोटनियम क्र. २६ (vi) मधील तरतुदीप्रमाणे नेमलेल्या कर्मचाऱ्यांना नोकरित कायम करणे, कर्मचाऱ्यांना बढती देणे, स्थायी आदेशातील तरतूदीप्रमाणे कारवाई करणे, निलंबीत करणे, शिक्षा देणे, राजीनामा मंजूर करणे, नोकरीतून बडतर्फ करणे इ. |
| ३ | अंकेक्षण पुर्तता उपसमिती | नाबार्ड, राज्य बँक व मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक) नागपूर, राज्यस्तरीय लेखा समिती यांनी वेळोवेळी घेतलेल्या तपासण्या/अंकेक्षण अहवालावरील कार्यालयाने तयार केलेल्या पुर्तता अहवालासंबंधी सविस्तर आढावा घेऊन मंजूरीकरिता मा. संचालक मंडळास शिफारस करणे. |
| ४ | इमारत बांधकाम उपसमिती | मा. संचालक मंडळ/ व्यवस्थापक समिती यांनी इमारत बांधकामाबाबत तसेच स्थावर मालमत्ता खरेदीबाबत वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीचा व बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेणे. |
| ५. | विकास उपसमिती | नाबार्ड व राज्य बँक पुरस्कृत विकासात्मक योजना राबविण्या-बाबत संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजा-वणी करण्याचे दृष्टीने कामकाजाचा, कर्जवाटपाचा व कर्ज वसुलीचा आढावा घेणे. |

– ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५ :. बँकेच्या पोटनियम क्रमांक २६ (xix) नुसार कर्ज उपसमितीची नियुक्ती करणे व ह्या समितीस पोटनियमानुसार असलेले अधिकार प्रदान करणे.

ठराव क्रमांक ५ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या पोटनियम क्र. २६ (xix) नुसार पुढील कालावधीकरिता ६ सदस्यांची कर्ज उपसमिती नियुक्त करावयाची असून ह्या समितीस कर्ज मंजूरीबाबतचे अधिकार द्यावयाचे आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, बँकेच्या पोटनियम क्र. २६ (xix) नुसार कर्जउपसमितीची नियुक्ती करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष यांना देण्यात येत आहेत. ह्या कर्जमंजूरीबाबतचे तसेच कर्जाचे नुतनीकरण करणे, थकीत कर्जास मुदतवाढ देणे, थकीत कर्जाचे मध्यम मुदती कर्जात रूपांतर करणे इ. प्रकरणांची तातडीने व आवश्यकतेप्रमाणे निपटारा करण्याचे अधिकार राहतील. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ :. बँकेला संलग्न असलेल्या संस्था तसेच इतर सहकारी संस्थावर पोटनियम क्रमांक २६ (xxvi) नुसार प्रतिनीधींची नियुक्ती करणे.

ठराव क्रमांक ६ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या पोटनियम क्रमांक २६ (xxvi) नुसार बँकेला संलग्न असलेल्या संस्था व इतर सहकारी संस्थांवर प्रतिनीधींची नियुक्ती करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष यांना देण्यात येत आहेत, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७ :. बँकेच्या चालु ठेव खात्यावर व्यवहार करण्यास अधिकार देणे.

ठराव क्रमांक ७ :. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने माहिती देतांना मा. सरव्यवस्थापक म्हणाले की, आपल्या बँकेचे रिझर्व बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लि. आणि स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांमध्ये चालु ठेव खाते असून या खात्यावर उपविधी कलम ६४ नुसार व्यवहार करण्यास अधिकार देणेसंबंधी पदाधिकारी बदलल्याने नवीन ठराव पारित करणे आवश्यक आहे.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे इंग्रजीतील ठरावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

- Resolution -

Resolved that the following office bearers and officers in Head office are authorised to sign cheques, Demand Drafts and Hundies, Issue Deposit receipts, Endorse Bills of Exchange and Bank Post Bills and sign receipts on behalf of the bank, jointly any two from Group 'A' or anyone from Group 'A' and one from Group 'B' as given below :-

1) Chairman
2) Vice-chairman
3) General Manager
4) Manager
5) Chief Accountant
6) Chief officer
7) Dy. chief officer

} Group 'A'

8) All Accountants in Head office - Group 'B'

Further resolved that in case of Branches any two of the following are jointly authorised to sign cheques, drafts, Hundies, Deposit reciepts and to endorse bills of Exchange, Bank Post office and sign receipts on behalf of the bank.

1) Regional officer 2) Branch Manager
3) Accounts clerk 4) Cashier

Further also resolved that Chairman or vice-chairman empowered to delegate the powers by name as stated above.

passed Unanimously.

—

विषय क्रमांक ८ :. सरकारी प्रतिभूतीच्या खरेदी, विक्री, पृष्ठांकन, परक्रामण, तबदीली इ. व्यवहाराबाबत अधिकार प्रदान करणे.

ठराव क्रमांक ८ :. मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना

सांगितले की, यापूर्वी दि. २१।५१९९२ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाचे सभेतील ठराव क्र. ७ नुसार बँकेचे पोटनियम क्र. २६ (xv) नुसार सरकारी प्रतिभूतींच्या खरेदी, विक्री, पृष्ठांकन, परक्रामण, तबदीली इ. व्यवहार करण्याचे अधिकार देण्यांत आले होते. नवीन संचालक मंडळ पदारूढ झाल्याने व पदाधिकारी बदलल्यामुळे पूर्वीचा ठराव रद्द करून असे अधिकार देण्यासबधीचा नवीन ठराव रिझर्व बँकेस देणे आवश्यक आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे इंग्रजीतील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत आला.

— RESOLUTION —

In supersession of the previous Resolution No.7 of The Nagpur District central Co.operative Bank Ltd. Nagpur dated 21-9-1993 it is hereby resolved that any two of the following namely-

1) Shri S.C. Kedar — Chairman
2) Sau A.C. Mahajan — Vice-Chairman
3) Shri A.N. Chaudhary — General Manager
4) Shri A.G. Gokhale — Chief Accountant
5) Shri S.S. Gode — Chief Officer (Admn)

are hereby authorised jointly to purchase, sell, Endorse, Negotiate, Transfer or otherwise deal with Government and any securities for and on behalf of the Nagpur District central Co-operative Bank Ltd. Nagpur and also to receive the principal and interest due thereon.

— Passed Unanimously.

---

विषय क्रमांक ९ :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणारे विषय.

विषय क्रमांक ९(१) :- वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूरीसंबंधी नियमात सुधारणा करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९(१) :- ज्या कर्मचाऱ्यांचे पगार आपले बँकेमार्फत होतात, अशा कर्मचाऱ्यांचे पगाराचे बचत ठेव खात्यावर वैयक्तिक ओव्हरड्राफ्ट मर्यादा बँकेमार्फत मंजूर करण्यांत येतात.

यांचेकडे त्वरीत प्रकरण सादर करण्यांत यावे. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना देण्यांत येत आहेत.

सुचक- श्री. र. व्यं. बिजवे.

अनुमोदक - श्री. अ. रा. गुप्ता.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ९(३): नागपूर शहरातील 'झिंगाबाई टाकळी' या भागात बँकेची शाखा उघडण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९(३): नागपूर शहरातील 'झिंगाबाई टाकळी' या भागात कोणत्याही बँकेची जवळपास शाखा नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याने आपल्या बँकेची शाखा उघडावी अशी त्यांची मागणी आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना बँकींग सुविधा उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने आपल्या बँकेची शाखा उघडण्यात यावी, ही शाखा उघडण्यांस परवानगी मिळण्यासाठी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म. रा. पुणे यांचेकडे त्वरीत प्रकरण सादर करण्यांत यावे.

सुचक: श्री. बबनराव तायवाडे

अनुमोदक: श्री. मुकुंदराव पन्नासे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेचा वृत्तांत खालीलप्रमाणे —

मा. श्री. चं. तु. समर्थ, संचालक म्हणाले की, मा. अध्यक्ष यांनी बँकेची आर्थिक परिस्थिती विशद करतांना सांगितले की, बँकेकडे सद्या रु. ५०.०० कोटीचे अतिरिक्त निधी आहेत. ह्या निधीची गुंतवणूक करण्याचा बँकेसमोर प्रश्न आहे. त्यासाठी किफायतशीर गुंतवणूक होणे आवश्यक असल्याने बँकेच्या कर्जपुरवठ्यात वाढ करणे अत्यंत गरजेचे आहे. बँकेच्या शाखा, त्या शाखेस संलग्न असलेल्या सहकारी संस्था व संस्थेचे सभासद ह्या सर्वांना कर्जवाटप झाले पाहीजे, तसेच संगणीकरण झाले पाहिजे.

मा. श्री. विश्वनाथ निमजे, संचालक यांनी विणकर संस्थांचे कर्जपुरवठ्याबाबत दि. ३१-५-१९९२ चे संचालक मंडळाचे सभेत पारीत केलेल्या ठरावात बदल करावा अशी सूचना केली.

हा कर्जपुरवठा बँकेच्या दृष्टीने अत्यंत सुरक्षित असा कर्जपुरवठा आहे. त्यामुळे सध्याचे धोरणातील अटीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यांत यावा.

| अ.न. | सध्याची अट | सुधारीत अट |
|---|---|---|
| १ | ओव्हर ड्राफ्ट मर्यादा मागणी करणाऱ्या अर्जदाराची नोकरीत कायम झाल्यानंतरची सेवा २ वर्षापेक्षा जास्त असावी | अर्जदार नोकरीत कायम असावा, व रूजू झाल्यापासून सलग दोन वर्षाची सेवा झालेली असावी आणि नोकरीत सेवानिवृत्तीला किमान दोन वर्ष शिल्लक असलेला असावा. |
| २ | कर्मचाऱ्यास निव्वळ मिळणारी रक्कम एकुण पगाराचे कमीतकमी ४०% असावी. | निव्वळ मिळणारी पगाराची रक्कम एकूण पगाराच्या कमीतकमी २५% असेल, अशीच व्यक्ती ओव्हर ड्राफ्ट कर्ज घेण्यासाठी पात्र समजण्यांत येईल. |

सदर्हू योजनेचा लाभ जून्या सभासदांना सुध्दा घेता येईल, परंतु त्यांनी नवीन दराने ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूर झाल्यानंतर त्यांचेकडील शिल्लक रकमेची व्याजासह परतफेड करणे आवश्यक राहील. त्यानंतरच नवीन मर्यादेवर उचल देण्यांत यावी.

सुचक :. श्री. बबनराव तायवाडे
अनुमोदक :. श्री. वसंतराव वाढे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६(२) :. बँकेच्या संचालकांचा अभ्यास दौरा कार्यक्रम आयोजित करणे.

ठराव क्रमांक ६(२) :. बँकेच्या संचालकांचा राजस्थान, दिल्ली, हरयाना, व हिमाचल प्रदेश या राज्यातील सहकारी बँका व इतर सहकारी संस्थांचे कार्यपध्दतीचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास दौरा कार्यक्रम आयोजीत करण्यांत यावा. नियोजित अभ्यास दौरा करण्यास परवानगी मिळण्यासाठी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सह. संस्था म.रा. पुणे

मा. श्री. पाराशिवनीकर, संचालक यांनीही त्यांचे मतास दुजोरा दिला.

मा. श्री. अशोकराव धार्मिक यांनी मुख्य कार्यालयापासून २० किलोमिटरचे आंतील शाखांमध्ये क्लिअरिंगची सुविधा उपलब्ध करण्याबाबत तसेच कळमेश्वर शाखेत पुरेसा कर्मचारी वर्ग देण्याची सुचना केली.

यावर मा. अध्यक्ष यांनी मा. संचालकांनी केलेल्या सुचनांचा विचार करून योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल, असे सांगितले.

यानंतर उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सरव्यवस्थापक      अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि. नागपूर

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा शनिवार दि. २०/३/८८ रोजी दुपारी १.०० वाजता बँकेच्या मुख्यकार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृति सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

१. मा. श्री. सुनिल केदार — अध्यक्ष
२. मा. सौ. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
३. मा. श्री. र. पां. गावंडे — संचालक
४. मा. श्री. भा. चं. शहाणे — "
५. मा. श्री. अ. रा. गुप्ता — "
६. मा. श्री. व. भां. वांढे — "
७. मा. श्री. अ. य. गुजर — "
८. मा. श्री. चं. ल. कोल्हे — "
९. मा. श्री. आ. र. देशमुख — "
१०. मा. श्री. सं. लि. चोरे — "
११. मा. श्री. शा. ग. धवड — "
१२. मा. श्री. वि. रा. ढुलके — "
१३. मा. श्री. वि. जा. राऊत — "
१४. मा. श्री. ग. के. शाहिर — "
१५. मा. श्री. श्रा. नि. निमजे — "
१६. मा. श्री. र. व्यं. निमजे — "
१७. मा. श्री. ब. भा. तायवाडे — "
१८. मा. श्री. मु. भि. पन्नासे — "
१९. मा. श्री. अ. शं. धार्मीक — "
२०. मा. श्री. चं. तु. समर्थ — "
२१. मा. सौ. कु. ग. किम्मतकर — संचालिका
२२. मा. श्री. सुभाष धोटे, प्रतिनीधी, महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई.
२३. मा. श्री. एस. बी. पाटील- जिल्हा उपनिबंधक, सह संस्था, नागपूर.
२४. मा. श्री. एम. के. शेंडे, विशेष लेखा परिक्षक वर्ग १, सह. संस्था (बँक) नागपूर
२५. मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

— अनुपस्थित —

१. मा. श्री. र. गो. वंग — संचालक
२. मा. श्री. ना. र. निमकार्डे — "

२२/६/९८

३) मा. श्री. व. क. पाराशिवनीकर संचालक
४. मा. श्री. वि. वि. निमजे "
५. मा. सौ. स्मिताताई कुंभारे "
६. मा. प्रतिनीधी, म. रा. सह. कृषि व ग्रामिण विकास बँक लि. मुंबई.
७. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर
८. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर (निमंत्रीत)
९. मा. विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
विभागीय कार्यालय, नागपूर (निमंत्रीत)

—

सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरवात केली.

सुरवातीला सभेला अनुपस्थित असलेले संचालक मा. श्री. र. गो. बंग, मा. श्री. ना. र. जिभकाटे, मा. श्री. वि. वि. निमजे, मा. श्री. व. क. पाराशिवनीकर व संचालिका मा. सौ. स्मिताताई कुंभारे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

सभेच्या विषयपत्रिकेवरील विषयानुसार चर्चा करण्यापूर्वी बँकेचे मुख्याधिकारी श्री. विजय राऊत व शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. प्रभाकरराव दटके यांचे निधन झाल्यामुळे त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांना आवाहन केले. त्याप्रमाणे सभेतील उपस्थितांनी दोन मिनीटे उभे राहून आपली मुक श्रध्दांजली अर्पण केली. यानंतर खालीलप्रमाणे दुःखवट्याचा ठराव मंजूर करण्यांत आला.

— ठराव —

आपल्या बँकेचे मुख्याधिकारी श्री. विजय शेषरावजी राऊत यांचे दि. ४/५/१९९९ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मृत्यूमुळे आपण एका कार्यकुशल अधिकाऱ्यास मुकलो आहोत. तसेच शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. प्रभाकरराव दटके यांचे दि. १५/३/९९ रोजी हृदयविकाराने दुःखद निधन झाले. श्री. दटके यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीत शिक्षक सहकारी बँकेने नेत्रदिपक प्रगती केली आहे. त्यांच्या मृत्यूमुळे आपण सहकारी चळवळीतील एका कुशल संघटकास मुकलो आहोत.

उभयतांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. परमेश्वर त्यांना दुःख सहन करण्याची शक्ती देवो तसेच मृतकाचे आत्म्यास शांती आणि सद्गती देवो, ही प्रभूचरणी प्रार्थना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेच्या कार्यवाहिस सुरवात केली.

विषय क्रमांक १:. मागील दिनांक १५।३।१९९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावरील चर्चेत भाग घेतांना मा. श्री. बबनराव तायवाडे यांनी मागील दि. १५।३।९९ चे सभेत पारीत केलेल्या ठराव क्र. ६(७) नुसार वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूरीचे संबंधीत नियमात सुरक्षीततेच्या दृष्टीने ही योजना इन्शुरन्सशी लिंक करावी अशी सुधारीत अट घालण्यांत यावी, अशी दुरुस्ती सुचविली त्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागिल दिनांक १५।३।९९ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळ सभेचे प्रतिवृत्त दुरुस्तीसह सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक २:. मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक १५।३।१९९९ रोजीचे मा. संचालक मंडळाचे सभेत पारीत झालेल्या ठरावांबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेला माहिती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ३:. मध्यम मुदती नियमीत शेती पतपुरवठा धोरणा-अंतर्गत विवीध कर्जकारणाकरिता बँकेमार्फत करण्यांत

आलेल्या कर्जवाटपाअंतर्गत राष्ट्रीय / राज्य बँकेकडून कमी व्याजदराच्या फेरकर्जाची वाढीव मर्यादा रु. १०५.०७ लाख मंजूर करणेबाबत तसेच उचल मिळणेबाबत राज्य बँकेस विनंती करणे, तसेच फेरकर्ज मंजूरीसंदर्भात राज्य बँकेच्या अटी व शर्तीस मंजूरी देण्याकरिता दि. १८।३।१९९९ रोजीचे सर्क्युलर मिटींगमध्ये पारीत केलेला ठराव कायम करणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहीती देतांना सांगितले की, राज्य बँकेकडून कमी व्याजदराचे फेरकर्ज घेणे बँकेच्या दृष्टीने हिताचे असल्याने व सदर फेर कर्जाची उचल ३१ मार्च १९९९ पूर्वी करावयाची असल्याने फेरकर्जमागणी अर्ज राज्य सहकारी बँकेकडे सादर करण्याकरिता दि. १८।३।९९ रोजी सर्क्युलर मिटींग घेऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करून हा ठराव राज्य बँकेकडे पाठविण्यांत आला आहे.

विषयाचे अनुषंगाने सभेत चर्चा होऊन, खालिलप्रमाणे दि. १८।३।९९ रोजीचे सर्क्युलर मिटींगमध्ये पारीत केलेला ठराव सर्वानुमते कायम करण्यांत आला.

- ठराव -

सन् १९९८-९९ या आर्थिक वर्षात जिल्हा बँकेमार्फत मध्यम मुदती नियमीत पतपुरवठा धोरणांतर्गत समाविष्ठ विविध कर्जकारणापोटी पात्र सभासदांना मंजूरीअंती कर्जवाटप करण्यांत आले आहे. या कर्जकारणांपैकी बँकींग प्लॅन (ए.आर.एफ.एस) अंतर्गत समाविष्ठ क्र. १) लघुसिंचन २) दुभती जनावरे वाटप ३) मळणी यंत्र (कृषि यांत्रीकीकरण) ४) आय.आर.डी.पी. इत्यादी कारणापोटी राज्य बँकेकडून कमी व्याजदराचे फेरकर्जाची उचल घेणे बँकेस आर्थीकदृष्ट्या हिताचे असल्याने वर निर्देशीत कर्जकारणापोटी खालीलप्रमाणे नवीन वाढीव फेरकर्जमर्यादा उपलब्ध करून देण्याबाबत राज्य बँकेस विनंती अर्ज करण्याचे ठरले. तसेच सदर कर्ज कारणापोटी करण्यांत आलेल्या कर्जवाटपापोटी पात्र फेरकर्ज उचल मंजूरीबाबत विनंती करण्याचे ठरले.

फेरकर्ज मंजूरीसंबंधात राज्य बँकेच्या अटी व शर्ती जिल्हा बँकेस मान्य आहेत.

| अ. क्र. | कर्ज कारण | वाढीव फेरकर्जमर्यादा मंजूरीबाबत मागणी (रु. लाखात) | फेरकर्ज उचल मागणी (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| १ | लघुसिंचन | ६५.०० | २७.८४ |
| २ | दुभती जनावरे वाटप | १०.०० | ४.९५ |
| ३ | कृषि औजारे मळणी यंत्रे | २५.०० | १०.८० |
| ४ | आय.आर.डी.पी. | ५५.०० | १२.१४ |
| | एकूण | १०५.०० | ५५.७३ |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ४:. मध्यम मुदती नियमीत शेतीपतपुरवठा धोरणांतर्गत विवीध कारणांपैकी, बँकेमार्फत कृषि यांत्रीकीकरण व एस.आर.टी.ओ. या कर्जकारणांकरिता करण्यांत आलेल्या कर्जवाटपापोटी राष्ट्रीय/राज्य बँकेकडून कमी व्याजदराच्या फेरकर्जाची वाढीव मर्यादा रु. ५००.०० लाख मंजूरीबाबत व या मर्यादेवर उचल मिळणेबाबत राज्य बँकेस विनंती करणे तसेच फेर कर्ज मंजूरी संबंधात राज्य बँकेच्या अटी व शर्तीस मंजूरी देण्याकरिता दि. ३।३।१९९९ रोजीचे सर्क्युलर मिटींगचा ठराव कायम करणे.

ठराव क्रमांक ४:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सभेत सविस्तर चर्चा होऊन दिनांक ३।३।१९९९ रोजीचे सर्क्युलर मिटींगमध्ये पारीत केलेला खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते कायम करण्यांत आला.

— ठराव —

सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात जिल्हा बँकेमार्फत मध्यममुदती नियमीत पतपुरवठा धोरणाअंतर्गत समाविष्ठ विवीध कर्जकारणापोटी पात्र सभासदांना मंजूरीअंती कर्जवाटप करण्यांत आले आहे. या कर्जकारणांपैकी बँकींग प्लॅन (ए.आर.एफ.एस) अंतर्गत समाविष्ठ क्र. १) कृषि यांत्रीकीकरण २) एस.आर.टी.ओ. या कारणापोटी राज्य बँकेकडून कमी व्याजदराचे फेर कर्जाची उचल घेणे बँकेला आर्थिक दृष्टया हिताचे असल्याने

वर निर्देशीत कर्ज कारणापोटी खालीलप्रमाणे वाढीव फेर कर्ज मर्यादा उपलब्ध करून देण्याकरिता राज्य बँकेस विनंती करण्याचे ठरले. तसेच सदर कर्ज कारणापोटी करण्यांत आलेल्या कर्जवाटपांतर्गत पात्र फेरकर्जउचल मंजूरीबाबत सुध्दा विनंती करण्याचे ठरले.

(रुपये लाखात)

| अ. क्र. | कर्ज कारण | वाढीव फेरकर्ज मर्यादा मंजूरी बाबत मागणी | बँक कर्जवाटप रक्कम | पात्र फेर कर्ज उचल मागणी |
|---|---|---|---|---|
| १. | कृषि यांत्रिकिकरण | ४००.०० | ३२२.५२ | २९०.२६ |
| २. | एस.आर.टी.ओ. | १००.०० | ८३.७८ | ७५.४० |
| | एकूण | ५००.०० | ४०६.३० | ३६५.६६ |

फेरकर्ज मंजूरी संदर्भात राज्य बँकेच्या अटी व शर्ती जिल्हा बँकेस मान्य राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५ :- नॅशनल पॉवरलूम विव्हर्स को-ऑप. सो. लि. कामठी र.नं. ३४६ ह्या संस्थेचे शेअर्सची रक्कम रु.१००/- परत करून सभासदत्व रद्द करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५ :- नॅशनल पॉवरलुम विव्हर्स को-ऑप. सो. लि. कामठी या संस्थेच्या अवसायकांनी दि. १८/५/१९९९ रोजीचे पत्रानुसार संस्थेची बँकेत जमा असलेली शेअर्सची रक्कम रु. १००/- परत मागीतलेली आहे. संस्थेकडे बँकेची कर्जबाकी नसल्यामुळे अवसायकाचे मागणीनुसार शेअर्सची रक्कम रु.१००/- परत करून सभासदत्व रद्द करण्यांत यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६ :- महाराष्ट्र राज्य सह. बँकेचे रु. ३७.०४ लाखाचे अतिरिक्त भाग खरेदीस मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ६ :- महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचेकडून घेतलेल्या कर्जापोटी नियमाप्रमाणे ४ टक्के शेअर्स

खरेदी करावयाचे असल्याने रु.३८.०४ लाखाचे अतिरिक्त भाग खरेदीस मंजूरी देण्यांत येत आहे. याबाबत करावयाच्या अर्जावर सह्या करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना देण्यांत येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७:. सन १९९९-2000 सालाकरिता अल्पमुदत शेती कर्ज मर्यादा रु.२४.०० कोटी मंजूर करणेबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ७:. मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहीती देतांना सांगितले की, खते, बियाणे व औषधी यांचे दर वाढल्यामुळे बँकेने पिक कर्जाचे एकरी दर वाढविलेले आहेत. या वाढीव दरानुसार सन १९९९-2000 करिता अल्पमुदती शेतीकर्ज वाटप करावयाचे झाल्यास रु. ३०.०० ते ३२.०० कोटीचे अल्पमुदती कर्जवाटप होईल, असा अंदाज आहे. ह्या कर्जवाटपापोटी रु.२४.०० कोटीची फेरकर्ज मर्यादा मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचेकडे अर्ज करावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठरावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

— RESOLUTION —

Resolved to borrow during the year 1999-2000 an amount of Rs. 2400.00 Lakhs only (Rs. Twenty four hundred lakhs) out of which Rs. 200.00 lakhs only (Rs. Two hundred lakhs only) for oil seeds production programme Rs. 10.00 Lakhs only (Rs. Ten lakhs) for N.P.D.P. and Rs. 20.00 Lakh only (Rs. Twenty lakhs) for financing S.A.O. for tribals, from The Maharashtra State Co-operative Bank Ltd. Bombay (Incorporating The Vidarbha Co-operative Bank Ltd) to apply for a credit limit for the like sum to the National Bank for Agriculture and Rural Development under section 21(i)(i)

read section 21 (3) (b) or section 21 (3) (a) for seasonal Agricultural operations.

Passed Unanimously.

---

विषय क्रमांक ८ :- नागपूर जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील घर बांधणीसाठी बँकेमार्फत वैयक्तीक कर्ज पुरवठा करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक-८ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, राष्ट्रिय कृषि व ग्रामीण विकास बँक, पूणे (नाबार्ड) यांचे पत्र क्रमांक -- रा.बैं.स.वि.वि. (सह) / ९८३ / सी-७ / ९७-९८ दि- ५.६.१९९७ व मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे पत्र क्रमांक अर्थ-२/डी/जीमसबँक/गृह नि-कर्ज/९८, दिनांक ६-७-१९९८ चे पत्रानुसार बँकेला नागपूर जील्हयातील ग्रामीण कार्यक्षेत्रात घर बांधणीसाठी वैयक्तिक कर्ज पुरवठा करण्यास परवानगी मिळालेली आहे.

त्यानुसार नागपूर जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रांत तालुक्याचे ठिकाणी व नगर परिषद कार्यक्षेत्रांत घर बांधणी / फ्लॅट खरेदीसाठी बँकेमार्फत वैयक्तिक कर्ज पुरवठ्याचे धोरण कार्यालयाने तयार केलेले आहे. हे धोरण मंजूरीकरिता सभेसमोर ठेवण्यांत येत आहे.

कर्ज मंजुरीचे धोरण व कार्यपध्दती —

---

१) अर्जदार जील्हयातील रहिवासी असावा व कर्ज मागणी तालुक्याचे ठिकाणी किंवा नगर परिषद कार्यक्षेत्रातील जागेवर बांधकामासाठी असावी.

२) अर्जदाराला व जमानतदाराला बँकेचे नाममात्र सभासद व्हावे लागेल.

3) कर्ज मागणी अर्ज बँकेचे विहित नमुन्यांत नजदिकचे शाखेत सादर करता येईल. परंतु अर्जदार गृहनिर्माण गृहतारण सह० संस्थेचा सभासद असल्यास त्यांना संस्थेमार्फत कर्ज मागणी अर्ज शाखेकडे सादर करावा लागेल.

४.) अर्जदार शेतकरी असल्यास ५ एकर बारमाही ओलित किंवा १० एकर हंगामी ओलित शेती असणारा असावा. कर्ज रक्कम मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शेतकरी सभासदाच्या कुटुंबात जोडधंदा/व्यवसाय/नोकरी कर्ज परतफेडीच्या दृष्टीकोनातून आवश्यक राहील शेतीवर कर्ज बोझा निर्माण करून द्यावा लागेल तसेच कुटुंबातील सदस्य नोकरी करणारी असल्यास त्याला सहकर्जदार म्हणून गृहीत धरण्यात येईल. त्यासाठी नोकरीतील पगाराचे प्रमाणपत्र तसेच जोडधंदा/व्यवसायासाठी उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

५.) गृह बांधणीकरिता कर्ज मर्यादा रुपये ५.०० लक्ष किंवा इस्टीमेट रकमेच्या ८० टक्के अथवा अर्जदाराची परतफेडीची क्षमता विचारात घेवुन यापैकी जी कमी असेल ती मर्यादा ठरविण्यांत येईल. (कर्ज परतफेडीची क्षमता वार्षिक उत्पन्नाच्या ३५% गृहीत धरण्यांत येईल)

६.) सदर कर्जाचा परतफेडीचा कालावधी जास्तीत जास्त ११ वर्षाचा राहील. कर्ज वाटपापूर्वी प्लॉट/त्यावर तयार होणारी इमारत, बँकेचे नावाने रजिस्टर्ड गहाण करून द्यावे लागेल. यासाठी येणारा खर्च संबंधीतास अदा करावा लागेल त्यासाठी येणारा खर्च संबंधितास अदा करावा लागेल. कर्जाची परतफेड होईपर्यंत इमारत/गाळा बँकेचे गहाणांत राहील. अर्जदाराला कर्ज मंजूरीनंतर ६ महिन्याचे आंत कर्जाची उचल घेऊन बांधकाम पूर्ण करावे लागेल. कर्ज परतफेडीचा प्रथम हप्ता कर्जाचे प्रथम हप्त्याची उचल केल्यापासून १२ महिन्यानंतर व्याजासह वसूलीस पात्र राहील.

७.) या कर्जास दोन जामिनदार आवश्यक राहील. जमानत पत्र रुपये १००/-च्या स्टँप पेपरवर द्यावे लागेल. तसेच सभासद व जामिनदार कुठल्याही राष्ट्रीयकृत, भुविकास, सहकारी बँकेचे/संस्थेचे थकबाकीदार नसावे. जामिनदाराची स्थावर संपत्ती असणे आवश्यक आहे. सदर जमीन/इमारत कर्जापोटी बँकेचे गहाणात देण्यासाठी नगरपरिषद किंवा तालुक्याचे ठिकाणी ग्राम पंचायत असल्यास ग्रामपंचायतचे ना हरकत प्रमाणपत्र द्यावे लागेल.

८.) कर्जावरील बँकेचा व्याज दर द.सा.द.शे. १५ टक्के राहील. थकित कर्ज थकित झाल्यास थकित रकमेवर १ टक्का

जादा व्याज दराने व्याजाची आकारणी करण्यांत येईल. व्याज दरामध्ये वेळोवेळी बदल करण्याचा बँकेला अधिकार राहिल.

९) अर्जदाराला बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे करावे लागेल. मंजूर कर्जामधून खालील प्रमाणे रकमांची उचल देण्यात येईल.

बांधकाम इस्टीमेटचे ८० टक्के रक्कम किंवा रुपये ५.०० लाख यामधील कमी असणाऱ्या रकमेपर्यंत कर्ज मंजूर आल्याने मंजूर कर्जाव्यतिरिक्त इतर रक्कम अर्जदाराची स्वगुंतवणुक म्हणून धरण्यांत येईल.

अर्जदाराला स्वगुंतवणूक रकमेमधून प्रथम प्लिंथपर्यंतचे बांधकाम पूर्ण करावे लागेल. यासाठी झालेल्या खर्चाची बीले बँकेकडे सादर करून व मंजूर कर्जामधून प्रथम हप्ता उचल घेण्यासाठी बँकेकडे अर्ज करावा लागेल. बँकेचे पॅनेलवरील अधिकृत वास्तु शिल्पकार बांधकामाची तपासणी घेऊन त्यांचे प्रमाणपत्रानुसार झालेल्या बांधकामाचे ७५% रकमेपर्यंत पुढील बांधकामासाठी मंजूर कर्जामधून प्रथम हप्ता अदा करणेत येईल. याप्रमाणे दुसरा हप्ता स्लॅबचे काम पूर्ण झाल्यानंतर व तिसरा हप्ता फिनिशिंगचे कामासाठी अदा करण्यात येईल. परंतु मंजूर कर्ज रकमेच्या ५ टक्के रक्कम ही बँकेचे पॅनेलवरील वास्तु शिल्पकारांनी बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच अदा करणेत येईल.

१०) अपूर्ण बांधकाम असल्यास व ते पूर्ण करण्यासाठी कर्ज मागणी आल्यास सध्यांच धोरणानुसार मुल्यांकन करून कर्जवाटप करता येईल.

११) नैसर्गिक आपत्ती व आग ह्यांचे सुरक्षिततेचे दृष्टीने विमा काढणे जरुरी राहिल.

कर्जाबाबतच्या अटी व सादर करावयाची कागदपत्रे –

१. बांधकामाची जागा अर्जदाराच्या स्वमालकीची असावी. गृहनिर्माण सहकारी संस्था असल्यास संस्थेच्या मालकीची असावी. मालकी हक्क दर्शविणारे दस्तऐवज उदा०- खरेदी खत, ७/१२, अद्यावत टॅक्स पावती, बांधकामाचा मंजूर नकाशा, लेआऊटचा नकाशा इ. तत्सम कागदपत्रे, बांधकाम खर्चाचा

अंदाज, बांधकाम परवानगी पत्र, संबंधीत नगरपरिषद / ग्रामपंचायत यांचे असणे आवश्यक राहिल. व ही सर्व कागदपत्रे बँकेचे अधिकृत वास्तुशिल्पकार तसेच टायटल क्लिअरन्स रिपोर्ट [१२ वर्षांचा सर्च रिपोर्ट] बँकेचे अधिकृत वकिल यांच्याकडून अर्जदाराला प्रमाणीत करुन घ्यावे लागतील. वास्तुशिल्पकार व वकिलाची फी अर्जदारास द्यावी लागेल तसेच सदर प्लॉट ज्या स्वायत्त संस्थेचे कडेल असेल यांचेकडून प्लॉट गहाण करुन घेण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

२. अर्जासोबत सभासदाचा स्वतःचे व जामिनदाराचे तीन पासपोर्ट साईज फोटो शाखा व्यवस्थापकांकडून प्रमाणीत करुन घ्यावे लागेल.

३. ज्या प्लॉटवर घर बांधावयाचे आहे. तो प्लॉट व त्यावरील इमारतीचे रजिस्टर्ड गहाण करुन घ्यावा लागेल. अर्जदार प्लॉट खरेदीदार असल्यास प्लॉट रजिस्टर्ड गहाण करुन घ्यावा लागेल, यासाठी संस्थेचे "ना हरकत प्रमाणपत्र" घ्यावे लागेल. असा प्लॉट किंवा फ्लॅट यावर दुसऱ्या कोणाचाही गहाण वा बोजा नसल्याचे बँकेस खात्री करुन घ्यावी लागेल.

४. सभासद / जमानतदार ज्या आस्थापनेत नोकरीला असल्यास त्यांना कर्ज वसुल करुन देण्याचे आस्थापनेचे हमीपत्र घ्यावे लागेल. किंवा गृह निर्माण / गृह तारण संस्थेमार्फत कर्ज घेत असल्यास संस्थेला नियमित कर्ज वसुलीचे हमीपत्र बँकेला द्यावे लागेल.

५. कर्जदार सभासद मयत झाल्यास यांचेकडून येणे असलेले मुद्दल व व्याजासह संपूर्ण कर्ज परतफेडीस सर्व वारस / एकत्र कुटुंब तसेच जमानतदार जबाबदार राहतील. याबाबतचे रुपये ५०/- चे स्टॅंपपेपर वर हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

६. अर्जदार सभासदाच्या उत्पन्नाचा दाखला :-

१] अर्जदार नोकरीत असल्यास कार्यालय प्रमुख

२] आयकर भरत असल्यास असेसमेंट ऑर्डर किंवा विवरणपत्राची सत्यप्रत (जीर नं ------ / पॅन नं. ---)

३] आयकर पात्र नसल्यास बाँडपेपरवर रजिस्टर्ड प्रतिज्ञा पत्र.

४] शेतीची किंमत ठरविण्यासाठी सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट.

७. सहकारी गृह निर्माण संस्था गाळा खरेदी कर्जासाठी खालील कागदपत्रे जादा लागतील.

अ] संस्थेचा सभासद व भाग धारण केल्याबाबतचे प्रमाणपत्र.

ब] गाळा गहाण / बोजा निर्माण करण्यास संस्थेचे

"ना हरकत प्रमाणपत्र"

क] अर्जदाराने संस्थेकडे गाळा खरेदीपोटी भरलेल्या रकमेच्या पावत्यांची मुळ प्रत.

ड] संस्थेच्या उपविधी / नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.

ई] ज्या जमिनीवर बांधकाम होत आहे, त्याचा पूर्ण मालकी हक्क संस्थेचा असुन ती जागा बोजाविरहित असल्याबाबत बँकेच्या अधिकृत वकिलाचा टायटल व्हेरिफिकेशन रिपोर्ट.

८. बिल्डरकडून गाळा खरेदी करीत असल्यास खालील जादा कागदपत्रे जोडावी लागतील :-

अ] जागा खरेदी खताच्या रजिष्ट्रारकडून पंजीबद्ध केलेल्या खरेदी खताची प्रमाणित प्रत.

ब] इमारत बांधकाम करीत असलेल्या जमिनीवर मालकी हक्क तसेच बोझा विरहित असल्याबाबत बँकेचे अधिकृत वकीलाचा टायटल व्हेरिफीकेशन रिपोर्ट.

क] बांधकामापोटी भरलेल्या रकमेच्या मुळ प्रति.

ड] बिल्डरकडून गाळ्यांवर बोझा निर्माण करण्याचे "ना हरकत प्रमाणपत्र"

९. सहकारी गृहनिर्माण संस्था / बिल्डरकडून फ्लॅट खरेदीसाठी कर्ज मागणी असल्यास फ्लॅटची मालकी हक्क देण्याचे / बांधकामाचे कराराबाबतचे करारपत्र.

याशिवाय वरील धोरणांत व अटीत वेळोवेळी फेरबदल करण्याचा अथवा जादा अटी टाकण्याचा अधिकार बँकेला राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक-६ :- महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा १९६०चे कलम १५६ अंतर्गत बँकेच्या अधिकाऱ्यांना वसुलीचे अधिकार प्रदान करण्याबाबत मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे -

ठराव क्रमांक ६ :- बँकेचे दिनांक १९.१.१९९९ चे आदेश पत्र क्रमांक प्रशासन/वसुली/१९९९/६७०८ नुसार श्री. एम. बी. निकम व कर्ज अधिकारी यांची विशेष वसुली अधिकारी, तालुका-

नरखेड येथे नियुक्ती (बदली) करण्यांत आली आहे. तसेच बलुतेदार संस्थांचे थकित कर्ज वसुलीकरिता बँकेचे बलुतेदार संस्थाचे निरिक्षक श्री पी. एन. कामडी यांना वसुलीचे अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे.

वरील दोन्ही अधिकाऱ्यांना नागपूर मुख्यालयासह नागपूर जिल्ह्याचे क्षेत्राकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे कलम १५८ (१), १५८ (२) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१च्या नियम २ (एल) व (जे) तसेच नियम १०७खाली उपनियम (३), (५), (६), (७), (९), (१०) वगळून (१२), (१३), (१५), (१७), (१९), व (२०) नुसार कलम १०१ व कलम १२७ नुसार वसुली दाखल्यांची अमलबजावणी करण्या संबंधीचे विशेष अधिकार पुढील २ वर्षाकरिता प्रदान करणेबाबत मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक-१० :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक १० (१) :- जिल्ह्यातील प्रगतीशिल शेतकऱ्यांना "शेत हवेली" करिता बँकेकडून वैयक्तीक कर्ज पुरवठा करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १० (१) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, जिल्हा सहकारी बँक ही मुख्यत्वेकरुन शेतकऱ्यांचे हिताची जपणूक करणारी बँक असल्याने प्रगतीशिल शेतकऱ्यांनी केवळ त्रिस्तरीय पद्धतीतील अडचणीमुळे जिल्हा बँकेकडे पाठ फिरवून दुसरीकडे जाणे ही बाब बँकेच्या दृष्टीने हितावह नाही. या बाबीचा विचार करुन अशा प्रगतीशिल शेतकऱ्यांना वैयक्तिक कर्जपुरवठा करण्याचे दृष्टीने "शेत हवेली" करिता कर्ज वाटपाचे धोरण कार्यालयाने तयार केले आहे.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन जील्ह्यातील प्रगतीशिल शेतकऱ्यांना "शेत हवेली" करीता करावयाचे कर्ज पुरवठ्याचे खालील प्रमाणे धोरणास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

१. अर्जदारास बँकेचा नाममात्र (नॉमिनल) सभासद व्हावे लागेल.
२. अर्जदार आयकर भरणारी असावा.
३. बँकेने पुरविलेल्या विहित नमुन्यात स्वतः परिपूर्ण भरलेला

वैयक्तिक कर्ज मागणी अर्ज बँकेस सादर करावा लागेल.

४. अर्जदाराला दोन जमानतदार द्यावे लागतील व ते स्थावर मालमत्ताधारक असणे आवश्यक राहिल. जमानतदाराला सुध्दा नामधारी सभासद होणे आवश्यक राहिल.

५. शेत हवेली करीता अर्जदारास जास्तीत जास्त रुपये ७०.०० लाखापर्यंत किंवा शेत हवेली बांधकाम एस्टीमेटच्या ८०% यांत जी रक्कम कमी असेल त्या रकमेपर्यंत कर्ज मंजूर करण्यात येईल.

शेत हवेली कर्ज मर्यादा रुपये ७०.०० लाखाची असल्यामुळे याचा लाभ घेणाऱ्या सभासद शेतकऱ्यांकडे शेत जमिनीतील उत्पन्न, कर्ज मर्यादा ठरविण्यास कमी पडत असल्यास या व्यतिरिक्त परतफेडीच्या दृष्टीकोनातून इतर व्यवसाय / नोकरी असणे आवश्यक आहे. कारण या कर्जाची परतफेड जमिनीतील उत्पन्न तसेच व्यवसाय / नोकरीतील उत्पन्न या दोघांची सांगड विचारांत घेऊनच ही कर्ज मर्यादा मंजूर करण्यात येईल. परंतु ही मर्यादा (एकूण वार्षिक उत्पन्नाच्या ३ पटीपेक्षा जास्त राहणार नाही. उत्पन्न राहिल पुराव्यासाठी सादर करावयाचे दाखले —

अ] शेत जमिनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नासाठी मा. तहसिलदाराचा दाखला.

ब] व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नासाठी व्यवसायाचे आर्थिक पत्रकासह चार्टर्ड अकाऊंटंटचा दाखला.

क] नोकरीतील उत्पन्नासाठी कार्यालयीन प्रमुखाचा दाखला.

६. शेत हवेली शेतात बांधीत असल्यामुळे मा. तहसिलदार (राजस्व विभाग) यांची परवानगी जरुरी राहील.

या कर्जाचे वितरण खालील प्रमाणे करण्यात येईल —

अर्जदारास प्रथम स्वगुंतवणुकीपोटी प्लींथ पर्यंत बांधकाम पूर्ण करावे लागेल. त्यानंतर कर्जाचा प्रथम हप्ता मंजूर कर्जमधून मागणी करतांना झालेल्या खर्चाची बिले व कर्ज मागणीचा अर्ज बँकेकडे सादर केल्यानंतर बँकेचे पॅनेलवरील आर्किटेक्ट वास्तुशिल्पकाराकडून तपासणी घेऊन बांधकामावर झालेल्या खर्चाचे ७५% रक्कम अर्जदाराचे खात्यात जमा

करण्यांत येईल. या कर्ज रकमेतून पुढील बांधकाम अर्जदारास करावे लागेल. यापुढेही झालेल्या खर्चाची बीले बँकेस सादर केल्यानंतरच खर्चाचे ७५% (टक्के) पर्यंत रक्कम पुढील बांधकामासाठी अर्जदारास उपलब्ध करुन देण्यांत येईल. परंतु एकूण मंजूर कर्ज रकमेच्या ८० टक्केपेक्षा जास्त उचल अर्जदारास मिळणार नाही. कारण ती रक्कम वास्तुशिल्पकार यांचेकडून कंप्लीशन सर्टिफिकेट प्राप्त झाल्यानंतरच उर्वरित २० टक्के रक्कम अदा करणेत येईल.

७. अर्जदाराकडे किमान ५ एकर बारमाही ओलीताची अथवा १० एकर हंगामी ओलीताची शेत जमिन आवश्यक राहील. याशिवाय अर्जदाराला स्वत:ची इतर स्थावर मालमत्ता तारणांत देता येईल. एकंदरीत सदर कर्जाकरिता मंजूर कर्ज रकमेच्या द्विपट किंमतीची स्वमालकिची स्थावर मालमत्ता असणे आवश्यक आहे. या कर्जाकरिता अर्जदारास जमिनीचे ७/१२, ८अ, नकाशा, हैसीयत प्रमाणपत्र, ओलीताचे बारमाही/हंगामी प्रमाणपत्र, सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट व इतर स्वमालकीच्या मालमत्तेचे कागदपत्रे सादर करावी लागेल. तसेच शासकीय भरणा केल्याचे ॲसेसमेंट ऑर्डर किंवा विवरण पत्राची सत्यप्रत.

८. अर्जदाराचे सादर केलेल्या जमिनीचे ७/१२ मध्ये एकापेक्षा जास्त भोगधारक असल्यास त्यांचे बँकेनी पुरविलेल्या विहित नमुन्यांत रु. २०/- चे स्टँप पेपरवर संमतीपत्र द्यावे लागेल.

९. अर्जदार राहत असलेल्या तसेच त्याची शेती ज्या हद्दीत असेल त्या क्षेत्राचे परिसरातील सेवा सहकारी संस्था/ग्रामीण बहुउद्देशीय संस्था/व्यापारी बँका/भूविकास बँक व इतर सहकारी बँकांचे कर्ज नसल्याचे दाखले सादर करावे लागेल. परंतु सेवा सहकारी संस्थेच्या चालू हंगामाचे पिक कर्जाबाबत ही अट लागू होणार नाही. तसेच अर्जदारास त्याची जमिन/मालमत्ता इतर कुठल्याही वित्त संस्थेकडे गहाण नसल्याचे बँकेचे पॅनेलवरील वकीलास खात्री करुन द्यावी लागेल.

१०. या कर्जाचे परतफेडीची मुदत ११ वर्षाची राहिल. कर्जदारास कर्ज मंजुरीपासून ६ महिन्याचे आंत कर्जाची उचल घेवुन बांधकाम पूर्ण करावे लागेल. प्रथम कर्ज उचलीचे तारखेपासून १ वर्षपर्यंत व्याजाचा भरणा करण्यासाठी सवलतीचा काळ राहणार असून समान २० सहामाही हप्त्यात कर्जाची परतफेड करावी लागेल. दर सहामाही मुद्दल हप्ता व व्याज वसुलीस पात्र राहिल.

११. या कर्जावरील व्याजाचा दर द.सा.द.शेकडा ३६% असून थकबाकीवर १ टक्का जादा व्याज आकारण्यांत येईल. तसेच बँकेनी व्याज दराबाबत वेळोवेळी घेतलेला निर्णय कर्जदारास बंधनकारक राहिल.

१२. कर्जदार सभासद मयत झाल्यास त्यांचेकडून घेणे असलेले मुद्दल कर्ज व्याजासह संपूर्ण परतफेडीस कर्जदार सभासदांचे वारस तसेच एकत्रित कुटुंब जबाबदार राहिल. याबाबतचे रु.पुर्ण-चे स्टँपवर पेपरवर हमिपत्र लिहुन द्यावे लागेल.

१३. वरील प्रमाणे कर्जाचे वितरण हे प्रत्येक वेळी कामाची पहाणी करुन बँकेचे समाधान झाल्यानंतरच करण्यांत येईल. अर्जदारास अर्जासोबत "शेत हवेली" चा नकाशा व आर्किटेक्ट इस्टीमेट सादर करावे लागेल.

१४. शेत हवेली बांधणी केलेल्या तारण जमिनीपासून मिळणारे उत्पन्न हे कर्ज परतफेडीचे दृष्टीने अल्प ~~[struck out]~~ स्वरुपाचे असल्याने शेतीशिवाय यातील शेतकऱ्यांना त्यांच्या इतर व्यवसाय/नोकरीमधून मिळत असलेल्या उत्पन्नाचा विचार करुन बँकेनी रु० १०.०० लाखपर्यंत कर्ज मर्यादा ठरविलेली आहे. त्यामुळे सभासदाला 'शेत हवेली' जमीन तसेच त्याचे स्वमालकीची इतर मालमत्ता ज्यांची किंमत कर्ज रकमेच्या दिड पट आहे, अशी जमीन इक्वीटेबल मॉर्गेज करुन द्यावी लागेल. व बँकेच्या तारणात देऊन त्यावर बोजा निर्माण करुन द्यावा लागेल. परंतु ज्या जमिनीवर बांधकाम करावयाचे आहे. ती जागा/प्लॉट व त्यावर होणारे बांधकाम/इमारत बँकेला रजिस्टर्ड गहाण करुन द्यावी लागेल. यासाठी होणारा खर्च कर्जदारास करावा लागेल.

१५. वरील अटीत बदल करण्याचा अथवा नविन अटी घालण्याचा अधिकार बँकेस राहिल.

ठराव सर्वानुमते मंजुर.

---

विषय क्रमांक १०(२) :- हरगंगा सहकारी उपसा जलसिंचन सह. संस्था मर्यादित सालई, तह. उमरेड ही योजना जिल्हा/राज्य/राष्ट्रीय बँकस्तरावर बंद करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १०(२) :- उमरेड तालुक्यातील सालई या गावातील

२० लाभार्थींनी स्वतःचे १२५ एकर कोरडवाहू क्षेत्रास पांढरबोडी जल प्रकल्पाचे बॅक वॉटरमधून बारमाही सिंचन सुविधा उपलब्ध होण्याचे दृष्टीने हरणेगा उपसा जलसिंचन सह. संस्थेची नोंदणी करून रु.७४५६ लाखांचा प्रकल्प अहवाल व कर्ज मागणी प्रस्ताव बँकेस सादर केला. सदर प्रस्ताव बँकेने दिनांक १०.२.९५ चे मा० संचालक मंडळाचे सभेत मंजूर करून अंतिम मंजूरीकरिता राज्य बँक/राष्ट्रिय बँक (नाबार्ड) यांचेकडे पाठविला. सदर प्रस्तावास राज्य बँकेने दि. २८.६.१९९७ रोजी व राष्ट्रिय बँकेने दि. ३१.३.९७ रोजी मंजूरी दिलेली आहे.

सदर प्रकल्पाची उभारणी राष्ट्रिय बँक मंजूर पत्रानुसार दिनांक ३१.३.१९९८ पर्यंत होणे आवश्यक होते. तथापी संस्थेचे पदाधिकाऱ्यांची अकार्यक्षमता व असहकार्य, लाभार्थींचा निरुत्साह तसेच नियमानुसार बँकेची वसुलीची टक्केवारी ही ६०% पेक्षा कमी असल्याने राष्ट्रिय बँकेने फेर कर्ज उपलब्धतेवर आणलेल्या मर्यादेमुळे ही योजना राबविणे शक्य होणार नाही. त्यामुळे सदर योजना जिल्हा/राज्य/राष्ट्रिय बँक स्तरावर बंद करण्याबाबत राज्य बँकेस विनंती करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १० (३) :- सेवा/विविध कार्यकारी संस्थांची कर्जवसुलीची २०% ची अट शिथिल करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १० (३) :- बँकेच्या शेतीविषयक विविध कर्ज धोरणानुसार सेवा/वि.का.सह. संस्थांच्या सभासदांना कर्ज मंजूर करतांना त्या संबंधित संस्थेची मागील वर्षा अखेरची किमान वसुली २०% असावी अशी अट आहे.

मागील दोन वर्षात जिल्ह्यातील पीक परिस्थिती समाधानकारक नसल्याने सभासद स्तरावर वसुलीचे प्रमाणात घट आली. पर्यायाने सहकारी संस्थांचे वसुलीचे टक्केवारीतही घट झाली. किमान वसुली टक्केवारीत घट झाल्यामुळे त्या संस्थाकडून येणाऱ्या कर्ज प्रकरणांना मंजूरी देता येत नाही. त्यामुळे गरजू शेतकरी बँक कर्जापासून वंचित होऊ शकतो.

सेवा/विविध कार्यकारी सह० संस्थेच्या माध्यमातून बँकेकडे कर्ज मागणी करणारा सर्वसाधारण शेतकरी कर्जापासून वंचित राहू नये म्हणून सध्या असलेली मागील वर्षाअखेरची किमान कर्ज

वसुली ५० टक्केची अट शिथिल करण्यांत येऊन किमान वसुली ७५ टक्के असलेल्या संस्थांचे सभासदांना कर्जवाटप करण्यांत यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १०(ढ) :- ग्रामीण सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारा करिता करावयाचे कर्ज पुरवठ्याचे धोरणांत बदल करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १०(ढ) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, शासनाच्या ग्रामीण सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगार योजने अंतर्गत ग्रामीण भागातील १८ ते ३५ वयोगटातील किमान चौथा वर्ग पास असलेल्या युवकांकडे स्वतःची अथवा सामील हक्कात असलेली कर्ज रकमेच्या दिडपट रकमेची किमान २.०० एकर ओलीताची जमीन असणे आवश्यक आहे. सुशिक्षित बेरोजगाराची संकल्पना जर लक्षात घेतली तर त्यांच्याकडे कोणतेही मिळकतीचे साधन उपलब्ध नसल्यामुळे त्यास आर्थिक मदत करुन रोजगाराचे साधन उपलब्ध करुन देणे ही मुख्य कल्पना आहे. अर्जदाराकडे जमीन धारणा असावी, या अटीमुळे मुळांत जो बेरोजगार आहे, आणि ज्याच्याकडे रोजगाराचे कोणतेही साधन उपलब्ध नाही तो या योजनेपासून वंचीत राहतो. आपल्या बँकेचा मुख उद्देश हा ग्रामीण भागाचा विकास करणे असल्यामुळे बहुसंख्य ग्रामीण युवकांसाठी ही योजना राबविण्याचे दृष्टीने बँकेच्या प्रचलित धोरणांत बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे सुधारीत धोरण सुचविण्यांत येत आहे.

१. सुशिक्षित बेरोजगार युवक ग्रामीण भागातील रहिवासी असावा.

२. सुशिक्षित बेरोजगार युवकांनी किमान पांच वर्षापूर्वी रोजगार उपलब्धतेबाबत आपले नांव सेवायोजन कार्यालयात नोंदवून त्याचे अद्यावत (सातत्याने) नुतणीकरण केलेले असावे.

३. अर्जदाराकडे किमान दोन एकर कर्जाच्या दुप्पट किंमत असलेली शेती असावी किंवा अर्जदाराची जमानत घेण्यास त्यांचे कुटुंबातील अर्जदाराचे वडील, भाऊ, पती/पत्नी

यापैकी कोणीही तयार असल्यास व ते स्वतः जमीन मालक असल्यास
त्यांच्या मालकीच्या जमीनीचे तारणावर कर्ज उपलब्ध करून देता
येईल, परंतु तारणापोटी गहाणांत देत असलेली शेती कर्जाच्या
द्विपट रकमेची, इतर कोणत्याही वित्तिय संस्थेचा बोजा नसलेली
(बोजा विरहित) जमीन असावी. तारणांत देत असलेल्या
जमिनीचे रेव्हेन्यु रेकार्डवर कर्जाची संपूर्ण रकमेचा बोजा नोंद
करून घेऊनच कर्ज वाटप करावे लागेल.

४. अर्जदार व जमानतदारास संस्थेचे सभासद व्हावे लागेल.
सभासदत्व मंजूरीचा व्यवस्थापक कमेटीचा ठराव सत्यप्रमाण
अर्जदार व जमानतदाराचे संयुक्त नांवानी कर्ज मंजूरीचाशिफारस
असल्याबाबतचा संस्थेचा ठराव कर्ज प्रकरणासोबत सादर करावा
लागेल.

५. सदर कर्ज थकित झाल्यास संस्थेनी करावयाचे कर्ज वसुलि
प्रकरणे हे सुध्दा अर्जदार व जमानतदार यांचे संयुक्त नावांनी
करावी लागेल.

६. जमानतदारास स्वतःची जमीन अर्जदाराने कर्जाकरिता
गहाणांत देण्याचे संदर्भात संमतीकरिता शपथपत्र बँकेच्या
विहित नमुन्यांत स्टँप पेपरवर सादर करावे लागेल.

७. त्याचप्रमाणे कर्ज व अनुदानाच्या योग्य वापर करून कर्ज
वसुलीची नियमीत परतफेडीचे संदर्भात अर्जदारांस विहित
नमुन्यातील स्टँप पेपरवर शपथ पत्र सादर करावे लागेल.

८. हे कर्ज धोरण फक्त बेरोजगार युवकांसाठी शासनाने पुरस्कृत
केलेल्या अनुदान योजनेपुरते मर्यादित राहील, वरील धोरणात्मक
निर्णया व्यतिरिक्त बँकेचे सर्वसाधारण कर्ज धोरणाच्या इतर अटी
या कर्जास लागू राहतील.

९. वरील अटीत बदल करण्याच्या अथवा नविन अटी टाकण्याचा
अधिकार बँकेस राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०(५) :- मध्यम मुदती कर्जाचे सुधारीत कर्ज दर
मंजूरीबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १०(५) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले
विषयाचे अनुषंगाने मा० सर व्यवस्थापक यांनी सभेला माहिती

देतांना सांगितले की, मध्यम मुदती कर्जाखालील विविध कारणांकरिता करावयाच्या कर्ज पुरवठ्यासाठी नाबार्डचे पत्र क्र. रा. बँक, पुणे/१२९२/सांख्यिकी/५/३८८३/ दिनांक २८.७.७८ चे पत्रानुसार सुधारीत कर्ज दर कळविले आहेत. नाबार्डनी कळविलेले सुधारीत दर व सध्या अस्तित्वात असलेले बँकेचे दर यांतील तुलनात्मक माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्जाचे कारण | | सध्याचे बँकेचे कर्जदर | नाबार्डने कळविलेले सुधारित दर | फरक अधिक | फरक कमी | शिफारस केलेले दर. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ओलिताचे साधन – | | | | | | |
| १. | इले. मोटर पंप | ३ हॉ.पॉ. | ८००० | ८००० | -- | -- | ८००० |
| | | ३ हॉ.पॉ. | १०००० | ११९०० | १९०० | -- | ११९०० |
| | | ५ हॉ.पॉ. | १२००० | १२६०० | ६०० | -- | १२६०० |
| | | ७ हॉ.पॉ. | १४००० | १४८०० | ८०० | -- | १४८०० |
| २. | ऑईल इंजिन | ३ हॉ.पॉ. | ७५०० | -- | -- | -- | ७५०० |
| | | ५ हॉ.पॉ. | १२५०० | १५५०० | ३००० | -- | १५५०० |

३. पाईप लाईन

| व्यास मी.मी. | वर्ग से.मी. | मूळ किंमत | जोडाई व खोदाई सहित | मूळ किंमत | जोडाई व खोदाई सहित | फरक अधिक | फरक कमी | मूळ किंमत | जोडाई व खोदाई सहित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७५ | ४ | ३९ | ४९ | ३९ | ५३ | ४ | -- | ३९ | ५३ |
| ७५ | ६ | ५५ | ६५ | ५५ | ७१ | ६ | -- | ५५ | ७१ |
| ९० | ४ | ५८ | ६४ | ५८ | ६९ | ५ | -- | ५८ | ६९ |
| ११० | ४ | ८० | ९० | ८० | ९४ | ४ | -- | ८० | ९४ |
| ११० | ६ | ११० | १२० | ११० | १३४ | १४ | -- | ११० | १३४ |
| १४० | ४ | १२५ | १३३ | १२५ | १४९ | १६ | -- | १२५ | १४९ |
| १४० | ६ | १६३ | १९४ | १६३ | २१७ | २३ | -- | १६३ | २१७ |
| १६० | ४ | १६७ | १७८ | १६७ | १९३ | १५ | -- | १६७ | १९३ |
| १६० | ६ | २३८ | २४० | २३८ | २६६ | २६ | -- | २३८ | २६६ |
| २०० | ४ | २४८ | २७० | २४८ | २९६ | २६ | -- | २४८ | २९६ |
| २०० | ६ | ३७३ | ३८५ | ३७३ | ४०४ | १९ | -- | ३७३ | ४०४ |
| – | – | – | – | – | – | – | | – | |
| – | – | – | – | – | – | – | | – | |
| – | – | – | – | – | – | – | | – | |

| अ. क्र | कर्जाचे कारण | सध्याचे बँकेचे दर |  | नाबार्डनी कळविलेले दर |  | फरक |  | शिफारस केलेले दर |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  |  | एकरी | हेक्टरी | एकरी | हेक्टरी | अधिक | कमी | एकरी | हेक्टरी |
| ४) | **ठिबक सिंचन** |  |  |  |  |  |  |  |  |
|  | पिके — |  |  |  |  |  |  |  |  |
|  | चिकु/आंबा | ७००० | १२४०० | ८३०० | १३५५० | १३०० | -- | ८३०० | १३५५० |
|  | पेरु/लिंबू | ८६५० | १६८०० | ९८०० | २०३०० | ११५० | -- | ९८०० | २०३०० |
|  | संत्रा/मोसंबी | ८६५० | १६८०० | ९८०० | २०३०० | ११५० | -- | ९८०० | २०३०० |
|  | डाळिंब/सिताफळ | ९६०० | १८५०० | ९९५० | १७६०० | ३५० | -- | ९९५० | १७६०० |
|  | केळी-१.५ x १.५ | १३७५० | २९३०० | १४५०० | २९५०० | ७५० | -- | १४५०० | २९५०० |
|  | २.५ x २.५ | १२७५० | २९८०० | १३३५० | २९००० | ६०० | -- | १३३५० | २९००० |
|  | ऊस | १६४५० | ३५५०० | १८७०० | ३९२५० | २२५० | -- | १८७०० | ३९२५० |
|  | कापूस | १७२०० | ३६८०० | १७६०० | ३६५५० | ४०० | -- | १७६०० | ३६५५० |
|  | फळभाज्या वांगे टमाटर मिरची | १९००० | ४२८०० | १९००० | ४२८०० | -- | -- | १९००० | ४२८०० |

|  | सध्याचे बँकेचे दर | नाबार्डनी कळविलेले दर | फरक |  | शिफारस केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
|  |  |  | अधिक | कमी |  |
| ५) **तुषार संच** — |  |  |  |  |  |
| प्रति एकर | ४००० | दर दिलेले नाही. | -- | -- | ४००० |
| जास्तीत जास्त | २०००० | -- | -- | -- | २०००० |
| ६) **नविन विहिर** |  |  |  |  |  |
| अ) रिंग पद्धतीने बांधणी ३मी x ९मी. | ४५००० | ४८००० | ३००० | -- | ४८००० |
| ब) खोदून बांधणी पद्धत | ५०००० | ५२००० | २००० | -- | ५२००० |
| ७) **जुनी विहिर दुरुस्ती/खोल करणे** — |  |  |  |  |  |
| अ) रिंग पद्धतीची विहिर | ४३०० | ५२०० | ९०० | -- | ५२०० |
| ब) खोदून पद्धतीची विहिर | ८४०० | ९९०० | १५०० | -- | ९९०० |
| क) विहिरे ६" व्यासाचे बोअर ५६०० / बोअर करणे ३० मी. केसींग १६०० | ५००० | -- | २२०० | ५६०० |  |
| विहिरीत ६" व्यासाचे बोअर ६००० / बोअर करणे ३० मी. करीता ३९०० केसींग | -- | -- | -- | ६००० |  |

८) बोअर व ट्युब वेलकरिता

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ) सबमर्सिबल पंप व पुरक साहित्याकरिता | २६००० | दर कळविले नाही | -- | -- | २६००० |
| ब) जी.आय.पाईपकरिता | ६००० | " | -- | -- | ६००० |

| ९) कर्जाचे कारण | सध्याची युनिट कास्ट | नाबार्डनी कळविलेले दर | फरक अधिक | फरक कमी | शिफारस केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ड) दुभती जनावरांकरिता – | | | | | |
| अ) संकरीत जर्सी गाय | ११००० | ११२०० ते १४००० | २०० ते ३००० | -- | १२४०० |
| ब) थारपारकर, गीर हरियाना, देशीगाई | ६६०० | ८४०० ते ९५०० | १८०० | -- | ९००० |
| क) ग्रेडेड मुर्रा, मेहसाना म्हैस. | १२५०० | १४००० ते १६००० | १५०० | -- | १४००० |
| ड) सुरती म्हैस | ९५०० | १२००० ते १४००० | २५०० | -- | १३००० |
| इ) नागपुरी, मराठवाडा, पंढरपुरी, गावरानी म्हैस. | ८००० | १०००० ते १२००० | २००० | -- | ११००० |

याशिवाय दुभती जनावरे खरेदीकरिता मागणी असल्यास खालील कारणाकरिता दर्शविलेल्या मर्यादेपर्यंत जास्तीत जास्त कर्ज मर्यादा मंजूर करता येईल.

१. ५०० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावरुन जनावरे खरेदी करुन आणावयाची असल्यास वाहतुक खर्च रु.७५०/- अथवा प्रत्यक्षात आलेला खर्च यात जी रक्कम कमी असेल त्या मर्यादेपर्यंत प्रति जनावर मिळू शकेल.

२. राज्यातून जनावरे खरेदी केल्यास ५०० कि.मी.चे आंत प्रति जनावर रु.४५०/- अथवा प्रत्यक्षात वाहतुक खर्च यात कमी असेल त्या रकमेपर्यंत मिळू शकेल.

३. याशिवाय पहिल्या जनावराकरिता पहिल्या महिन्याकरिता रुपये ६००/- पर्यंत खाद्याकरिता मिळू शकेल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०) बैलजोडी. | ८००० | ९००० | १००० | -- | ९००० |

११) बैलगाडी -

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ) लाकडी बंडी ५ क्विंटल क्षमता | ६००० | ६००० | -- | -- | ६००० |
| ब) लाकडी बंडी ८ क्विंटल क्षमता | ६८०० | ६८०० | -- | -- | ६८०० |
| क) एमआयडीसी - २ टन क्षमता | ८८०० | ८८०० | -- | -- | ८८०० |
| ड) " ३ टन क्षमता | ११००० | ११००० | -- | -- | ११००० |
| इ) " १ टन लोखंडी | ६१०० | ६१०० | -- | -- | ६१०० |
| फ) स्थानिक लोखंडी | ५६०० | ५६०० | -- | -- | ५६०० |

१२) मळणी यंत्र

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ) इलेक्ट्रीमोटरसहित | २७००० | २३००० | -- | ४००० | २७००० |
| ब) ऑईल इंजिनसहित | ३०००० | २५००० | -- | ५००० | ३०००० |
| क) धान्याचे मळणीयंत्र (इले० मोटरसहित) | ८५००० | ५८००० | -- | २६००० | ८५००० |

मळणी यंत्राकरिता नाबार्ड युनिट कॉस्टपेक्षा जादा कर्ज मंजूरी ही बँकेच्या स्वभांडवलातून असल्यामुळे या कर्जाकरिता अवदरास स्वगुणबळ १०% ठरविण्यात आले.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३) ट्रॅक्टरकरिता | कोटेशनच्या ८५% प्रमाणे | | -- | -- | कोटेशनच्या ८५% प्रमाणे |
| ट्रेलर व २ औजारे | कोटेशनचे ८५% प्रमाणे अथवा ७५०००/- पर्यंत जी रक्कम कमी असेल ती रक्कम. | | -- | -- | कोटेशनचे ८५% प्रमाणे किंवा ७५००/- पर्यंत जी कमी असेल ती रक्कम. |
| | ८६००० | | ११००० | -- | |
| | ५६००० | | २१००० | -- | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४) पॉवर टिलर व अवजारे - १० हॉ.पॉ. | कोटेशनचे ८५% प्रमाणे | ८५% प्रमाणे कोटेशनचे | -- | -- | कोटेशनचे ८५% प्रमाणे |
| १२ हॉ.पॉ. | कोटेशनचे ८५% प्रमाणे | कोटेशनचे ८५% प्रमाणे | | | —"— |

१५) रेशीम उद्योग -

एक एकर मॉडेलकरिता

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ) तुतीची लागवड | ५००० | ५००० | -- | -- | ५००० |
| ब) संगोपन साहित्य १००० | | १०००० | -- | -- | १०००० |
| क) अस्तित्वातील संगोपन गृहाचे विकासाकरिता | २४००० | २४००० | -- | -- | २४००० |

अर्धा एकर मॉडेलकरिता –

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ) तुतीची लागवड | २००० | २५०० | -- | -- | २५०० |
| ब) संगोपन व साहित्य | ५००० | ५००० | -- | -- | ५००० |
| क) संगोपन गृहाचे विकासाकरिता | ६००० | ६००० | -- | -- | ६००० |

१६) मेंढीपालन –

२० मेंढ्या व १ एडका युनिटकरिता –

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ एडक्याकरिता | १५०० | २१०० | ६०० | -- | २१०० |
| २० मेंढ्याकरिता (प्रति नग १८००) | २४००० | ३६००० | ६०० | -- | ३६००० |
| शेड व साहित्य | ८०० | ८०० | -- | -- | ८०० |
| एकूण- | २६३०० | ३८९०० | | | ३८९०० |

१७) शेळीपालन –

(१ ते ५ युनिट)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ बोकड [२१००] | १५०० | २१०० | ६०० | -- | २१०० |
| ५ शेळ्या [१८००] | ६००० | ९००० | ६०० | -- | ९००० |
| शेड व साहित्य | २२५ | २२५ | -- | -- | २२५ |
| एकूण- | ७७२५ | ११३२५ | -- | -- | ११३२५ |

(१ ते १० युनिट)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ बोकड [२१००] | १५०० | २१०० | ६०० | -- | २१०० |
| १० शेळ्या [१८००] | १२००० | १८००० | ६०० | -- | १८००० |
| शेड व साहित्य | ४०० | ४०० | -- | -- | ४०० |
| एकूण- | १३९०० | २०५०० | -- | -- | २०५०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१ ते २० युनिट) | | | | | |
| बोकड-१ [२१००] | १५०० | २१०० | ६०० | -- | २१०० |
| २० शेळ्या [१८००] | २४००० | ३६००० | ६०० | -- | ३६००० |
| शेड व साहित्य | ६०० | ६०० | -- | -- | ६०० |
| | २६१०० | ३८७०० | -- | -- | ३८७०० |

१८) <u>जीप खरेदीकरिता</u> –

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जीप खरेदीकरिता | कोटेशनच्या ७५% प्रमाणे | – | -- | -- | जीप किंमतीच्या कोटेशनचे ७५% प्रमाणे. |
| १९.) <u>शेत घराकरिता</u> – | ५०००० | -- | -- | -- | ५०,००० |
| २०) शेताचे कुंपनाकरिता | ५०००० | -- | -- | -- | ५०००० |
| २१.) शेती अवजारे खरेदीकरिता (आधुनिक आत्मसुद्ध अवजारे) | ८०००० | -- | -- | -- | ८०००० |
| २२) बैलजोडी – (५ एकरवरील जमिनधारणा असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी) | १५००० | -- | -- | -- | १५००० |

वर दर्शविलेल्या विविध कारणाकरिता मंजूर करावयाच्या युनिट कॉस्ट पैकी धानाचे मळणी यंत्र, जीप, शेत घर, शेताचे कुंपण, शेती अवजारे व नियमीत बैलजोडी तसेच सबमर्सीबल पंप व पूरक साहित्याकरिता दिलेले कर्ज मंजुरीचे दर हे बँकेच्या संचालक मंडळाने नाबार्ड युनिट कॉस्ट व्यतिरिक्त ठरविलेले दर असून या अंतर्गत हा सर्व कर्ज पुरवठा बँक स्वनिधीतून करीत आहे.

उर्वरित सर्व प्रकारचे दर हे नाबार्डने दिनांक २२.७.९८चे परिपत्रकाद्वारे कळविलेले आहेत. सध्याचे अस्तित्वातील दर आणी सुधारीत दरातील फरक तक्ता ५ व ६ मध्ये दर्शविला असून त्यानुसार मा० संचालक मंडळाचे मंजूरीकरीता तक्ता ७ प्रमाणे दर्शविलेल्या दराची शिफारस करण्यांत आली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन वरील प्रमाणे मध्यम मुदती कर्जाचे सुधारित दर दिनांक १-४-१९९८ पासून लागू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १०(६):- ग्राहकांना त्यांचे बँकेतील मुदत/पुनर्गुंतवणूक ठेवीवर ओव्हर ड्राफ्ट मर्यादा मंजूर करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १०(६):- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतर्फे सध्या रिझर्व बँकेच्या नियमानुसार मुदत/पुनर्गुंतवणूक ठेवीचे तारणावर ठेवीच्या दरापेक्षा २ टक्के जादा व्याज दराने कर्ज दिले जाते. या पध्दतीत एकतर ठेवीदाराला एकमुस्त कर्ज घ्यावे लागते. अथवा एकाच ठेवीचे तारणावर थोडे थोडे कर्ज घेण्यास २-३ वेळा अर्ज करावा लागतो. काही ग्राहकांनी मुदत/पुनर्गुंतवणुकीचे तारणावर ओव्हर ड्राफ्ट देण्याची मागणी आहे. अशा रितीने ओव्हरड्राफ्ट मर्यादा एकदा निश्चित करुन दिल्यानंतर त्या मर्यादेपर्यंत ग्राहकास त्यांचे खात्यावरुन चेक देणे शक्य होईल. सर्व साधारण नियम खालीलप्रमाणे असावेत असे वाटते.

१. या योजनेला "ठेव तारण ओव्हरड्राफ्ट" असे नांव असेल.

२. ज्या ग्राहकांची कमीत कमी मुदत/पुनर्गुंतवणूक ठेव रुपये १०,०००/- ५ वर्षापेक्षा जास्त काळाकरिता आहे अशा ग्राहकांचाच या योजनेत समावेश करता येईल.

३. या ओव्हर ड्राफ्ट खात्यावर प्रत्येक ३ महिन्यांनी व्याजाची आकारणी करुन व्याज या खात्यास नांवे करावे. ठेवीचे व्याज दरापेक्षा २ टक्के जादा व्याज दराने आकारणी करावी.

४. "ठेव तारण ओव्हरड्राफ्ट" खात्याचे वेगळे लेजर तयार करावे व ट्रायल बॅलन्सला वेगळे शिर्षक द्यावे.

५. मर्यादा मंजूर केल्यास पावती डिस्चार्ज करुन इतर कागदपत्रे भरुन घ्यावीत आणि ठेवीचे लेजर पानावर ओव्हर ड्राफ्ट मंजूरीची नोंद व रकम लाल शाईने लिहावी.

६. ओव्हरड्राफ्ट लेजरमध्ये संबंधीत पानावर मंजूर मर्यादा, व्याज दर, पावती क्रमांक, मुदतीची तारीख लिहावी.

७. मुदत/पुनर्गुंतवणूक ठेव ठेवल्यानंतर प्रथम वर्षात ठेवीदारास मुदत ठेवीच्या ५० टक्के व पुनर्गुंतवणूक ठेवीच्या ७० टक्के मर्यादा मंजूर होवु शकेल. प्रत्येक वेळी मर्यादेचा काळ एक वर्षाचा राहिल. प्रथम वर्षात

घेतलेली रक्कम परत केल्यास द्वितिय वर्षापासून मुदत ठेवीवर ७०टक्के आणि पुनर्गुंतवणूक ठेवीवर ८० टक्के कर्ज मर्यादा मंजूर करता येईल. प्रत्येक वर्षी मर्यादा मंजूरीकरिता वेगळा अर्ज करून मर्यादा मंजूर करून घ्यावी लागेल.

८. ठेव तारणावर ओव्हरड्राफ्ट मर्यादा वरील नियमानुसार मंजूर करण्याचा अधिकार शाखा व्यवस्थापकास राहिल.परंतु असे कर्ज प्रकरणे मंजूर झाल्यानंतर ८ दिवसांत मुख्य कार्यालयास माहितीकरिता पाठवावे.

९. वरील नियमांत बदल करण्याचा अधिकार बँकेस राहिल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन ग्राहकांना संस्थेचे बँकेतील मुदत / पुनर्गुंतवणूक ठेवीवर ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूरीबाबतचे उपरोक्त नियमांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १०(७) :- मुदत ठेवीवर देण्यांत येणाऱ्या कर्जाच्या दुराव्यामध्ये (मार्जीन) बदल करण्यास मंजुरी देणे.

ठराव क्रमांक १०(७) :- मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की दिनांक ३/५/१९९८ रोजी झालेल्या मा॰ संचालक मंडळाचे सभेतील ठराव क्र ११(२) नुसार बँक ठेवीदारांना मुदत ठेवीवर ९०टक्के व पुनर्गुंतवणूकवर ठेवीवर ७५ टक्के कर्ज देणे.ज्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची सोय आहे अशा ठेवीवर ९०टक्के कर्ज दिल्यास कांही कालावधीत कर्ज व थकीत व्याज ठेवीपेक्षा जास्त असल्यामुळे वसुलीची अडचण निर्माण होते यामुळे ज्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची सवलत आहे व अशा ठेवीच्या तारणावर केवळ ५०टक्के कर्ज देण्यांत यावे. असा बदल संस्थेचे नियमांत सुचविण्यांत येत आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन ज्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची सवलत आहे अशा ठेवीच्या तारणावर केवळ ५०टक्के कर्ज देण्यांत यावे व तसा बदल संस्थेचे नियमांत करण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

1

विषय क्रमांक १०(८) :- बँकेच्या मा० उपाध्यक्ष सौ० आशाताई महाजन यांनी, त्यांचे निवासस्थानी असलेल्या टेलिफोनचे बीलाचा भरणा बँकेने करण्याबाबत केलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक १०(८) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या मा० उपाध्यक्षा यांचे निवासस्थानी श्री शांताराम रामचंद्र महाजन यांचे नांवाना फोन क्र० ७६३८२२ असून या फोनचा वापर त्या बँकेच्या कामासाठी करीत असल्याने फोनचे बीलाचा भरणा बँकेने करावा असा अर्ज बँकेकडे केला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, बँकेच्या मा० उपाध्यक्षा त्यांच्या खाजगी फोनचा वापर बँकेचे कामासाठी करीत असल्याने त्यांना दरमहा रुपये ५००/- अथवा टेलिफोनचे येणारे प्रत्यक्ष बील यापैकी कमी असलेली रक्कम टेलिफोन खर्च म्हणून देण्यात यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०(९) :- बँकेचा शाखा विस्तार करणेबाबत विचार करणे

ठराव क्रमांक १०(९) :- नागपूर जिल्ह्यात सहकारी चळवळ अधिकाअधिक विकासाभिमुख करण्याचे दृष्टीने तसेच दिवसेंदिवस बँकेच्या आर्थिक व्यवहाराचे विकेंद्रीकरण करून शहरी तथा ग्रामीण भागात शाखा विस्तार करण्याबाबत एमओयू संबंधी जिल्हास्तरीय देखरेख व आढावा समितीच्या सभेत ठरविण्यात आले. त्यानुसार खालील ठिकाणी नविन शाखा उघडण्यांत याव्यात.

१. मानेवाडा — नागपूर (शहर)
२. तेलगांव (कामठी) — तालुका कळमेश्वर
३. मुर्ती — तालुका-काटोल
४. तिनखेडा — तालुका नरखेड

सदर ठिकाणी बँकेच्या शाखा उघडल्यावर त्या परिसरातील सहकारी संस्थाचे सभासद, शेतकरी, व्यापारी, पगारदार सेवक व ग्राहकांच्या ठेवी स्विकारून त्यांना आवश्यकतेप्रमाणे कर्ज पुरवठा करण्यांत येईल. तसेच विद्युत बिलाचा भरणा, विमा प्रव्याज भरणा, शाळा शिक्षकांचे पगार, शेतकऱ्यांना

कापसाचे पेमेंट इ. सेवा उपलब्ध करून देणे सहज शक्य होईल.
शाखा विस्ताराबरोबरच नियोजीत शाखा आर्थिक दृष्ट्या सक्षम
करण्याबाबत सुध्दा बँक प्रयत्नशिल आहे.
खालिलप्रमाणे नियोजीत शाखा उघडण्याचे दृष्टीने आवश्यक
तपशिलवार माहिती संकलीत करून मा. सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, म. रा. पुणे यांचेकडे परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव
त्वरीत सादर करण्यात यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०(१०) :- श्री गणेश सहकारी उपसा जल सिंचन योजना
मर्या., डिघोरी (स्टे.) तालुका कामठी या योजनेस फेर कर्जपुरवठा
करणेबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत नाबार्ड यांना
विनंती करणे.

ठराव क्रमांक १०(१०) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व
सभेला माहिती देतांना सांगितले की, डिघोरी (स्टे.) येथील ४६
लाभार्थी सभासदांनी ३५० एकर कोरडवाहू जमिनीस नाग नदीतून
सींचन सुविधा उपलब्ध होण्याकरिता श्री गणेश सहकारी उपसा
जलसिंचन सह. संस्था पंजीबध्द करून बँकेकडे कर्ज मागणी प्रस्ताव
सादर केला होता. त्यास बँकेच्या मा. संचालक मंडळाचे दिनांक ११.१०.८६
चे सभेत मंजूरी देण्यात आली. व फेर कर्ज मंजूरीसाठी राज्य बँके-
मार्फत नाबार्डकडे पाठविण्यांत आला. परंतु नाबार्डने त्यांचे
दिनांक २३.८.८७ चे पत्रानुसार. जिल्हा बँकेची वसुली ६०टक्के पेक्षा
कमी असल्याने सदर प्रस्ताव नामंजूर केल्याचे कळविले आहे.
त्यामुळे पतपुरवठ्या अभावी योजनेची उभारणी होवु शकली नाही.
सदर योजना कार्यान्वीत झाल्यास बारमाही सिंचनाची
सोय उपलब्ध होईल. त्यामुळे ऊस लागवड होवु शकेल. सध्या ह्या
भागांत एक साखर कारखाना आहे. व दुसरा साखर कारखाना
स्थापीत होत आहे. त्यामुळे लाभार्थी ऊसाचे विक्रीतून व इतर
पिकांचे उत्पन्नातून कर्जाची परतफेड करू शकतील. सदर योजने
करिता बँक स्वनिधीतून कर्ज पुरवठा करण्यास तयार आहे.
तथापी राष्ट्रीय बँकेची (नाबार्ड) मंजूरी नसल्याने शासकीय
अनुदान ५० टक्के मिळण्यास अडचण निर्माण होईल.
विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होवुन श्री.

गणेश सहकारी उपसा जलसिंचन योजनेचा प्रस्ताव पुनर्विचार करुन मंजूरीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांचे मार्फत नाबार्डकडे पुनश्च सादर करावा व शेतकऱ्यांचे हिताचे दृष्टीने सदर प्रस्तावास मंजूरी द्यावी, अशी विनंती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १०(११) :- ठेवीवरील व्याज दरांत बदल करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १०(११) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, राज्य सहकारी बँक व राष्ट्रीयिकृत बँका यांचे ठेवीवरील व्याजाचे दर आपल्या बँके-पेक्षा कमी असून नागरी सहकारी बँकांचे दर जास्त आहेत. त्यामुळे आपलेकडील ठेवी नागरी बँकेकडे जात असल्याचे काही प्रमाणांत दिसून आले. आपलेकडील दोन्ही कर्जावरील आकारले असलेला व्याज दर अत्यंत कमी असल्याने नागरी बँकांच्या ठेवीवरील व्याज दराएवढी वाढ करणे शक्य नसले तरीही ठेवी वाढीचा ओघ कायम ठेवण्यासाठी ठेवीवरील सुधारीत व्याज दर खालीलप्रमाणे सुचविण्यांत येत आहेत.

| | कालावधी | व्याज दर (द.सा.द.शे.) |
|---|---|---|
| १. | ३० दिवस ते ९० दिवस | ७.००% |
| २. | ९१ दिवस ते १८० दिवस | ८.००% |
| ३. | १८१ दिवस ते १ वर्षाहून कमी | ९.५०% |
| ४. | १ वर्षे ते २ वर्षाहून कमी | ११.००% |
| ५. | २ वर्षे ते ४ वर्षे | १२.५०% |
| ६. | ४ वर्षांचे वर | १३.००% |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दिनांक १.४.१९९८ पासून वरील प्रमाणे ठेवीवरील सुधारीत व्याज दर लागू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १०(१२) :- महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने कर्जावरील

व्याज दरांत सुचविलेल्या बदलानुसार आपले बँकेतील व्याजदरांत बदल करण्याबाबत निर्णय घेण्याकरिता...

ठराव क्रमांक ७०(१२) :- महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने नुकतेच कर्जावरील व्याज दरांत बदल केलेला आहे. त्यास अनुसरून आपले बँकेचे कर्जावरील व्याज दरांत बदल करणे आवश्यक आहे. राज्य बँकेने व्याज दरांत केलेला बदल विचारांत घेऊन खालीलप्रमाणे सुधारित व्याज दर दिनांक १-६-१९९८पासून लागू करण्यांत यावे असे ठरले.

| अ. नं. | कर्जाचा प्रकार | द.सा.द.शे. व्याजदर सध्याचे दर | | द.सा.द.शे. व्याजदर सुधारित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेने संस्थेला आकारावयाचा | संस्थेने सभासदास आकारावयाचा | बँकेस संस्थेस आकारावयाचा | संस्थेने सभासदास आकारावयाचा |
| | शेती कर्जे — | | | | |
| १. | अल्प मुदती शेतकी कर्जे | | | | |
| | खरीप, रब्बी, तेलबिया अल्प, ऊस व बागायती कर्जे. | | | | |
| | अ] रु. २५००० पर्यंत | ९.५०% | १३% | ९.५०% | १३% |
| | ब] रु. २५००० ते २००००० पर्यंत | ९.५०% | १४% | ९.५०% | १५% |
| | क] रु. २०००००/- चे वर. | ९.५०% | १६% | ९.५०% | १६% |
| २. | मध्यम मुदती, शेती रुपांतर, फेररुपांतर, द्वितीय फेरउभारणी व गाळा कर्जे. | | | | |
| | अ) रु. २५००० पर्यंत | १०% | १३% | ९.५०% | १३% |
| | ब) रु. २५००० ते २००००० पर्यंत | १०% | १६% | ९.५०% | १४% |
| | क) रु. २०००००/- चे वर | -- | -- | ९.५०% | १६% |
| ३. | मध्यम मुदती शेती कर्जे - | | | | |
| | अ) उपसासिंचन — | | | | |
| | डगवेल, पंपसेट, ऑ.इं. पाईप लाईन, नविन विहिर दुरुस्ती स्प्रिंकलर, ड्रिप, बोअरवेल | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ट्यूब वेल,इ. | — | | | |
| रुपये २५०००/- पर्यंत | १०.५०% | १२.५०% | ९.००% | १२.५०% |
| रु.२५०००/- ते रु.२०००००/- पर्यंत | १०.५०% | १४.००% | १०.५०% | १३.००% |
| रु.२०००००/- चे वर | १०.५०% | १५.५०% | १०.००% | १२.००% |
| ब) इतर शेती कर्ज कारणांकरिता - (दुभती जनावरे, मळणी यंत्र, शेळीमेंढी, बैलजोडी, शेतघर, शेत कुंपण, शेती अवजारे इ. (लघुसिंचन सोडून इतर सर्व शेती कर्जे) | | | | |
| रुपये २५०००/- पर्यंत | ~~१०.५०~~ | -- | ९.००% | १२.५०% |
| रु.२५०००/- ते रु.२०००००/- पर्यंत | -- | -- | ११.००% | १३.५०% |
| रु.२०००००/- चे वर | -- | -- | १३.००% | १४.००% |
| ४. मध्यम मुदती - (एकात्मिक ग्रामीण विकास योजना/ | | | | |
| गोबर गॅस (आय.आर.डी.पी.) | ९.००% | १२.५०% | ९.००% | १२.५०% |
| ५. कृषि यांत्रिकी सुविधा - ट्रॅक्टर / पॉवर टीलर - | | | | |
| अ) रु.२०००००/- चे आंत | १२.००% | १५.००% | ११.००% | १३.५०% |
| ब) रु.२०००००/- चे वर | १२.००% | १६.००% | १३.००% | १५.००% |
| ६. प्रकल्पांतर्गत कर्ज पुरवठा (नाबार्ड मंजूर योजना) - पडित जमिन, विकास, उपसा जलसिंचन, कुक्कुट पालन, शेळीमेंढी, रेशीम, डेअरी प्रकल्प, फलोद्यान फुल शेती - | | | | |
| अ) रु.२५०००/- पर्यंत | ११.५०% | १२.५०% | ११.५०% | १२.५०% |
| ब) रु.२५०००/- ते २०००००/- पर्यंत | ११.५०% | १४.००% | ११.५०% | १४.००% |
| क) रु.२०००००/- चे वर | ११.५०% | १५.५०% | ११.५०% | १५.५०% |
| ७. मध्यम मुदती भाग खरेदी करण्यासाठीची कर्जे - | १२.००% | १६.००% | १४.००% | १७.००% |
| ८. जीप खरेदी करिता कर्ज योजना - (शेतकी सह. संस्था मार्फत) | १३.००% | १६.००% | १३.००% | १५.००% |
| ९. बिगर शेती संस्थांना आकारावयाचे व्याज दर - | | | | |

| संस्थेचा प्रकार | कर्जाचा प्रकार | सध्याचे व्याजदर | | सुधारीत व्याज दर. | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेने संस्थेस आकारावयाचा | संस्थेनी सभासदास आकारावयाचा | बँकेने संस्थेस आकारावयाचा | संस्थेनी सभासदास आकारावयाचा |
| १) अ) विपणन ग्राहक, औद्योगिक स्वतंत्ररित्या नमूद न केलेल्या इतर सर्व बिगर शेती संस्था. | अ) क्लीन कॅश क्रेडिट | १७.५०% | -- | १७.५०% | -- |
| | ब) नजरगहाण कॅश क्रेडिट | १६.५% | -- | १७.००% | -- |
| | क) ताबेगहाण कॅश क्रेडिट | १६.००% | -- | १६.५०% | -- |
| | ड) फेर ताबेगहाण कॅ. क्रे. | १६.५०% | -- | १७.००% | -- |
| | इ) भांडवली कर्ज (म.मु.) | १६.००% | -- | १६.००% | -- |
| ब) प्रक्रिया (प्रोसेसींग) | अ) क्लीन कॅश क्रेडिट | १६.५०% | -- | १६.५०% | -- |
| | ब) नजर गहाण | १६.५०% | -- | १६.५०% | -- |
| | क) ताबे गहाण (फेरताबेगहाण) | १६.००% | -- | १६.००% | -- |
| २) पगारदार सेवकांच्या सहपत संस्था. | अ) क्लीन कॅश क्रेडिट | १६.५०% | -- | १६.५०% | -- |
| | ब) मध्यम मुदती फिक्स लोन | १६.५०% | -- | १६.५०% | -- |
| ३) ब्रिज लोन -- (अंतरिम सर्व प्रकारचे) | | १७.००% | -- | १६.००% | -- |
| ४) विणकर सहकारी संस्था | अ) हातमाग कॅश क्रेडिट | ११.५०% | -- | ११.५०% | -- |
| | ब) यंत्रमाग कॅश क्रेडिट | १४.००% | -- | १४.००% | -- |
| ५) नागरी सहकारी बँका – | कॅश क्रेडिट | १४.००% | -- | १४.००% | -- |
| ६) अर्बन कोऑप. संस्था – | कॅश क्रेडिट | २०.००% | -- | १६.००% | -- |
| ७) ग्रामीण कारागिर बलुतेदार संस्था – | कंपोजीट कर्ज व कॅश क्रेडिट अ) रु. २५००० पर्यंत | ५.००% | १२.५०% | ५.००% | १२.५०% |
| | ब) रु. २५००० चे वर | ११.५०% | १६.००% | ११.५०% | १६.००% |
| १०. वैयक्तिक कर्जावरील व्याज दर.– | | | | | |
| १) सुरक्षितरहित कर्ज अ) सर्वसाधारण | | १६.००% | | १६.००% | |
| | ब) शैक्षणिक (पासाठी) (७/१२ चा उतारा घेऊन) | १६.००% | | १६.००% | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २) वैयक्तीक ओव्हर ड्राफ्ट (वैय. बचत खात्यावरील) | १८.००% | | १८.५०% | |
| ३) वैय. ग्राहकोपयोगी कर्ज | १८.००% | | १८.००% | |
| ४) वाहन खरेदी (वैयक्तीक लाभार्थ्यांना खाजगी उपयोगाकरिता) | १६.००% | | १६.५०% | |
| ५) रोड ट्रान्सपोर्ट (नाबार्ड योजने अंतर्गत) | १६.००% | | १६.००% | |
| ६) राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (एन. एस. सी.) | १७.००% | | १७.००% | |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १० (१३) :- राष्ट्रिय बँकेच्या स्वयंचलित फेरपुरवठा योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्य सह. बँकेकडून मंजूर झालेल्या फेर कर्ज-मर्यादेवर उचल घेण्याकरिता अधिकार प्रदान करणे.

ठराव क्रमांक १० (१३) :- राष्ट्रिय बँक (नाबार्ड) कडून महाराष्ट्र राज्य सह. बँक लिमि., मुंबई यांचेकडून स्वयंचलित फेर पतपुरवठा योजने-अंतर्गत विविध कर्ज कारणापोटी बँकेमार्फत सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात करण्यांत आलेल्या मध्यम मुदती कर्ज वाटपापोटी बँकींग प्लॅन अंतर्गत खालील प्रमाणे फेर कर्ज मर्यादा मंजूर करण्यांत आल्या आहेत.

| अ.क्र. राज्य बँकेचे पत्र क्रमांक व दिनांक | कारण | मंजूर फेर कर्ज मर्यादा. |
|---|---|---|
| १.) डीआयसी/एफआरओ/नागपूर/ ९/बी.पी./१९९८/९८-९९ दिनांक २७-२-१९९९ | लघु सिंचन<br>दुग्ध विकास<br>कृषि अवजारे | रु. ४५.०० लाख.<br>रु. १०.०० लाख.<br>रु. २५.०० लाख. |
| २) सीएफ/जीईएन/एफ-५०५/ २३७०/एनएफएस/एसआरपीओ/ ९८-९९ दिनांक ५.३.१९९९ | स्मॉल रोड ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्स स्किम | रु. १००.०० लाख. |
| ३) डीआयसी/एफआरओ/नागपूर/ १२/१९९८/९८-९९, दि. ८.३.१९९९ | कृषि यंत्रिकी करण (ट्रॅक्टर) | रु. ४००.०० लाख. |

वरीलप्रमाणे मंजूर झालेल्या कॅश कर्ज मर्यादेचा पत्रातील नाबार्ड व राज्य बँकेने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीस मान्यता देण्यात येत असून सदर मर्यादेवर उचल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार खालीलप्रमाणे 'अ' गटातून एक आणि 'ब' गटातून एक याप्रमाणे संयुक्तरित्या देण्यात येत आहेत.

'अ' गट :- १) श्री सुनील केदार -- अध्यक्ष
२) सौ. आशालताई महाजन -- उपाध्यक्षा
'ब' गट :- १) श्री. ए. एन. चौधरी -- सरव्यवस्थापक

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १०(१४) :- बँकेचे सरव्यवस्थापक श्री. ए. एन. चौधरी यांचा परसेवेचा कालावधी वाढविणेबाबत विचार करणे. - -

ठराव क्रमांक १०(१४) :- महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अधिकारी श्री. ए. एन. चौधरी हे आपल्या बँकेत दिनांक २६.७.१९९३ पासून सरव्यवस्थापक म्हणून परसेवेवर काम करीत आहेत. त्यांचा परसेवेचा कालावधी दि. २५.१.१९९९ रोजी संपला आहे.

श्री. ए. एन. चौधरी यांना मागील ६ वर्षापासून सरव्यवस्थापक पदाचा पदभार यशस्वीरित्या सांभाळलेला आहे. या काळांत त्यांनी बँकेची प्रगती साधण्यास मोलाचे सहकार्य केलेले आहे. आजची बँकेतील परिस्थिती विचारात घेता त्यांच्या सेवेची बँकेला गरज आहे. त्यामुळे श्री. ए. एन. चौधरी यांचा परसेवेचा कालावधी आणखी एक वर्षाने म्हणजे दिनांक २५.१.२००० पर्यंत वाढविण्यात यावा, अशी विनंती महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई यांना करण्यात येत आहे.

सूचक :- श्री. व. भा. तायवाडे
अनुमोदक :- श्री. र. व्यं. निमजे

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०(१५) :- बँकेत विविध विकासात्मक योजना राबविण्याकरिता कृषि/स्थापत्य अभियंता व सर्व्हेअर अशी दोन पदे भरण्यास परवानगी देण्यास मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक १०(१५) :- नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,

नागपूर ही ग्रामीण व शहरी भागात शेतकी व बिगरशेतकी कर्ज पुरवठा करणारी जिल्ह्यातील अग्रणी बँक आहे. बँकेमार्फत राष्ट्रीय बँक व राज्य बँक पुरस्कृत विविध विकासात्मक योजना राबविण्यात येतात. राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक, पुणे (नाबार्ड) यांचे दि. ५.६.१९९७ व मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक ८.७.१९९८ चे पत्रानुसार घर बांधणी करिता वैयक्तिक कर्ज पुरवठा करण्यास बँकेला परवानगी मिळालेली आहे.

सदर योजना अधिक कार्यक्षमतेने राबविण्याकरिता एक कृषि / स्थापत्य अभियंता [बी.टेक (अग्रीकल्चर) अथवा बी.ई. (सिव्हील) व एक सर्व्हेअर (मान्यता प्राप्त पॉलीटेक्नीक च्या डिप्लोमा कोर्स पूर्ण केलेला] अशी दोन पदे "ब" वर्ग श्रेणीतील निर्माण करुन ही पदे जाहिरात देऊन भरण्यास मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडे परवानगी मिळण्यासाठी विनंती करण्यात येत आहे.

सुचक :- श्री अ.रा. गुप्ता.

अनुमोदक :- श्री. ब. आ. ताथवाडे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०(१६) :- दामदुप्पट इतपत रकमेने शेती पीक कर्ज मुळे थकित झालेल्या सभासदांकडील कर्जाचे पुनर्गठन करण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १०(१६) :- जिल्ह्यातील सेवा सहकारी संस्थांच्या ज्या सभासदांकडे शेती पीक कर्जाचे मुद्दल रकमेइतपत व्याज झाले किंबहुना त्यापेक्षा जास्त व्याज झाले अशा सभासदांना सहकारी संस्थामार्फत शेती कर्ज पुरवठा बंद झाला आहे. अशा परिस्थितीत त्यांना बँकेच्या नविन योजनांचा व सवलतींचा लाभ मिळू शकत नाही. त्यामुळे असे सभासद त्यांच्या होणाऱ्या प्रगतीपासून वंचित राहू नये म्हणून बँकेने त्यांना मदतीचा हात देण्याचे दृष्टीने अशा सर्व सभासदांच्या दामदुप्पट रकमेचे एका विशिष्ट तारखेला गणना करुन त्या रकमेचे समान १० हप्ते पाडून त्यांचे दीर्घ-मुदती पुनर्गठन करावे व त्यास नविन योजनांच्या लाभ देण्यास युक्त करावे.

बँकेने अशा सर्व सभासदांची प्रकरणे जिल्हा सुपरविजन संस्थे-
कडून तयार करुन घेऊन राज्य सहकारी बँकेकडे मंजूरीकरिता पाठवावीत.
आपल्या बँकेचे मा॰ अध्यक्ष राज्य बँकेचे संचालक असल्यामुळे त्यांनी राज्य
बँकेच्या संचालक मंडळाचे सभेत याबाबत मुद्दा उपस्थित करुन नाबार्ड
तसेच शासन स्तरावर याचा पाठपुरावा करावा व अडचणीत सापडलेल्या
शेतकरी सभासदांना दिलासा देऊन प्रगतीचा मार्ग मोकळा करुन द्यावा
अशी विनंती करण्यात येत आहे.

सुचक :- श्री. चं. तु. समर्थ

अनुमोदक :- श्री. सं. लि. चेरे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर मा॰ अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेचा तपशील
खालीलप्रमाणे आहे.

मा॰ सौ. कुसुमताई किमतकर संचालिका म्हणाल्या की, ग्रामीण
भागातील पतसंस्थांना बँकेने कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर कराव्यात.
मा. श्री. बबनराव तायवाडे यांनीही त्यांचे मतास दुजोरा दिला, ते
म्हणाले की, सर्वच पत संस्थांना बँकेने कर्ज पुरवठा न करता ज्यांचे
व्यवहार व आर्थिक परिस्थिती चांगली आहे अशा निवडक पत
संस्थांना बँकेने कर्ज पुरवठा करावा. यावर मा॰ अध्यक्ष म्हणाले
की, काही नागरी पत संस्थांना बँकेने कॅश क्रेडीट मंजूर केले आहे.
परंतु त्यांनी नियमितपणे कर्जाची परतफेड केली नाही. त्यामुळे
काही संस्था थकित झाल्या आहेत. तथापी मा॰ संचालकांनी सुचविल्या
प्रमाणे निवडक पत संस्थांना कॅश क्रेडीट मंजूरीबाबत विचार
करण्यात येईल.

मा॰ चं. तु. समर्थ म्हणाले की, क्रेडीट कार्ड योजना सुरु
करणार काय? याबाबत खुलासा व्हावा. यावर मा॰ अध्यक्ष महोदय
म्हणाले की, यापूर्वी बँकेने प्रायोगिक स्तरावर क्रेडीट कार्ड योजना
राबविली होती. परंतु अनुभव चांगला नाही. चर्चेत भाग घेतांना
मा॰ श्री. एस. बी. पाटील, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर
म्हणाले की, या योजनेत काही दोष होते. ते दुर करुन सुधारीत
योजना शासनाने पुरस्कृत केलेली आहे. ती यशस्वीरित्या
राबविण्यासाठी बँकेने प्रयत्न करावा.

मा॰ गणपती आहिर संचालक म्हणाले की, विकास संस्थांनी

आर्थिक परिस्थिती फारच वाईट आहे. त्यांचा विचार करुन व शासनाच्या तसेच वित्त संस्थांच्या गाईड लाईन विचारात घेऊन बँकेने कर्ज पुरवठा करावा.

मा. संचालकांनी केलेल्या उपयुक्त सुचनांचा विचार करुन योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल असे सांगून मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. नागपूर.

Seen & Recd

Special Auditor
Class I (Bank) CS.
Nagpur

Exh (1)

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा रविवार दिनांक १६.५.१९९९ रोजी दुपारी १.०० वाजता बँकेच्या रामटेक शाखेचे कार्यालयांत बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

– उपस्थित –

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. र. पां. गावंडे | संचालक |
| ४. | मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ५. | मा. श्री. व. आ. वोढे | " |
| ६. | मा. श्री. चं. ठ. कोल्हे | " |
| ७. | मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| ८. | मा. श्री. सं. लि. थोरे | " |
| ९. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| १०. | मा. श्री. वि. रा. हुलके | " |
| ११. | मा. श्री. ना. र. जीभकाटे | " |
| १२. | मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १३. | मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| १४. | मा. श्री. श्रा. नि. निमजे | " |
| १५. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १६. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |
| १७. | मा. श्री. मु. भि. पलासे | " |
| १८. | मा. श्री. अ. दा. धार्मिक | " |
| १९. | मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| २०. | मा. सौ. स्मिताताई कुंभारे | संचालीका |
| २१. | मा. सौ. कुसुमताई किमतकर | " |
| २२. | मा. सौ. सुमनताई बावनकुळे | अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर |
| २३. | मा. श्री. व्ही. जी. शहाणे | कर्मचारी प्रतिनिधी |
| २४. | मा. श्री. सु. रा. धोटे | प्रतिनिधी, महा. राज्य सह. बँक मर्या, मुंबई. |
| २५. | मा. श्री. एस. बी. पाटील | जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर. |
| २६. | मा. श्री. एस. जी. खवडकर | उपसरव्यवस्थापक, म. रा. सह. बँक म. प्रादेशिक कार्यालय, नागपूर. |
| २७. | मा. श्री. अ. ना. चौधरी | सरव्यवस्थापक |

— अनुपस्थित —

१. मा. श्री. र. गो. बंग — संचालक
२. मा. श्री. भा. चं. ब्राह्मणे — ”
३. मा. श्री. अ. य. गुजर — ”
४. मा. श्री. वि. जा. राउत — ”
५. मा. श्री. चं. तु. समर्थ — ”
६. मा. श्री. एल. जी. चौधरी — कर्मचारी प्रतिनिधी
७. मा. प्रतिनिधी, महाराज्य सह. कृषि व ग्रामीण विकास बँक लि. मुंबई.
८. मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१, सह. संस्था (बँक), नागपूर (निमंत्रित)
९. मा. सहा. महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर (निमंत्रित)
१०. मा. विभागीय अधिकारी, महा राज्य सह. बँक लि; विभा. कार्या. नागपूर (निमंत्रित)

सभेला उपस्थित असलेल्या मान्यवरांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली.

सुरुवातीला सभेला अनुपस्थित असलेले संचालक मा. श्री. र. गो. बंग, मा. श्री. भा. चं. ब्राह्मणे, मा. श्री. अ. य. गुजर, मा. श्री. वि. जा. राउत, मा. श्री. चं. तु. समर्थ यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यात आली.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेनुसार सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ – मागील दिनांक २०.३.९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावरील चर्चेत भाग घेतांना मा. श्री. गु. त्रि. पन्नासे, संचालक म्हणाले, मागील दिनांक २९.१.९९ चे सभेचे प्रतिवृत्त कायम करण्याबाबतचे विषय क्रमांक-१ वरील चर्चेचे वेळी दिनांक २९.१.९९ चे सभेत पारीत झालेल्या ठराव क्रमांक ९(१) नुसार "वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूरी संबंधीचे नियमांत कर्जाचे सुरक्षिततेच्या दृष्टीने ही योजना लिंकप करावी. अशी सुधारीत अट घालण्यांत यावी" अशी सुचना संचालक श्री बबनराव तायवाडे यांचे सोबतच त्यांनी सुध्दा सुचविली असल्यामुळे, श्री बबनराव तायवाडे यांचे नांवासोबत त्यांचे नांव सुध्दा ठरावांत घेण्यांत यावे. मा. श्री.

पनासे यांनी सुचविलेल्या दुरुस्तीस मान्यता देण्यांत आली.

तसेच मा. श्री. सु. मि. पनासे, संचालक म्हणाले की, दिनांक २०.३.१९९९ रोजीचे सभेत पारीत केलेल्या ठराव क्र.८ मध्ये कर्ज परत करण्याची क्षमता लाभधारकाचे उत्पन्न आणि बांधकामाचे क्षेत्रफळ याबाबत सविस्तर उल्लेख करण्यांत यावा. मा. श्री. धार्मिक संचालक यांनी, दि.२०.३.१९९९ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठराव क्रमांक १०(५) मध्ये कुक्कुटपालनाकरिता युनिट कॉस्टच्या समावेश करण्यांत यावा अशी सुचना केली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक २०.३.१९९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त ठराव क्र.१ मधील सह कायम करण्यांत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ – मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक २०.३.१९९९ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेस माहिती दिली. सभेत कार्यालयीन कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ – बचत ठेव व चालू ठेव स्विकारतांना घेण्यांत येणाऱ्या कमीत कमी रकमेत वाढीचा विचार करणे आणि खात्यावर चेकबुकने व्यवहार करणाऱ्या खातेदारांनी खात्यात ठेवावयाच्या कमीत कमी रकमेत वाढ करण्याचा विचार करणे.

ठराव क्रमांक ३ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सध्या बचत ठेव खात्यावर कमीत कमी बाकी रु.२०/- आणि या खात्यावरील चेक बुक धारकांसाठी खात्यात कमीत कमी रु.२००/- बाकी असण्याचा नियम आहे. तसेच चालु ठेव खात्यावर रु.३००/- कमीत कमी बाकी असण्याचा नियम आहे. खाते चालविण्या-करिता लागणारा स्टेशनरी व इतर खर्च लक्षात घेऊन या रकमेत वाढ होणे आवश्यक आहे. सध्या राष्ट्रीयकृत व्यापारी बँकांमध्ये बचत ठेव खात्यावर रुपये ५००/- ते रु.१०००/- आणि चालू ठेव खात्यावर रुपये १००० ते रु.५०००/- कमीत कमी बाकी ठेवण्याचा नियम आहे.

खाते चालविण्याकरिता लागणारा स्टेशनरी व इतर खर्च लक्षात घेता आपल्या बँकेत सुध्दा बचत ठेव खात्यावर कमीत कमी रु.१००/-

आणि चेकबुक धारकाकरिता रु.३००/- तसेच चालु ठेव खात्यावर कमीत कमी रु.५००/- बाकी ठेवण्याबाबत नवीन नियम करण्याबाबत सभेनी निर्णय घ्यावयाचा आहे.

त्याचप्रमाणे या खात्यावर जादा रकमेचा चेक आल्यामुळे कमीत कमी बाकी कमी होत असेल तरी ग्राहकांची अप्रतिष्ठा होऊ नये म्हणून चेक पास करावा आणि बाकी रक्कम कमी झाल्याबद्दल रु.२०/- किरकोळ खर्च आकारण्यांत यावा. तसेच एखाद्या खात्यावर नियमानुसार बाकी असुनही व्यवहार होत नसल्यास प्रत्येक वर्षाकरिता रु.५०/- किरकोळ खर्च आकार घेण्यांत यावा. असा नियम करण्याबाबत सुध्दा निर्णय घ्यावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. चर्चेत भाग घेतांना मान्श्री. मु.भि.पवासे, संचालक म्हणाले की, ज्या खात्यावर जादा रकमेचा चेक आल्यामुळे खात्यावरील कमीत कमी बाकी चेक पास केल्यानंतर कमी होत असेल तरी ग्राहकांची अप्रतिष्ठा होवु नये म्हणून चेक परत न करता तसेच कोणताही किरकोळ खर्च न आकारता पास करण्यांत यावा. तसेच एखाद्या खात्यावर नियमानुसार कमीत कमी बाकी असुनही व्यवहार होत नसल्यास प्रत्येक वर्षाकरिता रु.५०/- किरकोळ खर्च आकार घेण्यांत येवू नये. यावर मा. अध्यक्ष यांनी पुर्वी ५ वर्षे व त्यापेक्षा जास्त कालावधीपासून ज्या खात्यावर व्यवहार झाला नाही अशा खात्याची माहिती शाखांकडून बोलाविण्यांत येईल, असे सांगितले.

विषयावर चर्चा होऊन बचत ठेव खात्यावर कमीतकमी रुपये १००/- आणि चेक बुक धारकांकरिता कमीत कमी रु.३००/- तसेच चालू ठेव खात्यावर कमीत कमी रु.५००/- बाकी ठेवण्याबाबत नविन नियम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक-४ – क्लिअरींगमधून जाणाऱ्या चेककरिता क्लिअरींग हाऊस कडून आकारण्यांत येणाऱ्या खर्चाची वसुली चेक कलेक्शन चार्जेस लावून वसुल करण्यावर विचार करणे.

ठराव क्रमांक-४ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणि सभेला माहिती देतांना सांगितले की, मायकर क्लिअरींग सुरु झाल्यापासून क्लिअरींग करिता खर्च म्हणून रिझर्व बँकेने प्रत्येक जाणाऱ्या/

येणाऱ्या चेकवर रु.१/- प्रमाणे खर्च आकारला आहे. माहे जानेवारी ते मार्च९८ पर्यंतचे काळाकरिता रु. ६०५१४/- इतका खर्च आपले खातेनांवे झाला आहे.

हा खर्च वसुल करण्याकरिता दिनांक २८.६.१९९८ रोजीचे माननीय संचालक मंडळाचे सभेतील निर्णयानुसार मायकर चेक देतांना बचत ठेव चेकबुक रुपये१०/- आणि चालु ठेव चेक बुक रुपये२०/- आकार घेण्यांत आला त्यानुसार माहे डिसेंबर ते मार्च या चार महिन्यांत रु. २१०६०/- वसुल झाले. म्हणजे ओव्हाळे मासिक उत्पन्न रु.५२५०/- आणि खर्च रु. २००००/- आहे. यावरुन खर्च जास्त आणि उत्पन्न कमी असे चित्र दिसत असल्याने बचत ठेव व चालु ठेव खात्यावर मायकर चेक बुक देतांना पूर्वीपेक्षा आकार वाढवून बचत ठेव चेक बुक रु.२५/- व चालु ठेव चेक बुक रु.५०/- घेतल्यास खर्च भरून निघण्यास मदत होईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बचत ठेव खात्यावर चेक बुक देतांना रु. २५/- आणि चालु ठेव खात्यावर चेक बुक देतांना रु.५०/- आकार घेण्यांत यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५ – महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचे कायद्यानुसार कर्ज उभारण्याची वाढीव मर्यादेचा कालावधी वाढवून घेण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ५ – महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा कलम ६३ नियम ३५ अनुसार भाग भांडवल व बचत फंड अधिक इमारत निधी उणे संचीत तोटा याच्या १२ पट बँकेचा निधी स्विकारण्याची क्षमता आहे. ही क्षमता १२पटीवरुन २५ पटीपर्यंत वाढविण्यासाठी मा. जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी दिलेल्या परवानगीची मुदत दि.३०.६.९९ ला संपत आहे.

दि. २८.३.१९९९ चे ताळेबंदानुसार ठेवी रु.२४८२६.८३ लाख आणि कर्जे व ओव्हर ड्राफ्ट रु.१३१२.६५ लाख अशी एकूण रु.२५१३९.४८ लाख बाकी आहे. सन १९९९-२०००मध्ये वाढणाऱ्या ठेवी व घेण्यांत येणारे कर्ज लक्षांत घेऊन भाग भांडवल रु.८०३.८५ लाख + बचत फंड रु.२००.६६ लाख + इमारत फंड रु.१६८.०९ लाख असे एकूण रु. ११८०.६० लाख उणे तोटा – निल – याच्या २५ पट म्हणजे रु. ३१०१०.०० लाख निधी स्विकारण्याच्या परवानगीची मुदत दि.३०.६.२००० पर्यंत वाढवून मिळण्यासाठी मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी याकरिता आवश्यक कार्यवाही करण्याचे

अधिकार मा॰ अध्यक्ष व सरव्यवस्थापक / व्यवस्थापक यांना देण्यात येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक- ६ -स्टेट बँक इंडियामधील मुख्य कार्यालय व शाखांच्या खात्यात रक्कम ठेवण्याची मर्यादा ठरविणे व यास परवानगी मिळणेसाठी मा॰ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक- ६ - मा॰ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचे कडून मिळालेल्या स्टेट बँक इंडियाचे खालिल शाखांमध्ये रोख ठेवण्याच्या परवानगीची मुदत दि॰ ३०.६.९९ ला संपली आहे. ही मुदत दि॰ ३०.६.२००० पर्यंत खालिलप्रमाणे वाढवून मिळण्याबाबत विनंती करावी लागेल.

| | स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा | | रोख ठेवण्याची मर्यादा (रुपये लाखांत) |
|---|---|---|---|
| १. | नागपूर | -- | ५०.०० |
| २. | रामटेक | -- | १०.०० |
| ३. | उमरेड | -- | १०.०० |
| ४. | सावनेर | -- | १०.०० |
| ५. | काटोल | -- | १०.०० |
| ६. | कामठी | -- | ८.०० |
| ७. | नरखेड | -- | १०.०० |

वरिलप्रमाणे शाखांमध्ये त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या रकमेएवढी रोख ठेवण्याची परवानगी दि॰ ३०.६.२००० पर्यंत वाढवून मिळण्यासाठी मा॰ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यात यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७ - स्टेट बँक इंडियामधील खात्यावर तात्पुरता ओव्हरड्राफ्ट घेण्याची मुदत वाढवून देण्यास मा॰ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ७ - मा॰ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचे कडून मिळालेल्या परवानगीनुसार स्टेट बँक इंडियाचे खालिल -

शाखांमध्ये त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या रकमाएवढी ओव्हरड्राफ्ट घेण्याची मर्यादा दि. ३०.६.१९९९ ला संपलेली आहे. यापुढे दि. ३०.६.२००० पर्यंत वाढवून मिळण्यासाठी खालीलप्रमाणे विनंती करावी लागेल.

| स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा - | | | ओव्हर ड्राफ्टची मर्यादा (रुपये लाखांत) |
|---|---|---|---|
| १. | नागपूर | -- | ५०.०० |
| २ | काटोल | -- | २.२५ |
| ३. | कामठी | -- | १.०० |
| ४. | रामटेक | -- | १.०० |
| ५. | सावनेर | -- | १.०० |
| ६. | उमरेड | -- | १.२५ |
| | | एकूण रु. | ५६.५० लाख. |

वरीलप्रमाणे ओव्हर ड्राफ्ट मर्यादेचा शाखा व्यवस्थापकांनी मुख्य कार्यालयाची पूर्वपरवानगी घेऊन उपयोग करावा. वरीलप्रमाणे ओव्हर ड्राफ्ट घेण्यासाठी देण्यात आलेल्या मर्यादेची मुदत दिनांक ३०.६.१९९९ रोजी संपली असल्याने ही मुदत दिनांक ३०.६.२००० पर्यंत वाढवून मिळणेकरिता मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांना विनंती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक - ८ - सन १९९९-२००० करिता तयार करण्यात आलेल्या बँकेच्या कृषि विषयक धोरणातील कर्ज दर, अटी शर्तीना मान्यतेबाबत व कर्ज धोरण पुस्तिका प्रकाशित करण्यास मान्यता देणे

ठराव क्रमांक - ८ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले आणि सभेस माहिती देतांना सांगितले की, जिल्हा सहकारी बँका, सेवा/विविध कार्यकारी सह. संस्थांच्या सभासदांसाठी राबविण्यांत येणाऱ्या कृषि विषयक कर्ज धोरणाची धोरण पुस्तिका दरवर्षी प्रकाशीत करीत असतात. आपली बँक सुद्धा सन १९९४-९५ पर्यंत दरवर्षी कृषि विषयक कर्ज धोरणाची 'धोरण पुस्तिका प्रकाशित करीत असे. सन १९९४-९५ नंतर अशी कर्ज विषयक कर्ज धोरणाची धोरण पुस्तिका प्रकाशित केली नाही. यावर्षी सन १९९९-२००० करिता विस्तृत स्वरुपाची कृषि धोरण पुस्तिका तयार करण्यांत आली आहे.

जिल्ह्यातील सेवा/विविध कार्यकारी सह. संस्थांच्या सभासदांना पदाधिकाऱ्यांना, संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांना बँकेच्या कृषि कर्ज विषयक धोरणाची, कर्ज दराची, तसेच या अनुषंगाने इतर आवश्यक बाबींची